
# 'स्व'- रुपवर्धिनी

## कार्यवृत्त २०००



# 'स्व'-रूपवर्धिनी
# कार्यवृत्त २०००

## ✤✤✤ अं त रं ग ✤✤✤


- मनोगत
- मुखपृष्ठकथा
- वार्षिक वृत्त
- शिबिर वृत्त
- साद सीमेवरील जवानांची
- स्पर्धा परीक्षा केंद्र
- प्रवास 'स्व'पासून समाजापर्यंतचा
- गणेशोत्सव-२०००
- कसरत जमा खर्चाची



संपादक : श्री. जयंत कवठेकर

मुद्रण : प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे-२.
अभय मुद्रणालय, टिळक रोड,
पुणे - ३०.

मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस

रेखांकने : श्री. शेखर साने
श्री. अरुण फडणीस

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यकारिणी


**सन्माननीय सभासद**

**पद्मभूषण डॉ. श्रीमती बानुबाई कोयाजी**

**श्री. अविनाश वारदेकर**

**कार्यकारी समिती**

**अध्यक्ष**
श्री. जयसिंहभाई मरिवाला

**कार्यकारी अध्यक्ष**
श्री. पु. व. श्रॉफ

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. गो. लवळेकर

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं. सामळ

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व. ना. दाते

**कार्यवाह**
श्री. रा. प. देसाई

**सहकार्यवाह**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

**सभासद**

श्री. प्रतापराव पवार
श्री. कां. गि. शहा
प्रा. श्रीमती उष:प्रभा देसाई
श्री. पुखराज जैन
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. संजय विष्णू तांबट
श्री. वा. दे. संचेती
श्री. कृ. ल. पटवर्धन
श्री. उदय गुजर
सौ. चंद्राताई दलाया
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. कन्हैय्यालाल बलदोटा



**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**

**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०६०**

**आयकर सवलत आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ एसी प्रमाणे.**



**संपर्काचा पत्ता :-** ‘स्व-’रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

दूरध्वनी : - कार्यालय - ६१२१७०४, ६१३४३१० निवास - ५६५५८३५, ५६५३६०६, ६६८४३७५


**धनादेश ‘स्व’-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# मनोगत

कालसुसंगत पावलं उचलत वर्धिनी अधिक जोमानं पुढे पुढे जात आहे. वर्धिनीच्या संस्कारांतून ज्यांची जीवनं विकसित झाली आहेत, असे युवक-युवती अत्यंत समर्थपणे या वाटचालीत सक्रीय सहभागी होत आहेत. गतवर्षी संगणक विभाग सुरू होऊन या वाटचालीला प्रारंभ झाला. यंदा नव्यानं सुरू झालेलं स्पर्धा-परीक्षा, व्यवसाय व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र हेही नवीन पाऊलच आहे. परंतु हे सर्व चालू असताना **'निर्माणोंके पावन युग में हम चरित्र निर्माण न भूले'** या ओळीतील आशयाला अनुसरूनच वर्धिनीची वाटचाल चालू आहे. 'वंदेमातरम्' गीताच्या समूहगान सोहळ्यात सहभागी अकरा हजार विद्यार्थ्यांना कार्यक्रमस्थळी घेऊन येणं व त्यांना परत पोहचवणं हे आव्हान वर्धिनीच्या एकशे वीस युवक-युवतींनी अत्यंत यशस्वीपणानं पेललं, हे त्याचंच गमक आहे. वर्धिनीत यंदाच्या वर्षी झालेली मासिक प्रबोधन सत्रेही या उद्दीष्टपूर्तीसाठीच होती. गणेशोत्सवातील निर्माल्य एकत्रीकरण आणि पथनाट्ये हीसुध्दा वर्धिनीची संस्कारदिशा दर्शविणारीच होती.

याशिवाय 'स्व'-रूपवर्धिनीची दैनंदिन व नैमित्तिक कार्यदिशा निश्चित करण्याकरिता वर्धिनीत सहविचार समितीद्वारा सुरू झालेली सामूहिक निर्णय प्रक्रिया हेसुध्दा एक वैशिष्ट्य आहे.


गेल्या वर्षी कॅनडातील श्री. निलेश व सौ. सोनल काविया हे दांपत्य वर्धिनीच्या कामाचा अभ्यास करण्यासाठी कामात प्रत्यक्ष सहभागी झाले होते. या वर्षी इंग्लंडमधील श्री. अर्जुन पारेख हेही स्वयंस्फुर्तीने या कामाचा अभ्यास करण्यासाठी व कामात एक वर्ष सहभागी होण्यासाठी आले आहेत. हाही एक विशेष योग आहे.

वनवासी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या स्मृतिशताब्दीचं हे वर्ष. त्यांना आदरांजली अर्पण करणारी 'मुखपृष्ठ कथा' याच अंकात दिलेली आहे. बिरसा मुंडा यांच्यासारख्या स्वातंत्र्यसेनानींनी समाजाला जागृत करण्यासाठी व्यक्त केलेल्या भावना काव्यप्रतिभेच्या अविष्कारातून कै. नाना पालकरांनी 'उठावणी' ह्या संग्रहात शब्दबध्द केल्या आहेत. निद्रित कर्तृत्वाला जागे करून कार्यप्रवण व विचारी बनविणाऱ्या 'उठावणी' मधील काही काव्य-पंक्ती या कार्यवृत्ताच्या प्रत्येक पानावर दिल्या आहेत.

**सभा, भाषणे, व्यर्थ सारे ठराव । नसे आज कार्यात त्या लेश वाव ।**
**कृतीचा महा पंथ हा आचरावा ॥ कृती बोलुं द्या; व्यर्थ डंका नसावा ॥**

# बिरसा मुंडांचा आदर्श

देशाबद्दल, समाजाबद्दल, संस्कृतीबद्दल सार्थ अभिमान बाळगून देशाच्या सर्वंकष उन्नतीसाठी झटणारी कर्तृत्वसंपन्न पिढी निर्माण करण्यासाठी चाललेल्या अनेक प्रयत्नांपैकी एका प्रयत्नाचे नाव 'स्व'-रूपवर्धिनी. येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात स्वाभिमानाची फुंकर घालून त्याचे कर्तृत्व फुलविण्याचा नम्र प्रयत्न गेली २२ वर्षे चालू आहे. असा स्वाभिमान ज्यांच्याकडे पाहिल्यानंतर जागा होऊ शकतो, अशा थोर नररत्नांमध्ये वनवासी क्रांतिवीर बिरसा मुंडांचा समावेश होतो. इ.स. २००० हे बिरसा मुंडांचे स्मृतीशताब्दी वर्ष. या निमित्ताने बिरसा मुंडा यांनी केलेल्या अतुल शौर्याची स्मृती जागावी, वेगवेगळ्या रूपात समाजाला वेठीस धरणाऱ्या गोऱ्या संकटांना सामोरे जाण्याची आणि या देशविघातक शक्ती नेस्तनाबूत करण्याची ताकद बिरसा मुंडांच्या प्रेरणादायी चरित्रातून मिळते. म्हणूनच या कार्यवृत्ताच्या मुखपृष्ठावर त्यांचे प्रेरणादायी चित्र दिले आहे.



**कोण होते बिरसा मुंडा ?**

आपल्या मुंडा जमातीला 'ठग', बेईमान, 'चोर' असे मिशनच्या क्षुद्र स्वार्थासाठी म्हणणाऱ्या फादर नोट्रेट यांना रोखठोक जाब विचारून निरूत्तर करणारा एक १४ वर्षांचा वनवासी मुलगा. फोडा आणि झोडा या कुटील नीतीचा वापर करून, अन्याय-अत्याचार करून आणि सत्तेच्या रक्षणासाठी आपणच निर्माण केलेल्या कायद्याचा आधार घेत ब्रिटिशांनी दक्षिण बिहारमधील वनवासी बांधवांचा जंगलावरील अधिकार संपवला. ज्या जंगलात पिढ्यान्पिढ्या आपण राहिलो, ज्या जंगलाचे रक्षण आपण केले, त्या जंगलातून हद्दपार करणाऱ्या ब्रिटिशांच्या या जुलुमाला मुंडा जमातीने बिरसा मुंडांच्या नेतृत्वाखाली कडाडून विरोध केला. बिरसा तसा वयाने लहान होता; पण मुंडांना मात्र तो कृष्णाचा अवतार आहे, असे मनोमन वाटायचे. त्यांची तशी श्रध्दाच होती. बिरसाच्या कुटुंबियांना आणि बिरसाला ख्रिश्चन मिशनने फसवून धर्मांतरीत केले खरे; परंतु त्यांची कपटनीती लक्षात येताच बिरसा मुंडा यांनी जमातीला जागृत केले व त्यांच्यात स्वातंत्र्याच्या संघर्षाची अस्मिता चेतवली.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. ब्रिटिश सरकार, ख्रिश्चन मिशन व सरकारच्या मेहेरबानीवर जगणारे स्वाभिमानशून्य काही स्थानिक लोक या सर्वांनी एकत्रितपणे बिरसाला संपविण्याचे प्रयत्न सुरू केले. बिरसावर खोटेनाटे आरोप ठेवले, संघटित मुंडांच्या मेळाव्यावर गोळीबार केला. पण बिरसाही नमेना; मुंडा जमातही वाकेना. शेवटी कपटनीतीचा वापर करून बिरसा व त्याच्या चारशे साथीदारांना अटक केली. कोणताही आरोप न ठेवता तुरूंगात टाकले. तुरूंगात अनन्वित अत्याचार केले आणि विषप्रयोग करून बिरसा मुंडांना ब्रिटिशांनी तुरूंगामध्येच मारले.

दुर्लक्षित, अशिक्षित, असंघटित समाजामध्ये जागृती करून त्यांचा स्वाभिमान फुलविणारे, समाजाला आपल्या उन्नतीची जाणीव करून देणारे बिरसा मुंडा म्हणूनच आमचे आदर्श आहेत. त्यांच्या स्मृतिशताब्दी-निमित्त ही त्यांना आदरांजली.

**करावी कृती ना मुखें ती वदावी । कृतीने कृती भारतीं वाढवावी ॥**
**कृतीचा कशाला नगारा झडावा ? 'कृतिहीन', 'वाचाळ' हिंदू नसावा ॥**

# वार्षिकवृत्त

## मुलींचा शाखाविभाग

**संक्रांत उत्सव :-**

१६ जानेवारी, २००० या दिवशी सायंकाळी ६ ते ८ या वेळात आगरकर हायस्कूलच्या प्रांगणात या विभागाचा उत्सव संपन्न झाला.

प्रथम सर्व शाखांनी व प्रकल्पांनी प्रात्याक्षिके सादर केली. योगासनांचं मनोवेधक दर्शन, एकनाथांच्या भारूडांचं दृश्यांकन, बहिणाबाईंच्या ओव्यांतून घडणारं जीवनदर्शन, चाणक्यनीतीचा आणि शिकवणीचा अवलंब आजच्या युगातही किती समर्पक आहे, हे पटवून देणारं एक वेगळं प्रात्याक्षिक आणि शेवटी स्त्रीशक्तीचं दर्शन घडविणारा पोवाडा, अशी पाच प्रात्याक्षिके सादर करण्यात आली.

प्रात्याक्षिकांनंतर गतवर्षीचा पूर्ण आढावा घेणारं कार्यवृत्त व त्यानंतर युवतीगटाचं 'चिरविजयाच्या संकल्पाने हृदये काठोकाठ भरू, मातृभूमीच्या दिग्विजयाची सुप्त मनीषा पूर्ण करू' हे जोषपूर्ण पद्य झालं.

'संक्रांत उत्सव साजरा करण्यामागे परस्परांमधील स्नेह वाढवणे आणि समाज प्रबोधन करणे, हेच प्रमुख उद्देश आहेत, असं श्रीमती पुष्पाताई नडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितलं.

नंतर दोन विशेष सत्कार करण्यात आले. त्यामधे 'HEMRL' मधील उत्तम पगाराची नोकरी सोडून, स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून स्वतःचा पूर्ण वेळ वर्धिनीसाठी देणाऱ्या श्री. सुनिल कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर गळ्यातील सोन्याची साखळी चोरणाऱ्या चोराचा अतिशय धाडसाने, एकट्याच्या हिंमतीने पाठलाग करून त्याला पोलीसांच्या हवाली करणाऱ्या येथील सहकारनगर कु. मंजुळा शेट्टी हिचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत भोजकर यावेळी म्हणाले, "परदेशात स्त्री-पुरूषांच्या समानतेचा गवगवा होतो. मला मात्र स्त्रीमधील शक्ती ओळखून तिचे कृतीत रूपांतर करणं ही काळाची गरज आहे, असे वाटते. त्याचबरोबर ज्या संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग अधिक त्या संस्था अधिक टिकतात. कारण स्त्रियाच त्या संस्थेत संस्कृतीचं, प्रेमाचं जतन आणि संवर्धन करतात. म्हणून स्त्रीमध्ये जास्तीत जास्त वैज्ञानिक दृष्टी येणं, ती सुशिक्षित होणं महत्वाचं आहे. या सर्व प्रगतीबरोबरच राष्ट्रीय विचार सर्वांच्या मनात रूजणं हे सुध्दा आवश्यक आहे.'

कार्यक्रमाचा शेवट संपूर्ण वंदेमातरम् गायनाने झाला.

**खरी देशभक्ती कृतीने दिसावी । मुखें वाच्यता भक्तिची त्या नसावी ॥**
**तुम्हां पाहुनी बंधुना धीर यावा । असा पंथ हा एकतेचा धरावा ॥**

## भगिनी निवेदिता शाखा

भगिनी निवेदिता, राजमाता जिजाऊ व आजोळ या तिन्ही शाखांच्या मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्याचबरोबर भगिनी निवेदिता शाखेत निबंध स्पर्धा आयोजित केली. मुलींनी त्यात अतिशय उत्साहाने भाग घेतला. फेब्रुवारी महिन्यात मुलींची तिसरी-चौथी चाचणी परीक्षा असल्याने मौनाभ्यासाला मार्च व एप्रिलमध्ये मुलींना परीक्षेसाठी अधिक वेळ दिला होता. मार्गदर्शन व दर रविवारी संपूर्ण दिवसाचे अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले होते. परीक्षांचा सराव म्हणून शाखेतील प्रत्येक युवतींने एक एक वर्ग घेऊन त्यांचे सर्व विषयाचे आठवड्याला पेपर घेऊन ते तपासून मुलींच्या शंकांचे निरसन केले.

एप्रिलमध्ये उन्हाळी शिबिर झाले. यात भगिनी निवेदिता शाखेची एकूण २५ संख्या होती. यावर्षी मोठ्या गटातील मुलींची ग्रामशिबिरातसुध्दा उपस्थिती होती. मे महिन्यात शाखेत रोज दोन तास बेसबॉल, क्रिकेट, कबड्डी असे विविध खेळ झाले. त्यामुळे मुलींच्या मैदानावरील कार्यक्रमात उत्तम सुधारणा झाली आहे. त्याचबरोबर दररोज दुपारी एकत्रित ग्रंथालयात जाऊन पुस्तकांचे वाचन केले. या वाचनाचा फायदा जूनमध्ये घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत जाणवला. ज्या मुलींना निबंध व्यवस्थित लिहिता येत नव्हते, त्यांनीही वक्तृत्व स्पर्धेत चांगली चमक दाखविली. एप्रिलमध्ये डॉ. आंबेडकर जयंतीला मुलींनी रक्तदान शिबिरासाठी रक्तदाते मिळविण्याचा प्रयत्न केला.

जूनमध्ये नवीन मुलींना शाखेत आणण्यासाठी शाळांमध्ये संपर्क करून, याद्या जमवून मुलींच्या परीक्षा घेण्यात आल्या. लगेचच जुलैपासून मुली शाखेत येऊ लागल्या. १ जूनला शाखेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावर्षी हा कार्यक्रम अगदी वेगळ्या पध्दतीने झाला. जुन्यानव्या युवतींचा एकत्रित कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला युवतींना शाखेत येण्यासाठी प्रोत्साहन द्यायला सौ. वागेश्री पोंक्षे आल्या होत्या. पालकांना शाखेविषयी पूर्णपणे माहिती देण्यासाठी ३ ऑगस्ट रोजी पालक सभा आयोजित करण्यात आली. या सभेत राजाभाऊ लवळेकर व शिरीष पटवर्धन यांनी पालकांशी गप्पा मारल्या. या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच पालक व विद्यार्थिनी एकत्रित बसून आपल्या शंका मांडून सरांकडून त्यांचे निरसन करून घेत होत्या. १ ऑगस्टला टिळक पुण्यतिथीनिमित्त शाखेने केसरीवाड्याला भेट दिली. ४ ऑगस्ट रोजी नागपंचमीनिमित्त शाखेत कार्यक्रम घेतला गेला. मुलींचा एकमेकींशी अधिक जवळून परिचय व्हावा यासाठी १५ ऑगस्ट म्हणजेच रक्षाबंधनाच्या दिवशी सर्व मुलींनी एकमेकांच्या घरी जाऊन राख्या बांधल्या. नंतर शाखेत सुरूवात झाली, ती गणेशोत्सवाच्या तयारीची. यावर्षी शाखेने टिपरी पथक बसविले होते. शाखेने यावर्षी वजनकाटा, तुळशीबाग गणपती, येरवडा येथील महाराष्ट्र हौसिंग सोसायटी या ठिकाणी पथक सादर केले. त्याचबरोबर एकमेकांच्या घरी जाऊन आरत्या म्हटल्या.

## राजमाता जिजाऊ शाखा

शनिवारी होणारी प्रेरणादायी व्याख्याने ही शाखेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे अविभाज्य अंग आहे. यावर्षी शाखेमध्ये अनंत कान्हेरे, बिरसा मुंडा, कल्याणस्वामींची गुरूभक्ती इत्यादि विषयांवर व्याख्याने झाली. लहान वय असूनही मनात रूजलेली देशभक्ती व जॅक्सनचा वध करताना सर्व गोष्टींचे केलेले काटेकोर नियोजन इत्यादि गोष्टी अनंत

**नका संकटांना भिऊं, येऊं द्या तीं । समर्थांपुढे संकटें नम्र होतीं ॥**


कान्हेरेंच्या चरित्रातून मुलींना विशेष भावल्या; तर बिरसा मुंडा यांचा प्रखर धर्माभिमान व कल्याण स्वामी यांची गुरूवर असणारी नितांत श्रध्दा, आज्ञाधारकपणा या गोष्टी मुलींना विचार करायला लावून गेल्या. कल्याणस्वामींची गुरूभक्ती हा विषय ऐकल्यानंतर बऱ्याच मुलींनी आपण शाळेतील शिक्षकांविषयी बोलतानासुध्दा त्यांचा नीट आदर ठेवत नाही, हे स्वतःहून सांगितले व यापुढे असे करणार नाही असे ठरविले.

दि. १२ ऑगस्ट रोजी शाखेच्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास सुरेशराव परचुरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परचुरे सरांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिजामातांची तेव्हाची भूमिका व ‘स्व’-रूपवर्धिनीची भूमिका काय असायला पाहिजे, हे मुलींसमोर मांडले. गणेशोत्सवात यावर्षी शाखेने पहिल्या दिवशी व शेवटच्या दिवशी तुळशीबाग व शिवशक्ती मित्रमंडळ यांच्या मिरवणुकीत ध्वजदल सादर केले. पथकाबरोबरच यावर्षी शाखेने विविध मंडळांसमोर अथर्वशीर्ष सादर केले व मुलींसाठी हा अतिशय वेगळा अनुभव होता. पर्वती विभागातील गणपती मंडळांच्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व दररोज येऊन आमच्या मंडळासमोर अथर्वशीर्ष म्हणणार का अशी विचारणा केली.

अथर्वशीर्षाच्या उपक्रमाबरोबरच ज्यांना इच्छा होती, अशा मुलींना घेऊन गणपती विसर्जनाच्या दिवशी जवळच्या घाटावर निर्माल्यापासून होणारे प्रदूषण रोखण्याचा उपक्रम हाती घेतला. पर्वती भागातील सर्व घाटांवर गणपती विसर्जनासाठी प्रचंड गर्दी असते. लोक गणपतीबरोबरच घरात वर्षभराचे साठलेले निर्माल्य पाण्यात आणून टाकतात. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण होते.

शाखेमध्ये भोंडल्याचा कार्यक्रम झाला. नेहमीप्रमाणेच उत्साहात पारंपरिक गाणी म्हणत, फेर धरत हा कार्यक्रम पार पडला. नागपंचमीनिमित्त कात्रज सर्पोद्यानभेट व पर्वतीभेट अशा भेटी झाल्या. पर्वतीवर केवळ फिरणे व वास्तू पाहणे, असा उद्देश न ठेवता मुलींना गटागटाने विविध दिशांना पाठवून छोट्या छोट्या गोष्टींचे निरीक्षण करावयास सांगितले होते. यानंतर केलेल्या निरीक्षणावर त्यांना पर्वतीचा नकाशा काढण्यास सांगितले. दोन वर्धिकांनी अतिशय चांगले नकाशे तयार केले. अशाप्रकारे शाखेच्या या छोट्या उपक्रमात भूगोल पाठ्यक्रमातील नकाशावाचन व नकाशालेखन या विषयांचे अगदी सहज प्रशिक्षण झाले.

याशिवाय साप्ताहिक उपक्रमांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, १८५७ चे स्वातंत्र्ययुध्द इत्यादि विषयांवर वक्तृत्व स्पर्धा व वर्धिनीत म्हटल्या जाणाऱ्या गीतांवर गीत स्पर्धा घेण्यात आली. वक्तृत्व स्पर्धेच्या निमित्ताने न बोलणाऱ्या मुलीही पुढे येऊन बोलण्याचे धाडस आता करू लागल्या आहेत. पद्यस्पर्धेमुळे मुलींनी या गीताची ‘व्यक्तिव्यक्ति में जगाये राष्ट्रचेतना’ याची उत्कृष्ट तयारी केली होती. हे गीत मुलींनी शाळेत देखील सादर केले. ते शाळेतल्या शिक्षकांना इतके आवडले की, शिक्षक मुलींकडून हेच गीत सारखे म्हणून घेतात व इतर विद्यार्थ्यांना शिकवायला सांगतात.



**इथें एकता-वाद आता पुजावा । इथे द्वेष, विद्वेष केव्हा नसावा ॥**

दि. २६ व २७ डिसेंबर रोजी शाखेची व आजोळ शाखेची सहल एकत्र राजगडावर गेली होती. घोषणा देत, एकमेकांना सांभाळत, पद्य म्हणत अवघड वळणे पार करताना त्या काळी शिवाजी महाराज व त्यांचे मावळे हा गड घोड्यांवर बसून कसे चढत असतील, हा मुलींच्या चर्चेचा प्रमुख विषय होता. सर्वच ठिकाणी मोठ्या मुलींनी लहानांना सांभाळत व शिस्तीत गडभ्रमंतीचा आनंद लुटला. सहलीहून परत आल्यानंतर मुलींनी दिलेल्या प्रतिक्रियेतून सहलीबद्दल खालील प्रकारची भावना व्यक्त झाली.

**माझ्याकडून मिळालं मला माझंपण ।**
**मैत्रिणींकडून मिळालं सुख देणारं मन ।**
**राजगडाच्या प्रवासातून मिळालं ते 'आपलंपण'।**
**'स्व'-रूपवर्धिनी तुझ्याकडून मात्र मिळालं,**
**ते उत्तुंग आकांक्षांचे घर ।**

## युवती विभाग वृत्त

**या** वर्षी युवती विभागाचे काम सुरू करतानाच असे ठरवले होते की, वर्षभरात युवती विभागाचे काही वेगळे कार्यक्रम घ्यायचे व युवती शाखेमध्ये बाहेरील व्याख्यानांपेक्षा अंतर्गत विषय मांडणी व आपापसातील चर्चा यावर भर द्यायचा.

युवती गटाच्या मानसिक जडण-घडणीसाठी यावर्षी दर शनिवारी युवतींची मानसिक विकास बैठक सुरू झाली. या वर्षी १८५७ ते १९४७ या वि.स. वाळिंबेंच्या पुस्तकाचे वाचन व त्यावर चर्चा घेतली. त्याचप्रमाणे विनोबा भावे यांच्या 'मधुकर' या वैचारिक पुस्तकासारख्या काही पुस्तकांचे वाचन झाले.

युवतीशाखेमध्ये मैदानी खेळ, लेखांचे वाचन व काही विषयांवर चर्चा अशा कार्यक्रमांवर भर देण्यात आला. यामध्ये शिक्षणासंबंधीचे स्वामी विवेकानंदांचे विचार, स. ह. देशपांडे यांचे 'संघातील दिवस', 'दीपज्योती नमस्तुते' हे वंदनीय मावशी केळकरांचे चरित्र, तसेच 'माणसाला जेव्हा जाग येते' अशा पुस्तकांचे वाचन झाले. या वाचनाबरोबरच इ-मेल, वाय टू के समस्या व विवेक साप्ताहिकातील 'स्वातंत्र्याची ५० वर्षे : एक सकारात्मक दृष्टिकोन' या लेखांचे वाचन व चर्चा अशा स्वरूपाचे कार्यक्रम झाले.

**राजगड ते तोरणा :-**

दि. २९ डिसेंबर रोजी युवतींची एक साहसी सहल आयोजित केली. सहलीचा टप्पा राजगड ते तोरणा असा होता.

दि. २९ ला सकाळी राजगडकडे १७ युवतींच्या गटाने कुच केले. दु. ३.०० च्या सुमारास सर्व युवतीगट राजगडावर पोहचला. भोजनानंतर थोडी विश्रांती घेतल्यानंतर बालेकिल्ल्यावर रवाना झालो. बालेकिल्ल्यावरून परतत असताना अंधार झाला होता. आपल्या सर्व युवती कुठल्याही प्रकारची तमा न बाळगता झपाझप पावले उचलत होत्या परतल्यानंतर गडावर मोकळ्या हवेत प्रार्थना घेतली. आजूबाजूचे वातावरण आणि प्रार्थनेतला उत्कट भाव यामुळे सर्वांची मने एका धीरगंभीर उदात्त पातळीवर जाऊन स्थिरावली होती. प्रार्थना सुरू होताच आतली सर्व मंडळी बाहेर येऊन बसली. प्रार्थनेचा प्रभाव त्या सर्व मंडळींवर चांगला पडला. सारे स्तब्ध होऊन प्रार्थना ऐकत होते. प्रार्थनेनंतर इतर लोकांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन लगेच बदलला. हा गट केवळ मजा करायला आला नसून काहीतरी विशिष्ट हेतूने आलेला आहे, हे

**घडीनें घडी राष्ट्रकार्यार्थ लावी । बने दास त्याचा सदा काल भावी ॥**

त्यांना विशेष भावलं.

रात्री भोजनानंतर शेकोटीचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये 'डॅम्पशेल' हा खेळ घेण्यात आला. या खेळामध्ये अनेकांच्या कलागुणांना वाव मिळाला. दुसऱ्या दिवशी सकाळी सारेजण तोरण्याकडे जाण्यास निघालो.

अनेक वेळा राजगडवरून तोरणा पाहिला होता. व तोरण्यावरून राजगड पाहिला होता. पण राजगड ते तोरणा हा ट्रेक करण्याचा बेत पहिल्यांदा सर करत होतो. जंगल, दऱ्या व एकूण नऊ डोंगर पार करीत करीत आम्ही तोरण्याच्या कड्यापर्यंत पोहाचलो. हा कडा अतिशय अवघड होता. कडा पार करून आम्ही सारेजण गडावर पोहचलो. भोजन केल्यानंतर लगेचच तोरणा उतरायला सुरूवात केली. अंधार असल्याने रस्ता चुकलो. अर्ध्या जणी पुढे पोहोचल्या होत्या; मग गवत-झुडुपे जाळून इशारे देण्यात आले. काहीजणी परत आल्या. त्यांनी रस्त्याचे मार्गदर्शन केले. खाली पोहचता क्षणी 'सुवार्ता' मिळाली. बस गेली होती. त्यामुळे रात्री वेल्ह्यात मुक्काम केला. आणि दुसऱ्या दिवशी पुण्याला रवाना झालो.

**युवती विभाग मेळावा :-**

दि. १ जून १९८८ रोजी मुलींची भगिनी निवेदिता शाखा सुरू झाली आणि युवती विभागाचे स्वतंत्र काम सुरू झाले. १ जून २००० रोजी या विभागाच्या कामाला सुरुवात होऊन तब्बल १२ वर्षे पूर्ण झाली. म्हणजे जवळ जवळ एक तप पूर्ण झाले. या निमित्ताने सर्व युवतींचा मेळावा आयोजित केला.

संध्याकाळी ६.०० वा. वर्धिनीच्या इमारतीवर युवती मेळावा संपन्न झाला. एकूण ७० युवती या मेळाव्यास उपस्थित होत्या.

सुरुवातीला सर्व युवतींच्या परिचयाचे सत्र झाले. त्यामध्ये पूर्वी आपल्याच बरोबर शिकत असणाऱ्या आपल्या वर्गसख्या आता कुठल्या-कुठल्या क्षेत्रात, किती उंचीवर पोहचल्या आहेत, हे ऐकताना सर्व युवतींचे डोळे चमकून उठत होते.

परिचयाच्या सत्रानंतर युवतींचं अनुभवकथन व दैनंदिन जीवनात 'स्व'-रूपवर्धिनीच्या संस्कारांचा पडणारा प्रभाव अशी चर्चा झाली.

वर्धिनीत वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये अनेक कामं समूहाने करावी लागतात. मग ती सतरंजी धुणं असो की, वर्धिनीची इमारत स्वच्छ करणे असो ; या सर्व उपक्रमातून कुठलंही काम करण्याचे खोलवर संस्कार झाले व त्याचा उपयोग सासरी गेल्यावर कसा झाला, हे एका युवतीने सांगितले. वर्धिनीच्या शबिरात व्याख्यात्यांचे पत्ते शोधणे, त्याचप्रमाणे सहलींमध्ये माहिती नसलेले रस्ते शोधून काढणे, वेळेवर अनेक गोष्टींचे नियोजन करणे, झटपट निर्णय घेणे या सर्व गोष्टींचा पुढील जीवनात, देशभरात व इतरत्र फिरताना झालेला फायदा, अंगात उपजतच निर्माण झालेला निर्भीडपणा हे सगळं कसं उपयोगी ठरलं, हे अनेकींच्या अनुभवांतून समजले.

'स्व'-रूपवर्धिनीचं काम हे मुळातच समाजाभिमुख काम आहे. त्यामुळे अनेक उपक्रमांच्या निमित्ताने समाजातील अनेक घटकांना जाऊन भिडण्याचे, त्यांना बऱ्याच गोष्टी पटविण्याचे व अनेक मान-अपमान गिळण्याचेही प्रशिक्षण आपोआप मिळत असतं. त्यातूनच एक प्रकारचा कणखरपणा अंगात बाणू लागतो. या सर्व गोष्टींचा नोकरीत कसा उपयोग होतो किंवा काम करताना एखाद्याचे कठोर बोलणेही सकारात्मक दृष्टीने सहज सहन करण्याची क्षमता कशी येते, हे सांगताना युवतींच्या चेहऱ्यावर कृतकृत्य झाल्याचे भाव उमटले होते. या मनात रूजलेल्या आठवणींना उजाळा देताना सगळ्या युवती जुन्या

**करा कार्य मोठें, नको ती अहंता । कशाला कृतीची म्हणावीच संथा ॥**
**पुरा स्वार्थ जाळून तो भस्म लावी । बने दास त्याचा सदा काल भावी ॥**

दिवसांत कधी रमल्या हे कळलंच नाही. काही मुली लहानपणी किती सक्षम होत्या, त्यांची पटवून देण्याची क्षमता किती होती, हे सांगताना एका युवतीने रक्तदान शिबिराचे उदाहरण दिले. यावेळेस मुली सर्वांना जाऊन रक्तदानास प्रवृत्त करून घेऊन येत असत. अशाच दोन मुली रिक्षा स्टॅन्डवर गेल्या, रिक्षाचालकांना त्यांनी रक्तदानास प्रवृत्त केले व त्यांच्याच रिक्षात बसून त्या रक्तदान शिबिरात आल्या.

'खरं तर त्या मुली आज इथे नाहीत; पण अशा अनेक क्षमता अंगात असणाऱ्या आपण मुली एकत्र आलो' तर खरोखरच खूप काही करू शकतो, हे कथन करताना ही युवती एकदम भावनावश झाली व पुढे काही बोलूच शकली नाही. पण तिनं न बोलता सर्व काही युवतींपर्यंत प्रभावीपणे पोहोचवले होते व साऱ्यांमध्ये ही एकत्र येण्याची, स्वतःच्या क्षमता पडताळण्याची एक निराळी उर्मी निर्माण झाली.

कार्यक्रमाची सांगता बागेश्री पोंक्षें यांच्या भाषणाने झाली. भाषणात त्यांनी वर्धिनीच्या अनेक प्रकल्पांची माहिती तर सांगितली; पण त्याचबरोबर ह्या सर्व प्रकल्पात आपण कसे सहभागी होऊ शकतो, हेसुध्दा सांगितलं. चहापानानंतर असे नेहमीच एकत्र यायचे व काहीतरी विधायक काम सतत करायचे, असा निश्चय करून सर्व युवती बाहेर पडल्या.

**अन्य उपक्रम :-** १) गणेशोत्सव व संक्रांत उत्सव म्हणजे वर्धिनीच्या वर्षभराच्या कार्यक्रमातील सर्वोच्च मानबिंदूच होत. गणेश उत्सवात शिस्तबध्द पथक, पथनाट्य या बरोबरच इतर विधायक उपक्रम राबविणे ही काळाची आणि पर्यावरणाची गरज बनत चालली आहे व त्याच दृष्टीने एक छोटीशी सुरूवात म्हणून युवतीगटाने पथकाबरोबर निर्माल्याच्या संदर्भात एक छोटासा उपक्रम राबविला.

गेल्या दोन वर्षांपासूनच युवतीगट पथक सादर करीत आहे; पण ह्यावर्षी प्रथमच दगडूशेठ हलवाई सारख्या मानाच्या गणपती मिरवणुकीत रात्रभर शिस्तबध्द व वैविध्यपूर्ण पथक व स्वतःच्या क्षमता पडताळून पाहण्याची सुवर्णसंधी मिळाली.

गणपती विसर्जनाच्या दिवशी तुळशीबागेची मिरवणूक, संध्याकाळची मिरवणूक, रात्रीची दगडूशेठ गणपतीची मिरवणूक अशा पूर्णपणे भरगच्च कार्यक्रमांतही युवतीगटाचे चार भागात विभाजन करून प्रत्येक पथकांची जबाबदारी काही ठराविक युवतींना देऊन इतर युवतींना निर्माल्याचा उपक्रम दिला. यासाठी आधी पूर्वतयारी केली होती. अहिल्यादेवी शाळेत जाऊन निर्माल्य आणि गांडूळखत प्रकल्पाची माहिती व प्रशिक्षण काही युवतींनी घेतले. त्याचबरोबर काही गणपती मंडळाशी चर्चा झाली. त्या मंडळांनी निर्माल्य उपक्रमात सहभाग घेतला व अशाप्रकारे संगम पूल व पर्वती भागात शाखेतील काही वर्धकाच्या साहाय्याने हा उपक्रम यशस्वी झाला. अनेक गणेश-भक्तांनी निर्माल्य अत्यंत विश्वासाने आपल्याकडे सुपूर्त केले. काही अंशाने का असेना पण पर्यावरणाच्या दृष्टीने ही एक चांगली गोष्ट झाली. पथकांतील मिरवणुकीतील शिस्तीबरोबरच, पर्यावरणाच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने ही शिस्त अंगी बाणविण्याचा हा एक छोटासा प्रयत्न यशस्वी झाला.

२)या वर्षी युवतीशाखेत काही छोट्या विषयांवर युवतींचे बोलणे असा नवीन उपक्रम सुरू झाला. त्यामध्ये अपेक्षा, स्वप्न, मन, आजचे घर, आजची कुटूंब व्यवस्था, मी शिक्षक झाले तर, आजचा भारत, आजची तरूणपिढी, हरितक्रांती, भारताचा निर्यात व्यापार, माझ्या भविष्याची कल्पना, भ्रष्टाचार, आतंकवाद / दहशतवाद अशा अनेक विषयांवर युवती

> **नसे कार्य हें थोडक्याशा श्रमाचें । नसे कार्य हें एक वा दो दिसांचे ।**
> **असो याच कार्यांत सातत्य जेणें । बने कोळि वाल्मीकि दिव्य प्रभेनें ॥**

बोलल्या. 'अग्निपंख या पुस्तकाचे सामूहिक वाचन झाले.

या वर्षीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्क अभियानामध्येही युवती गटाचा सक्रीय सहभाग होता. युवती गटाला ताडीवाला रोड, डी.पी. रोड, पोलीस लाईन, व काही मुलींचे वसतीगृह अशा अनेक ठिकाणचा संपर्क करायला सांगितले होते.

यातील एक अनुभव अतिशय बोलका आहे. एक युवती एका घरात गेली असता तिच्या लक्षात आले की हे घर अनुकूल नसावं. तिने संघाच्या कामाची पूर्ण माहिती सांगितली व भारतमातेचा स्टिकर्स लावू का? अशी विचारणा केली. तिला अशी अपेक्षा होती की, कदाचित नकार येईल. पण उलट त्या घरातील व्यक्ती म्हणाल्या 'हो! निश्चितच लावा अखंड भारताचा आहे ना? आणि आम्हीही त्याच भारतात राहतो. त्यामुळे लावलेच पाहिजे'.

या संपर्क मोहिमेत अनेक मजेशीर व उपयुक्त अनुभव आले. अनेकांपर्यंत 'स्व'-रूपवर्धिनीचे काम पोहचविता आले व युवतींचे संभाषण कौशल्यहि पणास लागले.

### यशाचा पाटलाग करणारी छाया !




एखाद्या व्यक्तीला मिळणारे यश हे खूपदा या तीव्र स्पर्धेच्या युगात अनेकांना नगण्य वाटतं. पण त्या यशामागचे धडपड जेव्हा सर्वांच्या समोर येते, तेव्हा त्याचे महत्त्व अधिक वाटते. शाखेचे आणि आजोळचे काम सातत्याने करणारी छाया गायकवाड. तिने १० वी पासून ते थेट एम.ए पर्यंत 'प्रथम श्रेणी' कधीच सोडली नाही व आता तर ती 'सेट'ची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. तेव्हा तिचा पुष्पगुच्छ देऊन नुसता सत्कार न करता तिच्या एकूण शिक्षणाचा प्रवास कसा झाला व हा यशाचा टप्पा तिने कसा गाठला, हे सर्व तिच्याच तोंडून ऐकताना मुलींचे डोळे पाणावत होते. सहज वाटणाऱ्या यशामागच्या धडपडीने, जिद्दीने सर्वांनाच हेलावून टाकले.

## मुलांचा शाखाविभाग

**संक्रांत उत्सव :-**

दि. २३ जानेवारी, २००० या दिवशी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत नूतन मराठी विद्यालयात शाखा विभागाचा उत्सव साजरा झाला.

या वर्षीच्या संक्रांत प्रात्याक्षिकांचा विषय 'राष्ट्रभक्तीपर समूहगान' हा होता. देशभक्तीचा भाव जागविणारी गीतं, भक्तिगीतं, भावगीतं आणि चित्रपटगीतंही युवकांनी निवडली होती.

या प्रात्याक्षिकांतून कारगिलच्या युध्दभूमीवरील जवानांची संघर्षमय कहाणी, प्रेरणादायी भूपाळी, अभंग, पोवाडे, 'वेडात मराठे वीर दौडले सात' हे गीत, 'वंदे त्वां भूदेवी आर्यमातरम्' हे संस्कृत पद्य, लोकसंगीतातील निवडक गीतांचं सादरीकरण आणि सर्वात शेवटी 'जयतु शौर्यशालिनी' हे तेजस्वी गीत अशी एकूण सात प्रात्याक्षिकं सादर करण्यात आली.

या कार्यक्रमात वर्धिनीच्या वार्षिक कार्यवृत्ताचं सादरीकरण अत्यंत वेगळ्या पध्दतीनं झालं. वर्धिनीच्या प्रचाराकरिता, निधीसंचयाकरिता किशाभाऊ पटवर्धन

**तुम्ही नित्य कार्यात त्यागी असावे । सदा शिस्त पाळावयाला झटावे ॥**
**न पेंढार राष्ट्रास हो साह्यकारी । वरा शिस्तिचा मार्ग जो हा दुधारी ॥**

व ज्ञानेश पुरंदरे अमेरिकेत आले आहेत. त्या निमित्तानं ज्ञानेश पुरंदरे यांच्याकडून गतवर्षभरात झालेल्या वर्धिनीच्या वाटचालीचं वृत्त चौघे अनिवासी भारतीय ऐकत आहेत. यातूनच वर्धिनीचं वार्षिक कार्यवृत्त अत्यंत अभिनव पध्दतीनं सर्व प्रेक्षकांसमोर मांडलं गेलं.

इलेक्ट्रॉनिक्स कमिशनचे माजी अध्यक्ष डॉ. प्रभाकर देवधर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. त्यांनी भारत कशाप्रकारे महासत्ता बनू शकेल व त्यासाठी आपण किती व कसे प्रयत्न केले पाहिजेत, याविषयी मार्गदर्शन केले.

गेली काही वर्षे 'वंदेमातरम् एक शोध' या विषयाचा ध्यास घेऊन याच नावानं एक पुस्तक लिहिणारे वर्धिनीचे एक निकटवर्ती मिलिंद सबनीस यांचा याच कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

**समर्थ रामकृष्ण शाखा**

गेल्या वर्षीच्या मकर संक्रमण उत्सवात शाखेने 'अभिनय गीते' सादर केली.

१० जानेवारी रोजी इयत्ता ९वी आणि १०वीच्या वर्गांची पालकसभा झाली. शाखेच्या मोठ्या गटाने याच महिन्यात पुणे विद्यापीठात भरलेल्या भारतीय विज्ञान परिषदेच्या अधिवेशनाला भेट दिली. तेथील शास्त्रीय प्रदर्शन मुलांनी अतिशय चौकसपणे व उत्सुकतेने पाहिले.

फेब्रुवारी महिन्यात अनेक कार्यक्रम झाले. उदा. विमान पडते आहे, वादविवाद, प्रश्नमंजुषा (इतिहास, भूगोल), सानेगुरूजी कथाकथन, शुध्दलेखनाचेही तास झाले.

मार्च महिन्यात 'श्री गुरूजींचे प्रेरणादायी चरित्र प्रशांत हिंगे यांनी वर्धकांसमोर मांडले. याच महिन्यात शाखेची सराव परीक्षा झाली व त्यानंतर मौनाभ्यास सुरू करण्यात आला. परीक्षेमुळे या महिन्यात कार्यक्रम झाले नाहीत. फक्त अभ्यासावर भर देण्यात आला.

एप्रिल महिन्यात मुलांच्या परीक्षा झाल्यानंतर १०वी च्या विद्यार्थ्यांनी मुलांच्या अनेक स्पर्धा घेतल्या. ( उदा. वादविवाद, प्रश्नमंजुषा, चित्रकला, नाट्यस्पर्धा इ.) या महिन्यात शिबिरे झाली. शिबिराची व्यवस्था शाखेकडे होती. शिबिराच्या व्यवस्थेचा विचार चार महिने आधीपासूनच सुरू केला होता. गुढीपाडव्याच्या दिवशी ओंकारेश्वर मंदिरात ओंकार उपासनेसाठी २० युवक उपस्थित होते.



शाखेची वार्षिक नियोजन बैठक १५ जून रोजी झाली. शाखेच्या निवड चाचण्या झाल्या. त्यात नवीन २५ मुलांची निवड झाली, तसेच शाखेतील काही मुलांना काही निश्चित उद्दिष्ट्ये देऊन प्रगती करण्याचा आग्रह धरण्यात आला. या महिन्यात सर्व व्यवस्थांचे काटेकोर नियोजन व त्यानुसार कृती करण्याचा प्रयत्न झाला.

शाखेच्या शैक्षणिक वर्षातील पहिला कार्यक्रम म्हणजे गुरूपौर्णिमा. हा कार्यक्रम सुरूवातीला इयत्ताशः करण्यात आला व नंतर एकत्रित करण्यात आला. त्याला प्रमुख वक्ते म्हणून सुरेशराव परचुरे उपस्थित होते. दि. २६ जुलै रोजी कारगिल दिन साजरा करण्यात आला. विषय युवकांनी सविस्तरपणे मांडला. त्याबाबत मुलांची अतिशय चांगली प्रतिक्रिया झाली. या महिन्यातच तीन गटाच्या अत्यंत चुरशीच्या कबड्डी स्पर्धा झाल्या.

१५ ऑगस्टला झालेल्या भागशः स्पर्धांमध्ये शाखेने लंगडीत विजेतेपद मिळविले. याच महिन्यात चांदणी भोजन झाले. तेव्हा शाखेच्या स्पर्धेचे बक्षिस

**जनाशी सदा गोड शब्दे वदावे । जनीं शुध्द सौजन्य ते दाखवावे ॥**
**स्पृहा नित्य व्हावी असें शील ठेवी । अशाचेच 'नेतृत्व' होतें प्रभावी ॥**

वितरण झाले व 'कमांडो' हा चित्रपट दाखविण्यात आला. या महिन्यात गणेशोत्सवाच्या पथकांची तयारी सुरू झाली. पथक प्रमुख म्हणून अभिषेक तांबट यांची नेमणूक करण्यात आली. पथकाचे वैशिष्ट्य म्हणजे मिरवणुकीत बोधप्रद फलकांचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर 'वंदेमातरम्' या विषयावर पथनाट्य पाच मंडळांसमोर सादर करण्यात आले व त्याला सर्वांकडून प्रचंड व उत्तम प्रतिसाद मिळाला.

२८ सप्टेंबरला शाखेची पालकसभा झाली. वक्ते होते संजय तांबट. १७ सप्टेंबरला शिक्षक प्रशिक्षण वर्ग झाला. त्याला ४ युवक व १ शिक्षक उपस्थित होते. या महिन्यात संदीप होनराव या युवकाने 'गुरूकुल' हा विषय मांडला आणि समित शिंदे याने 'ऑलम्पिकचा इतिहास' या विषयावर मुलांना सविस्तर माहिती दिली.

दि. २३ सप्टेंबर रोजी शाखेचा चांदणी भोजनाचा कार्यक्रम झाला. यात प्रश्नमंजुषा, प्रसंगनाट्य आणि वैयक्तिक गुणदर्शन हे कार्यक्रम अत्यंत उत्तम झाले. याला चांगला प्रतिसाद मिळाला. ऑक्टोबर महिन्यापासून समतेचे तास नियमित होतात. त्याचा मुलांवर योग्य तो परिणाम जाणवला.

१ ऑक्टो. ते ३ ऑक्टो. या दिवसात शाखेची सहामाही परीक्षा झाली. त्यानंतर लगेचच सुटीमध्ये मुलांच्या वेगवेगळ्या मैदानी व बाध्दिक स्पर्धा झाल्या. (उदा. सूर्यनमस्कार, समता, निबंध, लेखन, बुध्दिबळ, चित्रकला, भेटकार्ड बनविणे, हस्ताक्षर इत्यादी) दिवाळीत झालेल्या स्पर्धांचे बक्षिस समारंभ ९वीच्या मुलांकडे सोपविण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून शिरीष पटवर्धन यांनी 'स्पर्धा' विषयांवर मार्गदर्शन केले. दि. २३ ते २५ ऑक्टोबर या काळात शाखेची सहल राजगडावर गेली होती. संख्या ४५ होती.

लहान व मोठ्या गटाचे एम.आय.टी. शाळेत हिवाळी शिबीर संपन्न झाले. त्यात एकूण ३२ मुले, ८ युवक सहभागी होते. हस्ताक्षर या विषयावर नाना लाभे यांचे व्याख्यान झाले.

डिसेंबर महिन्यात 'मोडी लिपी'चे तास सुरू करण्यात आले आहेत. तसेच मुलांचे वाचन सुधारण्यासाठी सामूहिक वाचनाची योजना दर शनिवारी करण्यात आली आहे.

## स्वामी विवेकानंद शाखा

**मैदान विभाग -** प्रत्येक वर्धक किमान ४० जोर मारू शकतो, इतकी शारीरिक क्षमता प्रत्येक वर्धकामध्ये निर्माण झाली आहे. मे महिन्याच्या व दिवाळीच्या सुटीत विविध मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात स्लो व फास्ट सायकलींग, बॅडमिंटन, धावणे दंड-रिंग इ. विषयांचा समावेश होता. समतेच्या तासिका ऑक्टोबर महिन्यापर्यंत नियमितपणे झाल्या.

१५ ऑगस्टला भागशः लंगडी व कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये भाग २ च्या दोन्ही स्पर्धा विवेकानंद शाखेने जिंकल्या आणि भाग २ च्या युवकांनी अंतिम सामना जिंकला. गणपती उत्सवासाठी या वर्षी शाखेने लेझीम पथक बसविले होते.

**तासिका विभाग -** यंदा शाखेच्या वर्धकांना सरासरी ६५% गुण मिळाले. मार्च व ऑक्टोबर महिन्यात विज्ञान व गणित यज्ञ झाले.

**संपर्क विभाग -** संपर्कातून पुढील मुद्दे समोर आले. वर्षभरात वर्धकांकडे संपर्क चांगला झाला. संपर्काच्या वेळी अभ्यास कमी, खेळ जास्त अशी पालकांची तक्रार, अनेक वर्धकांमध्ये नम्रतेचा अभाव, शिस्तीची अधिक गरज जाणवली होती.

**जगाला खरी शर्करा आवडेल । परी द्यावयाचें जरी कोयनेल ॥**
**तरी शर्करा वेष्टुनी तेच द्यावे । असें युक्तिनें सत्य मार्गास न्यावें ॥**

**कार्यक्रम विभाग -** दैनंदिन कार्यक्रम - १) पद्य, २)पाढे, ३)शिवतांडव स्तोत्र पाठांतर साप्ताहिक - १)अभ्यास कौशल्ये, २)संभाषण कौशल्ये, ३)व्यक्तिमत्व विकास तासिका, ४)जिज्ञासा - समाधान



मासिक कार्यक्रम -

१)बौध्दिक स्पर्धा, २) प्रश्नमंजुषा, ३)नाट्यस्पर्धा, ४)गटचर्चा, ५)पद्यस्पर्धा, ६)विमान पडते आहे. ७)व्याख्यान प्रदर्शन भेटी, तसेच बालचित्रपट, १) पदभ्रमण,ढाक बहिरी २) वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला नरवणे सरांनी मार्गदर्शन केले. ३) सार्वजनिक गणेशोत्सवाच्या वेळी चार मंडळांसमोर शाखेने "स्वदेशी" विषयावरचे पथनाट्य प्रभावीपणे सादर केले

## स्वामी अखंडानंद शाखा

**मैदान व्यवस्था -** एप्रिल-मेच्या उन्हाळी सुटीमध्ये वेगवेगळ्या मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात मुलांनी अतिशय उत्साहाने भाग घेऊन स्पर्धामधील चुरस वाढवली.

१५ ऑगस्टला जेव्हा भागशः कबड्डी व लंगडीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यावेळी युवकांनी मोठ्या गटाच्या मुलांच्या कबड्डीच्या संघाला रोज अर्धा तास मार्गदर्शन केले व मुलांनी मार्गदर्शनाचा पुरेपूर फायदा घेवून सर्व सामने मुलांनी मोठ्या फरकाने जिंकले.

दिवाळीच्या सुटीनंतर मैदान समिती स्थापन झाली. त्यात मुलांकडे मैदानाचे सर्व कामकाज वाटून दिले. त्यामुळे मैदानात उत्साह पुन्हा संचारला. आता सर्व मैदानाचे सर्व काम मुले करतात. त्यांच्यात नेतृत्व कौशल्य वाढले.

**कार्यक्रम विभाग -** यावर्षीची संक्रांत उत्सवाची जबाबदारी संपूर्णपणे शाखेकडे होती.

उन्हाळ्याच्या सुटीमध्ये विविध बौध्दिक कार्यक्रम झाले. त्यामध्ये चार गट पाडून प्रश्नमंजुषा, वादविवाद, प्रसंगनाट्यस्पर्धा, पद्यस्पर्धा, खजिनाशोध या स्पर्धा झाल्या. सर्व कार्यक्रम नियोजनबध्द झाल्यामुळे सुटी असूनही मुलांची भरपूर उपस्थिती होती.

ऑगस्टमध्ये शाखेचा गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम झाला. यावर्षी प्रथमच गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेण्यात आला. कार्यक्रमामध्ये मुलांनी 'गुरूचे महात्म्य' हे नाटक सादर केले. या कार्यक्रमासाठी सर्व पालकांनाही निमंत्रित केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे सु. ह. जोशी होते.

दिवाळीच्या सुटीत झालेल्या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण प्रदीपराव आगाशे यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे या कार्यक्रमामध्ये प्रास्ताविक, पद्य, मनोगत, सूत्रसंचालन, समारोप इत्यादि सर्व वर्धकांनीच यशस्वीपणे पार पाडले.

हिवाळ्यात झालेल्या शिबिरातही लहान गटात शाखेची २९ संख्या होती व मोठ्या गटात १७ जण उपस्थित होते. यावर्षी शाखेवर झालेली व्याख्याने :-



| | |
|---|---|
| वाचन | : डॉ. देवपुरकर |
| एकाग्रता | : ज्ञानेश पुरंदरे |
| सुभाषचंद्र बोस | : ज्ञानेश पुरंदरे |
| देशभक्तीच्या कथा | : दि. दा. जोशी |
| आदर्श | : डॉ. प्रदीप आगाशे |
| गुरूपौर्णिमेचे महत्त्व | : सुहास जोशी |
| हस्ताक्षर | : नाना लाभे |

सदा शब्द तोलून वाचे वदावे । असे जें मनी तेच लोकां कळावे ॥
सदा भावनेचे कुठेही फवारे । उगा शिंपुनी कां मुखा शीण द्या रे ।

**सहली :-** उन्हाळ्याच्या सुटीत राजमाची येथे सहल गेली होती. सहलीमध्ये रोहित थोरात या वर्धकाच्या पायावर दगड पडला होता, तेव्हा युवकांनी त्याला उचलून खालपर्यंत आणले.

कात्रज येथील दूध डेअरी येथेही मुलांची अभ्यास सहल गेली होती.

त्यानंतर सिंहगड येथेही सहल गेली होती. या सहलीत लहान गट बसने व मोठा गट सायकलने गेला होता.

**संपर्क व्यवस्था :-** नियोजित वेळापत्रक आखून त्याप्रमाणे संपर्क झाला. महिन्यातून प्रत्येक मुलाकडे एकदा तरी संपर्क होई. तसेच शिक्षकांकडेसुध्दा संपर्क होता. नवीन मुलांच्या घरून संपर्कात प्रतिसाद मिळाला. संपर्कात काही गोष्टी आढळून आल्या. विशेषतः काही मुलांनी न विचारता खासगी शिकवणी वर्ग लावले होते. त्यातील ८० टक्के मुलांनी संपर्कानंतर ते बंद केले.

संपर्काच्या सोयीसाठी मुलांचे सहा गट पडण्यात आले व प्रत्येक गटाला एक युवक गटशिक्षक म्हणून नेमण्यात आले.

**विशेष घटना :-** मार्चमध्ये जुन्या युवकांकडे संपर्क झाला. शाखेवर येणाऱ्यांची संख्या त्यामुळे वाढली. १२वीच्या परीक्षेत संदेश आंबेकरला ८९.५% व ग्रुपमध्ये ९५% गुण मिळाले शाखेत मोठ्या उत्साहाने अभिनंदन करण्यात आले. तसेच जूनमध्ये प्रार्थना झाल्यानंतर दररोज सर्व युवक एकत्र येऊन इंग्रजी संभाषण करीत होते. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेविषयी मार्गदर्शन व इतर स्पर्धा परीक्षा याबाबत मार्गदर्शन व्हावे, याबाबत पालकांनी सूचित केले.

## स्वामी सुबोधानंद शाखा

**मैदान व्यवस्था :** शाखांतर्गत झालेली युवकांची कबड्डी स्पर्धा शाखेवर घेण्यात आली. त्यामध्ये सर्व शाखांचे मिळून ५० युवक उपस्थित होते. त्यामध्ये शाखेचा प्रथम क्रमांक आला. त्यानंतर शाखेच्याच मुलांचे तीन गट करून क्रिकेट स्पर्धा, फुटबॉल स्पर्धा व विविध स्पर्धा घेतल्या गेल्या. साधारण महिन्यानंतर विविध प्रकारची योगासने चैतन्य भारंबे यांनी शिकवली. सुटीमध्ये कबड्डी, खोखो, लंगडी यांच्या मॅचेस झाल्या. एक ते दीड महिना ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांना दंड प्रशिक्षणाची प्राथमिक तयारी करून घेतली. शाखा भरविणे, आज्ञा देणे, याचे ६ ते ७ जणांना विशेष प्रशिक्षण दिले. मैदानावर शिट्टीचा वापर कसा करावा याचे प्रात्याक्षिक दाखवून त्याचा सराव घेतला गेला. तसेच युवकांनी आदर्श शाखा कशी भरवावी, हे सप्रात्याक्षिक दाखविले.

मैदान विभागातच विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यासाठी तीन महिन्यातून एकदा अशा प्रमाणात एक दोन आठवडे संपूर्ण मैदानाची पूर्ण व्यवस्था ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांकडे सोपवली होती.

**तासिका विभाग :-** तासिका विभागाचाच एक भाग म्हणून जुलै-ऑगस्टच्या दरम्यान शिक्षक मेळावा घेण्यात आला. सर्व शिक्षकांचा एकमेकांशी परिचय, शाखाकार्याची ओळख व तासिकांच्या रचनेत आवश्यक फेरबदल करण्यासाठी मुख्यतः हा मेळावा घेण्यात आला. शिरीष पटवर्धन सरांनी शिक्षकांसमोर शाखेत काय व का शिकवावे यासंबंधी विचार मांडले.

केंद्रीय शिक्षक प्रशिक्षण वर्गाला तीन शिक्षक उपस्थित होते. शाखेतच शनिवार-रविवार सर्व विद्यार्थ्यांचा निवासी वर्ग घेऊन त्यामध्ये संदीप मोरे यांनी अभ्यासाची गोडी व अभ्यासाची पध्दती याविषयी माहिती दिली.

तासांना सुरूवात होण्यापूर्वी मनाचे श्लोक,

> जिथे योग्य जे तेच तेथे कथावें । कळे ना कुणा ते न केव्हां भकावे ॥
> असे रूग्ण पोळी तयाला कशाला ? । तया औषधे द्या, मुसुंबी रसाला ॥

एकात्मता मंत्र, व अथर्वशीर्ष पाठ करणे असाही एक उपक्रम घेण्यात आला.

**संपर्क विभाग** - शाखा प्रमुख व अन्य युवक यांच्यामार्फत आठवड्यातून दोन दिवसच संपर्क व्हायचा. मात्र पुढे-पुढे भागशः प्रमुख व अन्य युवकांच्या साहाय्यानेच संपर्क सुरळीत झाला. महिन्यातून दोनदा प्रत्येकाकडे संपर्क झाला. यामध्ये वर्धक, युवक, शिक्षक, तसेच अनियमित वर्धक युवक व अन्य संबंधित व्यक्तिंकडे संपर्क झाला.

**कार्यक्रम विभाग** - कार्यक्रमांमध्ये शाखेत प्रार्थना झाल्यानंतर सुभाषित पाठांतर, पद्य पाठांतर, श्लोक पाठांतर, बोधकथा सांगणे, बातम्या सांगणे, असे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. साधारण वर्षभरामध्ये ७-८ व्याख्याने सत्र झाली. ती खालीलप्रमाणे-

राहूल ढोरे (१०वी) -कुस्तीची माहिती व शंका समाधान,
विनायक गोगटे - छत्रपतींचे स्वराज्य व सध्याची गरज (स्वदेशीची आवश्यकता - शिवराज्याभिषेक दिनी),
सौ. संजीवनी महाजन - संगणकाची वाढती कक्षा,
श्री. कुलकर्णी - बहारीन व तेथील जीवनशैली,
कृ.ल. पटवर्धन - क्रिकेटचे दुष्परिणाम,
ऋषीकेश कुलकर्णी - गुरूपौर्णिमेचे महत्व,
नाना लाभे - सुंदर हस्ताक्षर,
अजित नाईक - मर्मस्थानांची ओळख

शाखेत घेतली जाणारी मानसिक विकास बैठक दर चौथ्या रविवारी पुण्यातील मंदिरे व ऐतिहासिक ठिकाणी घेतली गेली. त्यामध्ये पर्वती, चतुःश्रृंगी, तळजाई, ओंकारेश्वर, पाताळेश्वर अशा ठिकाणी बैठक झाली. चतुःश्रृंगीला सकाळी ६.३० वाजता श्रीहर्ष सगरे बैठकीला उपस्थित होते व त्यांनी 'यू कॅन विन' या पुस्तकाचे मार्मिक पध्दतीने विवेचन केले.

शनिवारच्या कार्यक्रमांमध्ये ऋषीकेश कुलकर्णीने पु.ल.देशपांडे यांच्या शैलीत त्यांच्या 'म्हैस' या कथेचे वाचन केले व प्रात्याक्षिक दाखविले. तसेच अंतू बर्वा या व्यक्तिरेखेचे सादरीकरणही केले. पु.लं.ना. श्रध्दांजली म्हणून 'रावसाहेब' व 'ताल्या' ही पात्रे मुलांना टेपवर ऐकवली. अखंडानंदवरील राम इंचुरे याने(१३वी कला शाखा) 'वऱ्हाड निघालंय लंडनला' हा एकपात्री प्रयोग सादर केला.

जुलै महिन्यात शाखेच्या वर्धापनाच्या पूर्वी युवक व वर्धकांचा स्नेहमेळावा विशेष संपर्क करून घेण्यात आला. २५ जणांच्या (५३पैकी) उपस्थितीत हा मेळावा पार पडला. सुधाकरराव मुळे मार्गदर्शनाला आले होते. शाखेचा वर्धापन दिन १४० जणांच्या उपस्थितीत पार पडला. याबेळी प्राचार्य विवेक पोंक्षे यांनी 'स्वप्नांची भरारी' याविषयी कुतहूल निर्माण केले. स्वदेशीचा पुरस्कार व सरासरी ७० % गुण असा संकल्प या प्रसंगी करण्यात आला. याच कार्यक्रमांमध्ये पालकांतर्फे मनोगत व्यक्त करताना नामदेव टेमघरे यांनी शाखेची प्रशंसा व युवकांच्या उत्तम संपर्काविषयी आपले मत मांडले. रोहन देशमुख (इ.५वी) याने कविता वाचन करून सर्वांना थक्क केले.

वर्षभरात एकच पालकसभा होऊ शकली. त्यामध्ये ज्ञानेश पुरंदरे यांनी वर्धकाचे घरातील लाड व त्याचा दुष्परिणाम याविषयी पालकांना जागृत केले. व सौ. गोगटे (९वी इंग्रजी शिक्षिका) यांनी मुलांच्या अभ्यासातील प्रगतीबाबत सांगितले.

**कुणासाठिं ना कार्य केव्हां अडावे । सवें येति त्यांना धरोनी चढावें ॥**



सर्व युवकांची मिळून एक दिवसाची सायकलवर सिंहगडला सहल गेली होती.

गणेशोत्सवात अवघ्या १५ पालकांच्या आर्थिक साहाय्याने सर्व मुलांसाठी शाखेचा गणवेष तयार करण्यात आला. दिवाळीमध्ये युवक व वर्धक यांच्या साहाय्याने शाखेचा 'सुबोध' नावाचा दिवाळी अंक काढण्यात आला. यावरोबरच दिवाळीत एक मिनिटाच्या १५ ते २० स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावरोबरच शंका समाधान, वादविवाद व. मी शाखा प्रमुख झालो तर, यावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्वदेशी वस्तूंची यादी सर्वांना देण्यात आली आहे. दिवाळीतच सर्वांना राजा केळकर संग्रहालय व 'सोल्जर' हा इंग्रजी चित्रपट दाखविण्यात आले.

## स्वामी योगानंद शाखा

**मैदान विभाग -** उन्हाळ्याच्या सुटीत फुटबॉल या खेळावर विशेष भर दिला. त्यामुळे शाखेतील विद्यार्थी शाळेतील खेळात चमकले. मुलांनी शालेय स्तरावर सूर्यनमस्कार व जोर मारण्याच्या स्पर्धेत उत्तम कामगिरी केली. हनुमान जयंतीस साडेसहा हजार जोर मारण्यांचे उद्दीष्ट पूर्ण केले. मे महिन्यामध्ये इ. ५वीने मैदान विभाग सांभाळला.

**तासिका विभाग -** सुरुवातीपासूनच नियोजन उत्तम होते. सुरुवातीला तासिका चांगल्या झाल्या. पण नंतर काही इयत्तांच्या तासिकांमध्ये खंड पडला. दैनंदिन नियमित तासिकांमुळे संपर्कातल्या अडचणी कमी झाल्या. परीक्षेतही बऱ्याच जणांना चांगले यश मिळाले.

**संपर्क विभाग -** वर्षाच्या सुरुवातीला इयत्ताशः संपर्काची रचना करण्यात आली. संपर्काचे प्रमाण चांगले होते. तरी आवश्यक बदल घडविण्यासाठी गटशः संपर्क युवकांना वाटून देण्यात आला.

**संपर्कातील विशेष अनुभव :** काही पालकांचा मुलांसंबंधी निराशावादी दृष्टिकोन जाणवला. मुलगा हुशार असूनही क्लास लावण्याबाबियी काही पालक फारच आग्रही वाटले.

**वर्षभरात झालेली व्याख्याने -**



भारतीय संस्कृतीचा अभ्यास - हरि नारायण कुलकर्णी,
मंदिरांचा व्यवहारात उपयोग- हरि नारायण कुलकर्णी,
सूर्यनमस्कार - जयंत कवटेकर
अभ्यास कसा करावा - भरत देसाई,
वर्धिनीच्या व्यवस्था विभागाचे प्रयोजन - ज्ञानेश पुरंदरे.

**कदा चूक कार्यांत हातून झाली । अशी बांधवानें तुला दाखवीली ॥**
**तरी ती चुकी मान्य आहे म्हणावें । न हेका धरोनी कधींही बसावे ॥**

हस्ताक्षर सुधारणा - नाना लाभे,
विज्ञानयुग व आपण - डॉ. देवपूरकर
डॉ पूर्णपात्रे यांच्या जीवनाविषयीच्या अनुभवांवर आधारित पुस्तकाचे वाचन

**वर्षभरात झालेले अन्य कार्यक्रम**

सहल- सिंहगड ते पुरंदर पदभ्रमण

**साप्ताहिक बातम्या -** दर शनिवारी आठवड्यातील महत्त्वाच्या बातम्या सांगितल्या जातात. तसेच शाखेतील काही अविस्मरणीय प्रसंगांचे कथन केले जाते.

**विविध स्पर्धा -** 'समर्थ नाव', वादविवाद, पद्यअंताक्षरी इ. अनेक स्पर्धा उन्हाळ्याच्या व दिवाळीच्या सुटीत घेण्यात आल्या.

**शिक्षक मेळावा -** सर्व शिक्षकांचा एकत्र कार्यक्रम घेतला होता वर्धिनीतील शिक्षकांकडून अपेक्षा, शिकवण्यातील अडचणी, मुलांचे काही अनुभव,इ. विषयांवर मनमोकळी चर्चा झाली.

**शाखा वर्धापनदिन कार्यक्रम -** शाखेचा वर्धापनदिन नेहमीपेक्षा थोडा वेगळ्याप्रकारे पाताळेश्वराच्या मंदिरात सकाळी साडेसहा वा साजरा केला. याचे वैशिष्ट्य म्हणजे कोणीही बाहेरचे वक्ते बोलावले नव्हते. मुलांनीच खालील विषय मांडले.

वर्धिनी कशासाठी? - आनंद काशिद,
शाखेचे महत्त्व - असीम पाळंदे,
आदर्श वर्धक - राकेश चाळके, •

याच निमित्ताने एका मेळाव्याचे आयोजन केले होते. आत्तापर्यंत शाखेत येऊन गेलेल्या सर्व नव्या-जुन्यां विद्यार्थ्यांचा मेळावा सायंकाळी घेण्यात आला. या मेळाव्यामुळे ९ मुले पुन्हा नियमित येऊ लागली. मेळाव्याची उपस्थिती ७६ वर्धक, १० युवक.

**पालकसभा :-** ५वी, ८वी व ९वीच्या पालकांसाठी स्वतंत्र सभा घेण्यात आल्या, तर संपूर्ण शाखेतील पालकसभेला डॉ. देवपूरकर यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये खालील मुद्यांवर सविस्तर बोलणे, अनुभव कथन व चर्चा झाली.

* पालकांची मानसिकता,
* पालकांनी मुलांविषयी घ्यावयाची काळजी,
* मुलांचा अभ्यास कसा असावा?
* अभ्यासाचे सूत्र : वाचन-विचार-अभ्यास,

**विशेष प्रसंग :-** शाखेचा वर्धक प्रीतम आगवणे यांची सातारा येथील सैनिकी शाळेत निवड झाली. 'नेस्पा' हस्ताक्षर स्पर्धेत गणेश जसवंते याला पारितोषिक मिळाले.

**शाखेचा एक वर्धक आजारी होता. त्यामुळे त्याला शाखेत यायला मिळाले नाही. शाखेत गेला नाही तर काय होईल, असा डॉक्टरांनी प्रश्न विचारला, तेव्हा तुम्ही जर आमची शाखा पाहिली तर तुम्हीही आमच्या शाखेचे कार्य कराल, असे आत्मविश्वासपूर्वक त्याने डॉक्टरांना उत्तर दिले.**

## अभेदानंद शाखा

यावर्षी शाखेचे उद्दीष्ट काय असावं हे ठरवण्यात आले. यावर्षी शाखेचा निकाल सरासरी ६० टक्के लागला पाहिजे व प्रत्येक विद्यार्थ्याला किमान २५ ते ५० जोर मारता आले पाहिजेत. त्यादृष्टीने कामाला सुरूवात झाली.

शाखेचा पट ३५ निश्चित करण्यात आला व पहिल्यांदा वर्गशः संपर्क रचना करण्यात आली होती. एका वर्गावर एक शिक्षक असायचा. त्या शिक्षकाने त्यांची दैनंदिनी तपासणे व संपर्क या गोष्टी त्याच्याकडे होत्या. शाखेची उपस्थिती सरासरी २५ होती. या वर्षी शाखेने प्राधान्याने अभ्यास व खेळ या विषयाकडे लक्ष देण्याचे ठरविले होते. मुलांना त्यांचे गणशिक्षक वेळोवेळी अभ्यासात मार्गदर्शन करीत असायचे.

> **असो अंतरीं भावना प्रज्वलीता । वरी तेच गांभीर्य का दाखवीता?**
> **सदा शुध्दसे हास्य गालीं खुलावें । असें वर्तुनी आदरा प्राप्त व्हावें ॥**

शाखेची मैदान व्यवस्था चांगली सांभाळली गेली. मुलांना नवीन खेळ माहिती व्हावेत यादृष्टीने काही नियोजन होते, तर काही खेळांमध्ये मुलांना नैपुण्य मिळावे, यादृष्टिनेही त्या-त्या खेळांचे नियोजन होते. यात कबड्डी, लंगडी, फुटवॉल व रनराऊंडस् हे खेळ मुलांना चांगल्या प्रकारे खेळता यावेत यासाठी प्रयत्न करण्यात आले. वर्षातून दोन वेळा भागातील शाखांमध्ये स्पर्धादेखील घेण्यात आली. त्यात फुटवॉल व लंगडीमध्ये शाखेला विजेतेपद पटकवता आले. वर्षभरात समतेचा सराव चांगला झाला.

वर्धकांना खेळाची रचना करता यावी, त्यांना खेळ घेता निर्णय देता आला पाहिजे, यादृष्टींने या वर्षी उन्हाळ्यातल्या सुटीतील मैदानी स्पर्धांची सर्व रचना इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी केली. खेळांचे वेळापत्रक आखणे, नियम ठरवणे स्पर्धेचे पंच ठरवणे व सर्व गोष्टींचे व्यवस्थित नियोजन मुलांकडून करून घेतले व प्रत्यक्षात अंमलात आणले .

तासिका व्यवस्थेत या वर्षी वाहेरचे शिक्षक जास्त मिळू शकले नाहीत. परंतु याची उणीव युवकांनी भासू दिली नाही. प्रत्येक युवक किमान दोन विषय तरी घेत असे व कधी गरज असल्यास आठवड्यातील सहा दिवससुध्दा शिकवावे लागत असे. पहिल्या सहा महिन्यात तीन शिक्षक बाहेरून शिकवायला येत होते, नंतरच्या सहा महिन्यात केवळ दोनच शिक्षिका होत्या. नियोजनाच्या जवळ जवळ ८० ते ९० टक्के तास पूर्ण झाले.

वर्षभरात एकूण दोन पालकसभा झाल्या. त्यातील पहिली ३ सप्टेंबर रोजी झाली. पुष्पाताई नडे या सभेला वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या बोलण्यात वर्धिनीत चालणारे महिलांसाठीचे उपक्रम व घरातील आई किंवा वडिल आपल्या मुलांसाठी काय करू शकतात हा विषय होता. त्याला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांची विस्तृत माहिती त्यांना पहिल्यांदाच झाली.

दुसरी पालकसभा फेब्रुवारी महिन्यात झाली. यात नरवणे सरांनी 'परीक्षेच्या कालावधीत पालकांची भूमिका कशी असावी' हा विषय मांडला, परीक्षेच्या कालावधीत शाखेकडून होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती सांगण्यात आली. शिवाय या पालकसभेला ज्ञानेश पुरंदरे शिक्षक उपस्थित होते. त्यांनी अमेरिकेतील काही गोष्टी सांगितल्या. दोन्ही पालकसभांना संख्या २५ ते ३० पर्यंत होती.

यावर्षी शाखेतील युवकांनी किमान पाच मिनिटे प्रार्थना झाल्यावर मुलांसमोर बोलावे, एखादी गोष्ट किंवा एखादी माहितीपर बातमी सांगणे हा उपक्रम दोन महिने चालू होता. यामुळे सर्व युवकांना मुलांसमोर बोलण्याची सवय लागली. त्यांचा आत्मविश्वास वाढला.

शाखेची या वर्षी एक सहल डिसेंबरमध्ये पुरंदर गडावर झाली ३० संख्या व ७ युवक उपस्थित होते. दीड दिवस मुलांनी गडावर भरपूर मजा केली. संध्याकाळी येताना नारायण गावच्या दत्तमंदिराचे दर्शन घेऊन पुण्यात परत आलो. नियोजनाप्रमाणे सहल झाली.

यावर्षी जे युवक पटावर होते, त्यापैकी एक जण ज्युनिअर कॉलेजला आहे. चौघजण सिनिअर कॉलेजला आहेत, तर दोघे ग्रॅज्युएशन पूर्ण झालेले आहेत. पण शाखेव्यतिरिक्त महिन्यातून एकदा ७ जण एकत्र येवून जवळच्या एका टेकडीवर फिरायला जायचो. तिथे सद्य घटनांविषयी गप्पा किंवा चर्चा होई. युवकांच्या अभ्यासातल्या प्रगतीविषयी बोलणे व्हायचे. आतापर्यंत ज्यांचे निकाल लागले आहेत, ते सर्वजण

**कुणा धीर गंभीर पाहून नित्य । कुणीं भोंवती ये न हें पूर्ण सत्य ॥**
**म्हणोनी खुल्या वृत्तिला वाव द्यावी । कदा वर्तनीं आढ्यता ती नसावी ॥**

प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

यावर्षी मानसिक विकास बैठक ही विठ्ठलाच्या मंदिरात घेण्यात आली. सकाळच्या सुंदर वातावरणात देवासमोर उपासना करून बैठकीला सुरवात होत असे. त्यात काही पुस्तकांचे वाचन, काही लेखांचे वाचन व चर्चा होत असे. मोठ्या गटातील जो कोणी बैठकीला उपस्थित नसे, त्याला रविवारचा खेळ नाही, असा नियम ठरविला होता. उपस्थिती भरपूर असायची.

पारंब्या, शेलारखिंड यासारख्या पुस्तकांचे वाचन, वृत्तपत्रांतील काही लेख, तर कधी पद्य, प्रार्थना असे विषय झाले.

**विशेष कार्यक्रम :-** आठवड्यातून किमान एकदा एकत्रितपणे खाणे हा शाखेतील युवकांचा आवडता कार्यक्रम. त्यामुळेच शाखेतील युवकांची एक टीम तयार झाली. यावर्षीचा कोजागिरीचा कार्यक्रम विलास कुलकर्णी सरांबरोबर चतुःश्रृंगी टेकडीवर झाला.

शाखेत सहामाही व वार्षिक परीक्षा घेण्यात आली. शाळेत ज्याप्रमाणे प्रश्नपत्रिका असतात, त्याच पॅटर्नवर आधारित परीक्षा शाखेत घेण्यात आल्या, याचा फायदा मुलांना त्यांच्या शाळेचा परीक्षेत नक्कीच झाला.

शाखेत मुलांना इंग्रजी व्याकरणाचे मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः ८ ते १०च्या गटाला नरवणे सरांनी मुलांच्या व्याकरणातील अडचणी सोडवून दिल्या.

मुलांना शाळेच्या परीक्षेत नेहमी निबंध लिहावा लागतो. बऱ्याच जणांना तो कसा लिहावा हे समजत नाही. त्याची रचना कशी असते, याबाबत मुलांना त्या त्या वर्गांच्या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. वर्षातून दोन वेळा निबंध स्पर्धादेखील घेण्यात आली.

परीक्षेचे दिवस जवळ आले असताना आपले नियोजन कसे असावे, त्यात कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यावे, किती वेळ द्यावा याबाबत माहिती विलास कुलकर्णी सरांनी दिली.

**संपर्करचना -** शाखेत यावर्षी काही महिने वर्गशः, तर काही महिने गणशः संपर्क रचना करण्यात आली होती. वर्गशः संपर्क रचनेत त्या वर्गाचे शिक्षक दैनंदिनी पाहत असायचे. त्यामुळे मुलांच्या अभ्यासाविषयी कल्पना त्यांना येत असे व वेळोवळी याबाबत घरी पालकांशी बोलणं होत होते. प्रत्येक युवकाचा आठवड्यात सरासरी ५ ते ७ मुलांच्या घरी संपर्क होत असे

शाखा म्हणजे नित्य नवे कार्यक्रम. वर्धकांच्या विकासासाठी आवश्यक असे भरपूर कार्यक्रम या वर्षभरात घेण्यात आले. त्यापैकी काही महत्वाचे कार्यक्रम म्हणजे मुलांनी प्रार्थना झाल्यावर नियमितपणे बातम्या सांगणे. याशिवाय काही दिवस मुलांकडून मारूती स्तोत्र पठण, मनाचे श्लोक याचे पाठांतर करून घेण्यात आले. महिन्यातील काही रविवार 'कल्पक बनूया' या पुस्तकाचे वाचन झाले. यातून ब्रीद वाक्य तयार करणे, आपली सही कशी कल्पक असू शकते, याविषयी वाचन झाले. यावर्षी पहिल्यांदा शाखेने गणेशोत्सव स्पर्धेत भाग घेतला. शाखेच्या टिपरी पथकाने गोखलेनगर भागातील तीन ते चार मंडळांसमोर आपले कार्यक्रम सादर केले. त्यामुळे त्या भागात शाखेचा प्रचार होण्यास फायदा झाला.

नाताळच्या सुटीत ८वीच्या वर्गाने शाखेतच फुटबॉलची स्पर्धा घेतली. या स्पर्धेच्या बक्षिस समारंभाला पालकदेखील हजर होते. यावेळी पालकांसाठी वाद-विवादाची स्पर्धा झाली. विषय होता "दूरदर्शन शाप की वरदान?" वर्धक व युवक गटाचादेखील सहभाग होता. पालकांकडून चांगल्या प्रतिक्रिया आल्या. या

**मनें ओढुनी घ्यावया बांधवांची । असो शक्ति अंगात आकर्षणाची ॥**
**अशी शक्ति वक्तृत्व, विद्या, कलांनी । त्वरें सश्रमें घेई तूं आकलोनी ॥**

कार्यक्रमाचा समारोप या भागातील नगरसेवक श्याम सातपुते यांच्या उपस्थितीत झाला.

निसर्गसहल म्हणून दोन महिन्यातून एकदा तरी टेकडी भ्रमंती असायची. वेताळ टेकडीवर जाऊन सूर्योदय पाहणे, मानसिक विकास बैठक व पद्य म्हणणे, असे कार्यक्रम झाले.

वर्षभरात झालेली व्याख्याने :

| विषय | | वक्ते |
|---|---|---|
| चित्रे कशी काढावी? व चित्रकलेचा इतिहास | - | शेखर साने |
| अमेरिकेतील गोष्टी | - | कृ.ल.पटवर्धन सर |
| विद्युत, उद्योग व घरगुती उपकरणाची माहिती | - | निलकंठ एडके |
| गॅस कसा तयार करतात? | - | कु. लिपारे |
| गोष्ट कशी सांगावी? | - | संजय कदम |



| | | |
|---|---|---|
| मुलाखत कशी घ्यावी | - | शिरिष अडके |
| हस्ताक्षर सुधारणा | - | नाना लाभे |
| नवीन गोष्टी व छोटे छोटे खेळ | - | नरवणे सर |
| एन.सी.सी.ची आवश्यकता | - | चंदन हायगुंडे |

काही प्रकल्प भेटी

मधुमक्षिका पालन केंद्र

तिकिटे व नाणी प्रदर्शन

**स्वातंत्र्यदिन कार्यक्रम :-**

मुलांच्या शाखांचा स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम रेणुकास्वरूप येथे झाला. नव्या भागरचनेमुळे क्रीडास्पर्धा प्रथम भागपातळीवर झाल्या होत्या. १५ ऑगस्ट रोजी दोन्ही भागांचे संघ शेवटच्या फेरीसाठी एकत्र आले होते. कबड्डी व लंगडीच्या झालेल्या या सामन्यांमध्ये आपल्या भागाचा संघ विजयी व्हावा, यासाठी मिळणाऱ्या प्रोत्साहनाने मैदान दणाणून गेलं होतं. क्रीडास्पर्धांचा समारोप युवक कार्यकर्त्यांच्या प्रदर्शनीय कबड्डी सामन्यानं झाला. शाखेवर कार्यक्रम घेणारे आपले युवक शिक्षक मैदानात खेळायला उतरल्यावर किती जोमदार खेळतात, याचं दर्शन वर्धकांना झालं. शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शिरीष आपटे हे होते. वर्धकांना मार्गदर्शन करताना त्यांनी शाखेत खेळले जाणारे खेळ जीवनात किती मोलाचे आहेत, याविषयी अतिशय सुरेख मार्गदर्शन केलं. 'आपला देश सुसंपन्न करायचा असेल, तर आळस सोडावा लागेल. आज्ञांकितता अंगी बाणवावी लागेल, हे मुद्दे ठसवताना इतिहासातील काही प्रसंग त्यांनी मुलांसमोर मांडले. प्रचंड संघर्ष करून मिळविलेलं स्वातंत्र्य टिकवायचं असेल आणि देश सुसंपन्न करायचा असेल तर काय काय करावं लागेल, याचं नेमके मार्गदर्शन प्रा. शिरीष आपटे यांनी याप्रसंगी केले. योगायोगाने याच दिवशी राखी पौर्णिमा होती. भगिनी निवेदिता शाखेतील वर्धिका व युवतींनी रक्षाबंधनाच्या निमित्तानं देशरक्षाबंधनाचा विचार घरोघरी पोहोचविला. राजमाता जिजाऊ शाखेच्या वर्धिका व युवती यांनी संपूर्ण वंदेमातरम्च्या गायनानं स्वातंत्र्यदिन साजरा केला.

**मासिक प्रबोधन सत्र** - वर्धिनीचे युवक-युवती कार्यकर्ते व अन्य प्रकल्पातील कार्यकर्ते यांच्यासाठी महिन्यातून एकदा प्रबोधन सत्र घेण्याची सुरूवात या वर्षी

**न निंदा करोनीच हो कार्य जाडें ॥ न टीकास्त्र सोडून हो शक्ति वाढे ।**
**म्हणूनी न हा पंथ केव्हां धरावा । पुसावें कशा जायचें ज्या न गावा ? ॥**

करण्यात आली. यावर्षी या सत्रात घेण्यात आलेले विषय पुढीलप्रमाणे होते.

१) 'मी कसा घडलो' - प्रतापराव पवार

२) (Energy Quotient) चैतन्यांकाची संकल्पना - बाबा पटवर्धन

३) जनुकाचा नकाशा - डॉ. देवपूरकर

४) विस्थापित अपनेही देशमें ! - काश्मीर प्रश्नावरील चित्रफीत

५) 'प्रभावी भारतासाठी नव्या पंचशीलाचा अंगिकार करूया' - डॉ. माशेलकर यांच्या भारतीय विज्ञान परिषदेत केलेल्या अध्यक्षीय भाषणाचं वाचन व चर्चा


**वर्धापनदिन सोहळा :-**

१३ मे हा वर्धिनीचा वर्धापनदिन. यावर्षी या निमित्तानं दोन कार्यक्रमांचे आयोजन केले होते. एक होता व्यवसायी युवकांचा मेळावा, तर दुसरा होता वर्धिनीवर अलोट प्रेम करणाऱ्या अनेक प्रसंगी सक्रीय सहकार्य करणाऱ्या स्नेह्यांसाठी स्नेहभोजन. युवक मेळाव्यासाठी सुमारे ४० युवक उपस्थित होते. दैनंदिन कामात यायची इच्छा असूनही नोकरी व्यवसायाच्या कारणांमुळे मर्यादा पडू लागल्या आहेत व खूप दिवस कामापासून दूर राहिल्यामुळे पुन्हा रोजच्या कामात यायला वाटणारा संकोचही युवकांच्या बोलण्यातून जाणवत होता. कार्यक्रमाचं प्रास्ताविक विलास कुलकर्णी यांचं होते, तर प्रमुख भाषण शिरीष पटवर्धन यांचं झालं. अनेक जणांनी शिविररचनेत, अर्थसंकलन अशा विषयात सक्रीय काम करण्यासाठी अनुकूलता दर्शवली.

स्नेहमेळाव्याचं ठिकाण खडकवासला परिसरात उदय गुजर यांच्या निसर्गरम्य 'फार्महाऊस' मध्ये होतं. पद्मभूषण डॉ. बानू कोयाजी, श्री. रघुनाथ घाणेकर, श्री. रमेश जोशी, श्री. मोरेश्वर जोशी त्याचप्रमाणे 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यकारिणीचे पदाधिकारी व सदस्य या कार्यक्रमाला उपस्थित होते. आपापल्या आयुष्यातील काही न विसरता येणारे अनुभव याप्रसंगी अनेकांनी सांगितले. रंगलेल्या या अनौपचारिक गप्पा थांबूच नयेत, असं वातावरण तयार झालं होतं. सौ. उमा व श्री. उदय गुजर यांच्या 'रुचकर' आतिथ्यानं कार्यक्रमाची गोडी अधिकच वाढली होती.


**विस्तारावरोबर मजबुतीही हवी ! :-**

'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. अशी वाढ होत रहाणं कामाच्या दृष्टीनं आवश्यकच आहे. परंतु त्याचबरोबर अशी वाढ होत असताना सर्व शाखांवर चालणारे कार्यक्रम, काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी नियमित संवाद अशा अनेक गोष्टींकडे बारकाईनं लक्ष देण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन या वर्षी मुलांच्या सहा शाखांची विभागणी दोन भागात करण्यात आली आहे. या प्रत्येक भागासाठी एक कार्यवाह नियुक्त करण्यात आला आहे. प्रत्येक भागात असणाऱ्या शाखांचे कार्यक्रम, त्यांच्या अडचणी नवीन संपर्क याकडे लक्ष देण्यासाठी भागसमितीची रचना आहे. या समितीमध्ये त्या भागातील शाखांचे शाखाप्रमुख, शाखापालक, भाग कार्यवाह यांच्या व्यतिरिक्त काही तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश आहे. या सर्व रचनेतून सर्व शाखा संख्या व गुणवत्तेच्या दृष्टीने मजबूत करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले आहे.



निराशा मनाते न केव्हां शिवावी । अशी दिव्य आशा मनीं संचरावी ॥
'उभ्या भूवरी' शूर हिंदू फिरेल । जगा संस्कृती देउनी उध्दरील ॥

**कथाकथन कौशल्य शिबिर :-** सानेगुरूजी कथामालेच्या सहकार्यानं जून महिन्यापासून स्वरूपवर्धिनीच्या रामकृष्ण आणि भगिनी निवेदिता शाखा तसेच आजोळ प्रकल्पातील विद्यार्थ्यांसाठी कथाकथन कौशल्य शिबिर सुरू झाले. सहा महिने कालावधीचे हे शिबिर आठवड्यातून दोन दिवस चालते. या शिबिरात डॉ. अनिल गोडबोले, तसेच डॉ. पै यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. सांगितलेल्या कथा मुलं घरी सांगतात का? पालकांना काय वाटतं हे जाणून घेण्यासाठी दोन पालकसभाही घेण्यात आल्या. समारोपाचा कार्यक्रम दि.२१ फेब्रुवारी रोजी दै. सकाळचे संचालक चंद्रशेखर हरी जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.




**‘निर्माल्य’ नव्हे; वाईट सवयींचे विसर्जन करू या !**

ढोल, ताशा, झांजांचा जोश हे तर गणेशोत्सवात नेहमीच दिसणारे दृश्य. वर्धिनीची पथकेही या सार्वजनिक उत्सवात सहभागी होतात व शिस्तीच्या खेळाचे प्रदर्शन आपल्या बहारदार खेळातून घडवतात. परंतु या वर्षी उत्सवाच्या निमित्तानं आणखी काही विषय सामाजिक जागरणाच्या हेतूनं हाताळण्याचा प्रयत्न झाला. गणेशमूर्तींच्या विसर्जनाबरोबरच सार्वजनिक गणपती मंडळे आणि सामान्य नागरिकही पाण्यामध्ये निर्माल्याचे विसर्जन करतात. देवाला अर्पण केलेली फुलं पायदळी तुडवली जाऊ नयेत, अशी भावना त्या पाठीमागे असते हे खरे आहे. परंतु त्यासाठी पाण्यात निर्माल्याचं विसर्जन करण्यानं पाण्याचं प्रदूषण वाढतं ही वस्तुस्थिती आहे. यासंबंधी लोकजागरण करण्याचं वर्धिनीच्या राजमाता जिजाऊ शाखेने ठरविलं. अनंत चतुर्दशीच्या दिवशी पर्वती पायथ्याच्या कॅनॉलपाशी शाखेतील युवती व वर्धिका उभ्या राहिल्या. पाण्यात गणेशमूर्तींचं विसर्जन करण्यासाठी आलेल्या नागरिकांना व गणपती मंडळांच्या कार्यकर्त्यांना त्यांनी प्रदूषण रोखण्याचं आवाहन केलं. पाण्यात निर्माल्य टाकण्याऐवजी आमच्याकडे द्या, आम्ही हे निर्माल्य खत प्रकल्पासाठी देऊ, असा विश्वास दिला. अवघ्या दोन तासात सुमारे १४ पोती निर्माल्य जमा झालं. खतप्रकल्पाचं काम करणाऱ्या एक संस्थेनं हे निर्माल्य आनंदानं स्विकारलं.

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parage Chowk,
Barane Road, Pune - 411 011. Phone - 6127260

• All types of Transport Service • All over Maharashtra

**नको वाद घालू उगा तो तुटेना । कुणी वाद घालून कोणा मिळेना ॥**
**तरी स्नेह ठेवून त्या गुंगवोनी । त्वरें टाक तूं आपुलासा करोनी ॥**

# वंदेमातरम्



हे वर्ष या स्फूर्तिगीताच्या १२५ व्या जयंतीचे होते. या निमित्तानं गणेशोत्सवाच्या काळात वर्धिनीतील मुलांच्या शाखांनी वंदेमातरम्चा प्रेरणादायी इतिहास पथनाट्याद्वारे अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसमोर सादर केला. "वंदेमातरम्चा हा प्रेरक इतिहास पहिल्यांदाच ऐकला, ही माहिती आम्हाला अजिबात नव्हती," अशा प्रतिक्रिया प्रेक्षकांकडून मिळत. पथनाट्य करताना वर्धकांना एक वेगळीच अनुभूती येत होती. वंदेमातरम्च्या प्रेरक इतिहासाबरोबरच 'स्वदेशी', 'समस्या तुमच्या आमच्या' अशा विषयांवरही पथनाट्ये सादर करण्यात आली. या वर्षीच्या वर्धिनीच्या संक्रांत उत्सवात युवक-युवतींनी संपूर्ण वंदेमातरम् गीताचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

वंदेमातरम् शतकोत्तर रौप्यमहोत्सव समितीच्या वतीनं या वर्षी विविध कार्यक्रम घेण्यात आले. या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता १५ डिसेंबर रोजी झाली. या निमित्तानं पुणे शहरातील सुमारे ११००० शालेय विद्यार्थ्यांनी नेहरू स्टेडियमवर सामूहिक संपूर्ण वंदेमातरम् गायन केले. या संपूर्ण कार्यक्रमात वर्धिनीच्या सुमारे १२० कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांच्या वाहतूक व्यवस्थेचं अत्यंत रेखीव आयोजन केलं होतं. तसंच पूरक आहार वितरण व्यवस्थेतही वर्धिनीच्या महिला विभागाचा सहभाग होता. ११००० विद्यार्थ्यांच्या एक सुरातील वंदेमातरम् गान ऐकताना अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहिले. एका ऐतिहासिक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतल्याचा सार्थ अभिमान वर्धिनीच्या प्रत्येक युवक-युवती कार्यकर्त्याला आणि महिलांना होत होता.

# अभिनंदन

* वर्धिनीच्या शारदामणी महिला विभागाच्या प्रमुख **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना यंदाच्या वर्षी सुप्रतिष्ठित असा **बाया कर्वे पुरस्कार** देऊन त्यांच्या कार्याचा हिंगणे स्त्री शिक्षणद्वारे संस्थेने सार्थ गौरव केला. वर्धिनीला अभिमान वाटावा असा हा पुरस्कार आहे.

* आजोळ प्रकल्प व निवेदिता शाखेचे काम पहाणाऱ्या कार्यकर्त्या **कु. छाया गायकवाड** या सेट परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्या.

* रामकृष्ण शाखेचा युवक कार्यकर्ता **राम जगताप** याला मुष्टीयुध्द स्पर्धेत आंतरविद्यापीठ पातळीवर, तसेच राज्यपातळीवर सुवर्णपदक मिळाले.

* 'गंगोत्री' या संस्थेमार्फत पाणलोट विकासाची कामे केली जातात. यामध्ये वर्धिनीचे एक कार्यकर्ते **पराग लकडे** हे प्रमुखपणे काम करतात. स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या पाणलोट विकास कामाची पहाणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची नेमणूक केली होती. त्यांनी पाणलोट विकास कामाबाबत गंगोत्रीने केलेल्या कामांची मुक्तपणे प्रशंसा केली आहे. वर्धिनीला कार्यकर्ता अशा कामात आहे, हे अर्थातच वर्धिनीचा अभिमानास्पद आहे.

**जरी उच्च गेलास स्थानावरी तू। करी कार्य नेमे स्मरे दिव्य हे तू॥**
**नको धुंद होऊ करी सूत्र येता। नको गाजवू तू दिसायास नेता!॥**

## ‘अर्थपूर्ण’ प्रतिसाद



यावर्षी मुलांच्या शाखांच्या संक्रांत उत्सवाची जबाबदारी अखंडानंद शाखेकडे होती. कार्यक्रमापूर्वी कार्यकर्त्यांनी शाखेची पालकसभा बोलावली. उपस्थित पालकांना या मोठ्या कार्यक्रमाची जबाबदारी आपल्या शाखेवर असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाची तयारी कशी चालते, याची माहिती सांगितली. एकूण खर्चाचा अंदाज सांगितला. वर्धिनीचं सर्व काम समाजाच्याच आर्थिक सहाय्यावर चालते, हेही सांगितलं व आवाहन केलं की, या कार्यक्रमासाठी होणाऱ्या खर्चासाठी आपण काही अर्थसहाय्य करावं. उपस्थित पालकांनी लगेचच निधी गोळा करून, पालकसभा संपताना ९०१ रूपयांची रक्कम शाखाप्रमुखाच्या हाती सुपूर्त केली.

**गुणगौरव कार्यक्रम :-**

मुलांची दंगामस्ती, मनमुराद खेळणे या गोष्टी पालकांना, शिक्षकांना आवडतात, असे सहसा होत नाही. मुलांविषयी चिंताच त्यांच्या बोलण्यातून, रागावण्यातून डोकावत असते. परंतु परीक्षेत चांगले गुण मिळवल्यावर मात्र तितक्याच मोकळेपणानं त्यांचे कौतुकही व्हायला हवं. काही मुलांचे परीक्षांमधील गुण कदाचित उत्तम नसतीलही; पण केवळ अभ्यासातील गुणांवर थोडेच जीवनातील यशापयश अवलंबून असते? अन्य कलाकौशल्यांमधील प्रावीण्यही महत्त्वाचे असते. अशा वेगवेगळ्या विषयातील ‘गुणवान’ मुलामुलींच्या पाठीवर शाबासकी देण्यासाठी वर्धिनीत गुणगौरव कार्यक्रम होत असतो. या वर्षी २४ जून रोजी भारत इंग्लिश स्कूलच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण प्रबोधिनीच्या संचालिका म्हणून काम पहाणाऱ्या सौ. होनवाड यांनी सर्व गुणी मुलामुलींना शाबासकी दिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ‘स्व’-रूपवर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष पुरूषोत्तमभाई श्रॉफ यांना अमृतमहोत्सवानिमित्त कार्याध्यक्ष किशाभाऊ पटवर्धन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच ‘बाया कर्वे’ पुरस्काराने सन्मानित झालेल्या श्रीमती पुष्पाताई नडे यांचाही गौरव करण्यात आला.


*With Best Compliments From :*

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**

Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,

Kothrud, Pune - 411 029. ☎ 5431124, 5440480, 5464551


**अशानेच नेतृत्व घ्यावे करात । सदा ध्येयनिष्ठा जयाच्या मनात ॥**
**न मानापमानीं तयाने रमावे । त्वरे कार्य वाढे असे आचरावें ॥**


## आजोळ

**पाणपोई :**

प्रतिवर्षाप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला 'आनंद पाणपोई' उभारली होती. विद्यामंदिर, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. आबनावे यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन झाले. त्यांना हा उपक्रम खूप आवडला. त्याबद्दल त्यांनी मुलांना शाबासकी दिली. अंदाजे अडीच हजार जणांनी पाणपोईचा लाभ घेतला.

**उत्सव :**

**संक्रांत** उत्सवामध्ये संत एकनाथांच्या भारूडांचे दृश्यांकन असे प्रात्याक्षिक सादर केले. प्रात्याक्षिकाच्या तयारीच्या निमित्ताने एकनाथांची सामाजिक दृष्टी भारूडातून कशी दिसून येते, याबद्दल मुलांपुढे सोप्या भाषेत विवेचन केले. एकप्रकारे १५ दिवसांचे हे उद्बोधन सत्रच होते. यासाठी समितीच्या कार्यकर्त्या सौ. बोकील व संघाचे कार्यकर्ते श्री. विश्वनाथराव जोशी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. **महाशिवरात्रीला** सोमवार पेठेतील विठ्ठल मंदिरात सगळे एकत्र आले. सौ. मंजूषाताई, सौ. स्नेहलताई व किशोर बेलोसे यांनी सुंदर शिवकथा सांगितल्या. **गुरुपौर्णिमा** उत्सवाचे संचालन कु. वैशाली गावडेने केले. प्रमुख वक्त्या श्रीमती पुष्पाताई नडे यांनी संस्कारांचं महात्म्य एका सुंदर कथेतूनं सांगितलं. **रक्षाबंधनाकरिता** प्रतिवर्षाप्रमाणे कमला नेहरु रुग्णालयात आजोळ शाखा गेली होती. प्रमुख अधिक्षक, सर्व डॉक्टर्स, परिचारिका यांचं उत्तम सहकार्य होतं. सर्वच रुग्णांना छोट्यांचं हे रक्षाबंधन अपूर्वाईचं वाटत होतं. **जन्माष्टमीची हंडी** यंदा आगळीवेगळी होती. हंडीमध्ये भरले होते, सुविचारांचे सुंदर सुंदर मोती ! मुलांचा या हंडीला उत्तम प्रतिसाद मिळाला. **गणेशोत्सवात** यंदा आजोळनं प्रथमच ध्वजपथक उभं केलं होतं. विशेष म्हणजे इ. ७वी मधील कु. वैशाली गावडेनं नवचैतन्य मंडळ, लष्कर व तुळशीबागवाले गणपती मंडळ या दोन्ही मिरवणुकांत या पथकांचे नेतृत्व केले होते. **त्रिपुरी पौर्णिमेला** आजोळनं पाताळेश्वर मंदिरात सायंकाळी लक्षदीप उजळण्याच्या कार्यक्रमात प्रथमच भाग घेतला होता. एका वृध्द गृहस्थांनी आपणहून सर्वांना पाताळेश्वराचं महात्म्य सांगितलं.



**सहली :**

१० जूनला भुलेश्वर-थेऊर-रामदरा अशी एक दिवसाची सहल आयोजित केली होती. भुलेश्वराच्या गाभाऱ्यातली ॐकार उपासना, थेऊरचं गणपती दर्शन व साखर कारखाना परिचय आणि रामदऱ्यातलं निसर्ग सान्निध्यात भोजन, भ्रमण आणि भरपूर खेळणं सर्वांच्या कायमचं लक्षात राहाणारं होतं.

रामदरा येथे सहलीकरिता सहकुटूंब आलेल्या काहींना पद्य, खेळ, भोजनापूर्वीचं 'ॐ सहनाववतू' व एकूण शिस्त याचं खूप कुतूहल वाटलं. त्यांनी आवर्जून आजोळ, वर्धिनी यांची माहिती घेतली.

डिसेंबरमध्ये राजगडची एक रात्र मुक्कामाची सहल झाली. आजोळ व राजमाता जिजाऊ या दोन्ही शाखांची मिळून ही सहल होती. एकूण ४० जण सहभागी होते. यावेळी गुंजवण्याच्या अनोळखी मार्गानं प्रथमच कूच केली होती. पण सुदैवानं एक ग्रामस्थ मार्गदर्शक म्हणून आले. सायंकाळी संजीवनी माचीवरून अनुभवलेला सूर्यास्ताचा सोहळा अविस्मरणीय होता. रात्री ऐतिहासिक पद्यांची स्पर्धा खूपच रंगली.

खरा धन्य तो ! धन्य तो !! ध्येयनिष्ठ । तयाला न खंती करायास कष्ट ॥
न भीती शिवे ज्या दिसे ध्येयतारा । तया सारखा गार वारा, निखारा ॥

**अन्य विशेष :**

१) आजोळ शाखा सुटताना वातम्यांचं कथन, सुविचार, सुभाषितं व म्हणी स्पष्टीकरणासह सांगणं, असा कार्यक्रम गेल्या वर्षभर चालू आहे. इयत्तांनुसार त्याचं नियोजन केलं आहे.

२) दि. ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर या दिवशी दोन दिवसांचं आजोळचं अभ्यासशिबिर आयोजित केलं होतं. आजोळच्या सर्व शिक्षकांच्या सहकार्यानं शिबिर अत्यंत उपयुक्त ठरलं.


## वीर अभिमन्यू बालशाखा

**संक्रांत उत्सव :-**

दि. ३० जानेवारी रोजी नेहरू मेमोरियल हॉलमध्ये सकाळी बालविभागाचा उत्सव झाला. छोट्या गटाचं 'निळ्या निळ्या नभात' हे अभिनय गीत, मिश्रगट - नागपूरचाळ यांचं 'चॉकलेटचा बंगला' हे अभिनय गीत, मधल्या गटाचं 'सरसर होडी' हे कोळीगीत व 'बाहुलीचं लग्न' हे लग्नसमारंभानं सजलेलं अभिनय नाट्य, बालशाखेचं 'विचार प्रदूषण' हे पथनाट्य, मोठ्या गटाचं 'माणुसकीच्या शत्रुसंगे' हे सैनिक गीत; 'जोगवा' हे अभिनयगीत आणि सर्व प्रात्याक्षिकांच्या मधल्या वेळात 'गणेशस्तुती', श्रीकृष्णपूजा सादर करणारी 'बालोपासना', तसेच पहिलीतल्या गौरव कडून अत्यंत उत्तम पाठांतर करून म्हटलेला गीतेचा बारावा अध्याय अशी नऊ प्रात्याक्षिके सादर झाली.

वर्धिनीच्या कार्यकर्त्या कु. छाया गायकवाड यांनी प्रास्ताविक केलं. इयत्ता तिसरीतील वैशाली चडचणकर आणि संकेत दिघे या दोघांनी वार्षिक अहवाल उत्कृष्ट रीतीने सादर केला. श्रीमती मीना चंदावरकर यांनी कार्यक्रमाचं अध्यक्षस्थान भूषविलं होतं.

बालविभागाचा संक्रांत उत्सव समारंभ गेल्या वर्षी स्वतंत्रपणे आयोजिलेला होता. बाल विभागाच्या सर्व शिक्षिका, पालक व युवक-युवती कार्यकर्ते यांच्या सहकार्यानं कार्यक्रम यशस्वी झाला.




**कसा कोण वागे, कसा कोण चाले। कसा कोण बोले, कुठे काय झालें ॥**
**न टीका अशी बोलुनी मुक्त व्हावें। तशा सर्व गोष्टी सुधारीत जावें ॥**

# शिबिरवृत्त

## मुलींचा शाखाविभाग

**स्वयंपूर्णतेचा आनंद :** - दि. १६ एप्रिल ते २१ एप्रिल या कालावधीत मुलींचे उन्हाळी शिबिर रेणुका स्वरूप प्रशाला येथे झाले. शिबिराचा वयोगट इ. ५वी ते १०वी असा असून ‘स्वयंपूर्णता’ असा शिबिराचा विषय होता. मोठ्या गटाला या विषयाबरोबरच वर्धिनीच्या कार्यकारणी सदस्यांच्या मुलाखती हा विषय होता.

या शिबिरात सकाळची व दुपारची सत्रे दोनही गटांसाठी वेगवेगळी होती.

व्याख्यान व कृतीसत्रे (लहान गट )-

साबण पावडर तयार करणे - सुनिल कुलकर्णी
निसर्गोपचार - शोभा सोमवंशी
शाई / नीळ तयार करणे - श्रीमती रजपूत
लोकरीचे बेडूक तयार करणे - लता टिळेकर

(मोठा गट) -

इलेक्ट्रीसिटी - दादा पुणतांबेकर
निसर्गोपचार - शोभा सुर्यवंशी
बँकिंग - सुधाकरराव मुळे
स्पर्धा परीक्षा - लताताई / छायाताई

(प्रबोधन सत्रे)

भारताची स्वयंपूर्णता - प्रदीप कुरूलकर
इस्त्रायलची स्वयंपूर्णता - ज्ञानेश पुरंदरे
किरण बेदी चरित्र - माधवी पटवर्धन

याबरोबरच मोठ्या गटाने ‘मुलाखती’ हा एक आगळावेगळा विषय हाताळला. आपल्या कार्यकारिणीतील सदस्यांच्या व खूप वर्षे वर्धिनीचे प्रत्यक्ष काम केलेल्या कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन मुलाखती घेतल्या.

याचप्रमाणे या शिबिरात नेहमीप्रमाणे चार गट पाडण्यात आले होते. सर्व शाखांच्या मुली एकमेकांत मिसळून स्पर्धांना प्रोत्साहन देत होत्या. शिबिरात आदर्श गट, पद्य, बेसबॉल, लंगडी, कबड्डी, टेलीमॅचेस त्याचप्रमाणे आदर्श विद्यार्थी, मुलाखतींचे सादरीकरण अशा विविध स्पर्धा रंगल्या. शिबिराचा समारोप दि. २१ एप्रिल रोजी शिरीष पटवर्धन यांच्या व्याख्यानाने झाली.

**मुलाखतींचे वृत्तः** - ‘स्व’-रूप वर्धिनी म्हणजे नेमके काय, वर्धिनी सुरू करण्यामागचा हेतू, वर्धिनीची स्थापना करण्यात आलेल्या अडचणी, त्या अडचणीतून उभे राहिलेले काम व कार्यकर्ते, अशा सगळ्या गोष्टींची अगदी जवळून ओळख मोठ्या गटातील मुलींना व युवतींना उन्हाळी शिबिरामुळे झाली. कुंतीताई मुजूमदार, चंद्राताई दलाया, राजाभाऊ लवळेकर, दि.दा.जोशी, रा. प. देसाई, वसंतराव दाते, सुधाकरराव मुळे, शिरीष पटवर्धन, पुष्पाताई नडे अशा सर्वांनी कामातील अडचणी व त्यावरील उपाय मुलींपुढे अतिशय मनमोकळेपणाने मांडल्या. वर्धिनीची आवश्यकता या व्यक्तींना जाणवत होती. त्यासाठी सर्व अडचणींवर मात करून शाखा सुरू करण्याचा मुख्य आणि प्रमुख हेतू म्हणजे हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास. जेव्हा कृ. ल. पटवर्धन सरांचा हा विचार भावला, तेव्हा कुंतीताई, चंद्राताई, राजाभाऊ, दि.दा.जोशी, रा.प. देसाई यांनी या कार्यात सहभाग करण्याचे ठरविले. तेव्हा शाखेत या व्यक्ती शिक्षक

**नको दोष याचे दुजालाच सांगू । तयाचे तयाला करी बोल लागू ॥**
**अशानेच मैत्रींत ना खंड येई । करी मित्रही सद्गुणांची कमाई ॥**

म्हणूनसुध्दा काम पाहत. त्याकाळी धडाडीचे कार्यकर्ते म्हणजे शिरीष पटवर्धन व सुधाकर मुळे सर यांची मुलाखत घेतली, तेव्हा असे जाणवले की दोघांनीही बऱ्याच कामात एकत्रित सहभाग दिला आहे.

वर्धिनी उभारण्यापूर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांचा वावर त्या भागात विशेष जाणवायचा. वर्धक जेव्हा शाखेत यायचे, तेव्हा त्यांच्या खोड्या काढणारेही वाटेत असायचेच. परंतू त्याकाळी वर्धकही सरांनी फार पारखून निवडले होते. त्यामधीलच ज्ञानेश पुरंदरे व संजय तांवट यांचा वर्धक काळापासून ते पूर्ण वेळ कार्यकर्ता असा प्रवास मुलींना ऐकण्यास मिळाला. संतोष दुंडेलूसारखा युवक जोरदार पाऊस कोसळत असताना स्वतःच्या घरी पाणी गळत असूनही दुसऱ्यांच्या घरी पाणी शिरले म्हणून मदतीला धावला. हे केवळ वर्धिनीच्या सहवासाचाच परिणाम. आणखी एक उदाहरण म्हणजे अनिल भरतिया या युवकाने सरांनी सांगितलेला निरोप दुसऱ्या सरांकडे पोहचवताना पायाला लागलेल्या काचेचा व वाहत्या रक्ताचा विचार न करता सरांनी सांगितलेले काम पूर्ण केले. यावरूनच वर्धक हा कसा आज्ञाधारक असावा हे जाणवले. काश्मीर, रामजन्मभूमी अशा विषयांवरच्या राष्ट्रीय आंदोलनात आपल्या वर्धिनीतील वर्धकांचा सहभाग व त्यांना आलेले तिकडचे अनुभव हे अंगावर शहारे आणणारे होते. भुशीडॅम येथे झालेल्या शिबिराचा उल्लेख तर आवर्जून प्रत्येकांच्या मुलाखती घेताना आला.

एक आदर्श कार्यकर्ता किंवा वर्धक होण्यासाठी एकमेकांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध असणे आवश्यक आहे. एकमेकांशी सतत संपर्क असावा, आपल्या कामात सातत्य असावे. संस्था जशी वाढते त्याचा विस्तार जसा वाढतो, तशीच स्वप्नेही बदलतात. त्यासाठी शाखेच्या जबाबदारी घेताना त्या आपल्या क्षमतेनुसार घ्याव्यात. एकदा घेतलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी शाखेचा एक क्रियाशील अंतर्गत गट असावा. त्या गटाने हाती घेतलेले काम पूर्ण होण्यासाठी पूर्णपणे नियोजन करणे आवश्यक आहे. मूळ उद्देशापासून दूर न जाता सतत कार्य करीत राहिले पाहिजे, असे अनेक महत्त्वाचे मुद्दे या सर्व मुलाखतींमधून व्यक्त झाले.

**प्रांतांच्या सीमा उल्लंघुनिया ...**

| | | |
|---|---|---|
| कालावधी | - | १९ ते २३ ऑक्टोबर २००० |
| स्थळ | - | ज्ञानदा प्रशाला, |
| विषय | - | प्रांतपरिचय (काश्मीर, आसाम, राजस्थान, बंगाल, गुजरात, केरळ) |
| संख्या | - | मोठा गट - २७, छोटा गट - ४२ |
| शिबिरप्रमुख | - | छाया गायकवाड |

सहामाही परिक्षा जवळ आली, की मुलांना अभ्यास व शिबिर अशा दोन्हीचे वेध लागतात. मुलांचा अभ्यास जोरात सुरू झालेला असतो व इकडे युवतींची शिबिराची तयारीही सुरू होते. या बैठकीत व्यवस्था वाटप व शिबिराचा विषय ठरविला गेला. शिबिरात लहान व मोठा गट एकत्र असल्याने निवडलेला विषय दोन्ही गटांना समजेल, अशा पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न करायचा होता.



'प्रांत परिचय' हा विषय निवडण्यामागचा हेतू

**स्वये कार्य जोमे मनाने करूनी । पुढें ठेव आदर्श आधी रचोनी ॥**
**पहा लोक येती न बोलवतांही । कृतीनेंच शब्दांप्रती मोल येई ॥**

हा की, भारतात अनेक प्रांत आहेत. प्रांतांचा इतिहास, संस्कृती व प्रांतांच्या समस्यांची ओळख, तसेच त्या समस्यांशी आपला असलेला संबंध, त्या प्रांताशी एक भारतीय म्हणून असलेला ऋणानुबंध यांची जाणीव मुलींना व्हावी. शिबिराचे शोधबोध वाचल्यावर हा हेतू थोडाफार सफल झाल्याचे दिसते. काश्मीर समस्या, आसाममधील दहशतवादी कारवायांचा परिणाम, याविषयी मुलींना चिंता वाटू शकते, हे गप्पांमधून जाणवले. काश्मीरमधील निर्वासितांची चित्रफीत चालू असताना मोठ्या गटातील बऱ्याच मुलींचे डोळे पाणावलेले दिसत होते.

**शिबिरात जाणवलेल्या विशेष घटना** - शिबिरात पालक भेटायला आले की, मुलांचे डोळे भरून येणारच आणि पालकांच्या डोळ्यांच्या कडाही ओल्या झालेल्या जाणवतात. स्वराली नावाची मुलगी आई आल्यावर आईबरोबर घरी गेली. परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा पठ्ठी शिबिरात हजर. कारण विचारले असता म्हणते, "ताई, मी घरी गेले; पण माझी मैत्रिण शिबिरातच राहिली.' तिला नाही का आईची आठवण येणार?"

ताईला भेटायला आलेली छोटी बहीण खूप रडत होती. व शिबिरात असलेली तिची बहीणही खूप रडत होती . ताई रडत होती, कारण तिला घरी जायचं होतं. तर छोटी रडत होती, तिला शिबिरात रहायच म्हणून. शेवटी या नाट्याचा शेवट दोघींनी शिबिरात राहूनच साजरा केला.

### युवती अभ्यास वर्ग

(दि. ७ ते१० जुलै २०००) अनेक प्रेरणादायी सत्रांबरोबरच ग्रामसर्वेक्षण हे युवती शिबिराचे प्रमुख आकर्षण होते. ग्रामसर्वेक्षणासाठी या वेळेस युवती शिबीर 'चांदखेड' या निसर्गरम्य खेड्यात येथे घेण्यात आले.

शिबिरात अनेक व्याख्याने झाली. त्यापैकी समूहाने काम करण्याची मानसिकता नेमकी कशी वाढायला हवी, यासाठी टीम वर्क या विषयावर जयंत कवठेकर यांचे व्याख्यान झाले. 'नेतृत्व विकसन' व नेतृत्वाचे पैलू ह्या विषयांवर काही खेळांच्या सहाय्याने अविनाश जोशी सरांचे व्याख्यान झाले.

शिरीष पटवर्धन यांचे रामभाऊ म्हाळगी यांच्या चरित्रावर, तर माधवीताई पटवर्धन यांचे यशवंत केळकर यांच्या चरित्रावर व्याख्यान झाले. चरित्रमांडणी बरोबरच श्रीहर्ष सगरे यांनी 'You Can Win' या पुस्तकाच्या सहकार्याने सकारात्मक दृष्टिकोन या विषयावर गटचर्चा झाली. यात सर्व युवतींनी उस्फूर्त सहभाग घेतला. दि. १० जुलै रोजी स. १०.०० वा समारोप झाला.


## मुलांचा शाखाविभाग

**संगीत, अभिनय आणि क्षेत्र परिचय शिबिर :-**

लहानगट व मोठागट यांचे स्वतंत्र शिबिर न घेता ५वी ते १०वी च्या सर्व २५० विद्यार्थ्यांचे एकत्र शिबिर घ्यावे असे ठरले. एवढ्या मोठ्या संख्येच्या ८ दिवसांच्या शिबिराच्या व्यवस्था पार पाडण्याची आपली क्षमता आहे का याची चाचणी त्याद्वारे होणार होती. पण मंदार रायरीकर व सुजय पैलवान या जोडीने अत्यंत यशस्वीपणे हा व्यवस्थामेरू पेलून धरला. स्वा. सावरकरांच्या वास्तव्याने पुनित झालेले फर्ग्युसन महाविद्यालय हे शिवीरस्थान म्हणून ठरले. लहान गटाचा विषय संगीत व अभिनय हा होता. शास्त्रीय संगीताचा कोणताही कार्यक्रम सुरू झाला की, मुले

**कदा साधनेवीण ना शक्ति मोठी । हवी साधना ठाकण्या सज्ज कोटी ॥**
**कृतीची, मतीची तशी भावनांची । करा 'साधना' तीच किल्ली यशाची ॥**

त्राग्याने रेडिओ-टीव्हीचा कान पिळतात. "काय हे रडगाणे?" असा सूर लावून कार्यक्रम बंद करतात. याउलट डिस्को, रॅप, झॅप या प्रकारांबद्दल वाढती अभिरूची दिसून येते. भारतीय शास्त्रीय संगीताची थोरवी, त्यातून मिळणारा आत्मीय आनंद याची



अनुभूती वर्धकांना कशी घडवावी हे मोठे आव्हान समोर होते. हे आव्हान पेलले महिलाश्रम हायस्कूलच्या संगीत शिक्षिका श्रीमती काणे यांनी. स्वरांची व रागांची ओळख त्यांची रचना त्यातून निर्माण होणारे भावतरंग, रागांची उपयुक्तता, आदि विषय काणे बाईंनी सप्रात्याक्षिक करून घेतले. दुर्गा, देश या रागांची लक्षणगीते गायला मुलांना शिकविली.

अभिनयाचे धडे देण्यासाठी तळेगावच्या 'कलापिनी' संस्थेचे तरूण कार्यकर्ते रोज शिबिरात येत होते. त्यांच्याकडून अभिनयाचे विविध पैलू आत्मसात करण्याचा मुलांनी प्रयत्न केला.

मोठ्या गटाचा विषय 'क्षेत्र परिचय' असा होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर ज्या विभिन्न क्षेत्रांत कर्तृत्व गाजवायचे आहे, त्या क्षेत्रांचा पूर्ण परिचय व्हावा अशा सत्रांची रचना केली होती. व्याख्यानांचे विषय व व्याख्याते असे होते.

संगणकाची अजब दुनिया - संजीवनी महाजन,
स्थापत्यशास्त्र - आप्पासाहेब वज्रम,
आरोग्य आणि आहार - डॉ. दिलीप देवधर
महत्वाचे शोध व शास्त्रज्ञ - सुनील कुलकर्णी,
अमेरिकेतील लोकजीवन - ज्ञानेश पुरंदरे,
रामसिंग कुका यांचे चरित्र - मिलिंद सबनीस,
व्यथा फासेपारध्यांच्या - गिरीशराव प्रभुणे
भावलेली माणसे - दि.दा. जोशी
आज्ञांमागील गर्भितार्थ - शिरीष पटवर्धन
काश्मीरातील दहशतवाद - संजय तांबट,
काही अजरामर साहित्यकृती -जयंतराव कवठेकर

शिबिराच्या समारोपाला प्रसिध्द विधिज्ञ भाई पंडित यांनी मार्गदर्शन केले. फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य हे दोघेही या समारोप कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.


**मैत्री परिसराशी :-**

दिवाळीपूर्वी महिनाभर शिविराचे नियोजन व शिबिराच्या विषयाची निश्चिती करण्यासाठी भागशः बैठक झाली. भाग १ कडे लहान गटाच्या व भाग २ कडे मोठ्या गटाच्या शिबिराची जबाबदारी होती. बैठकीत बोलताना अखंडानंद शाखांचे शाखापालक डॉ. देवपूरकर म्हणाले की, आजकाल मुलांना संगणक, इंटरनेट इत्यादि आधुनिक गोष्टींची बरीच माहिती आहे, पण आपण राहतो त्या परिसरातील वृक्ष,पक्षी, सूक्ष्मजीव यांची साधी ओळखही मुलांना नाही. तेव्हा 'परिसर घटकांशी मैत्री' असा लहान गटाच्या शिबिराचा विषय निश्चित झाला. शिबिरात नुसत्या व्याख्यानांपेक्षा निसर्गात जाऊन प्रत्यक्ष पाना-फुलांशी संवाद साधावा, अशी कार्यक्रमांची रचना केली होती.

कोथरूडच्या एम.आय.टी. शाळेची राजप्रासादासारखी वास्तू पाहून सर्व मुले हरखून गेली. अशा भव्य, सुंदर शाळेत मित्रांसमवेत पाच दिवस शिविरासाठी आपल्याला राहायला मिळणार, याचा

**नको भावनेने करूं एक काही । तिला बुध्दिची, युक्तिची जोड देई ॥**
**जिथे बुध्दी, युक्ती मिळे भावनेला । तिथे आड येईल का कोण बोला ॥**

कोण आनंद त्यांना झाला होता. अखंडानंद शाखेचे राहूल घारे हे शिबिरप्रमुख म्हणून काम पहात होते. पहिल्याच दिवशी सकाळी डॉ. प्र. के.घाणेकर व प्रा. डॉ. पानसे सर यांनी कमला नेहरू उद्यानात मुलांना नेले व तेथील विविध वृक्षांचा प्रबंध परिचय करून दिला.



मुलांनी अनेक प्रश्न विचारले. वृक्षांचे महत्त्व व उपयोग समजावून घेतला. आता अन्यत्र कोठेही हे वृक्ष दिसले, तर आपण त्यांना ओळखू शकू, असा विश्वास त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. या शिबिरात झालेली अन्य व्याख्याने खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| निसर्गाचे सूक्ष्मनिरीक्षण | - डॉ. देवपूरकर |
| कीटक आणि प्राणी | - डॉ. पी. व्ही. जोशी |
| कुतूहलपूर्ण खगोलशास्त्र | - समीर करंदीकर |
| पक्षी विश्व (स्लाईडस्) | - डॉ. सत्यशील नाईक |
| ओळख सर्पांची | - निशीकांत वाईकर |
| मधमाशांची दुनिया | - डॉ. क. कृ. क्षीरसागर |

रात्र कार्यक्रमात रोज खालील विषयांवरील स्लाइडस् दाखविण्यात आल्या.

'पुणे : भूतकाळातून फेरफटका', 'नाही जीवन वनस्पतीविना', 'वनस्पतींचे अनुकूलन', 'आपले अन्न' 'भात आपले मुख्य अन्न' हे स्लाईड शोज रंगले, ते नकुल थावरे या ११वीतील दादाच्या खुमासदार निवेदनामुळे. सायंकाळी मैदानी खेळानंतर एक नवीनच उपक्रम या शिबिरात संजीवनीताई महाजन यांनी सुरू केला. उपयुक्त योगासने, ओंकारध्यान, प्राणायाम व भजन असा कार्यक्रम रोज चालायचा. मुलांना तो खूप आवडला. चित्ताची प्रसन्नता आणि मनाची शांतता या अवस्थांची प्रत्यक्ष प्रचीती या कार्यक्रमातून जाणवू लागली. हा उपक्रम प्रत्येक शिबिरात हवा अशी प्रतिक्रिया शिबिरार्थींनी आपल्या लिखित शोध-बोधात व्यक्त केली आहे. विघ्नेश साने यांनी शिबीर समारोपात बोलताना सर्व विषयांचा आढावा घेतला. ८वी ते १०वी या गटाच्या शिबिराचा विषय 'शोध आणि शास्त्रज्ञ' हा होता. शिबिरात खालील व्याख्याने झाली.



| | |
|---|---|
| विज्ञानातील गमतीजमती | - डॉ. मोडक, |
| थोर शास्त्रज्ञांचा परिचय | - डॉ. म.वि. पानसे, |
| एम विश्वेश्वरैय्या चरित्रकथन | - श्री. आदमणे, |
| शोध कसे लागतात? | - शरदराव गोडसे, |
| हवामानाचा अभ्यास | - मनोहर जोशी, |
| दैनंदिन जीवनातील विज्ञान | - प्रा. साठे, |
| 'कालयंत्र' विज्ञान कथा | - सौ. अपर्णा बोकील, |
| अंटार्क्टिकावरील अनुभव | - सुहासराव काणे, |
| आकाशदर्शन | - समीर करंदीकर, |
| जनुकांचा आराखडा | - डॉ. देवपूरकर |

शिबिराच्या समारोपात आयुकामध्ये काम करणाऱ्या श्रीमती कुलकर्णी यांनी वर्धकांना मार्गदर्शन केले. विवेकानंद शाखेचे शाखाप्रमुख अमर वाबळे हे शिबीरप्रमुख होते.

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

**प्रेरणा :- चरित्रांच्या व शोधांच्या**

शिबिर प्रमुख - कु. किरण राठी

वार्षिक परीक्षा संपताच वेध लागतात, ते उन्हाळी

**वरिष्ठाधिकारी म्हणे ते करावे । तयाचे कदा बोल ना फोल व्हावे ॥**
**नको दोष त्याचे कनिष्ठास दावूं । वरिष्ठासवे तूं न वागे दिखावू ॥**

ग्रामशिबिराचे आणि या ग्रामशिबिराची तर न्यारीच मजा असते. मुळशी तालुक्यातील पौडच्या आजुबाजूच्या अनेक खेड्यातील संमिलित झालेली ही मुले, मुली; अंताक्षरी स्पर्धेत तल्लीन होऊन गाणारी मुले, खेळातील खजिन्याच्या शोधात देहभान हरपून धावणारी ही मुले पाहिली की स्वतःचे देहभान हरपते व शिबीराचा कालावधी कसा संपतो ते कळतही नाही.

चारही दिशेतून आलेली ही मुलं जेव्हा शिबिराच्या समारोपानंतर एकमेकांचा निरोप घेतात, तेव्हा त्यांचे डोळे पाणावलेले असतात. वेगवेगळया गावांची, विचारांची व मतभेदाची हद्द या अश्रूंबरोबर केव्हा पुसली जाते, ते कळतही नाही आणि पुन्हा असंच एकत्र यायचे असा निश्चय मनाशी करून सारे जण परततात ते पुन्हा परत येण्याच्या निश्चयानेच.

असे हे हवेहवेसे वाटणारे ग्रामशिबीर यंदाही उन्हाळयात १२ ते १६ एपिल या कालावधीत पौडमधील शिवछत्रपती विद्यालयात संपन्न झाले. शिबिराची तयारी मार्च महिन्यापासून चालू झाली. अनेक गावांतील अगदी अंतर्गत भागात जिथे एस्.टी.ही पोहोचत नाही, अशा गावातून गुणी विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. शिबिरात सर्व गुणी आणि चुणचुणीत विद्यार्थी घेण्याच्या उद्देशाने एक सर्व समावेशक निवड चाचणी घेण्यात आली. या निवडचाचणीत ज्याची निवड होईल, त्यालाच शिबीरात यायला मिळेल, या अटींमुळे जणू एक प्रकारचे आव्हानात्मक व प्रेरणादायी वातावरण सर्व शाळांमध्ये निर्माण झाले होते.

बारा शाळांमधून एकूण १६०० विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. अशा १६०० विद्यार्थी-विद्यार्थीनींमधून चांगल्या गुणांने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची ग्रामशिबिरासाठी निवड झाली.

**संपर्क मोहीम -**

विद्यार्थ्यांची निवड तर झाली; पण आता मोहीम होती ती संपर्काची. पुण्यातील मुला - मुलींच्या शाखेतील ८वी, ९वी व १० वी तील अनेक वर्धक वर्धिका संपर्क मोहिमेसाठी सज्ज झाल्या. ही सर्व मंडळी पुण्याहून सकाळी आठला निघायची. मग प्रत्येक गटाची एका मध्यवर्ती ठिकाणाहून वेगवेगळया गावात, वाड्यात व वस्तीत रवानगी केली जाई. पुण्याच्या बंदिस्त वातावरणातून गावातील या मोकळया वातावणात मुक्तपणे डोंगर-कपारीतून, झाडा झुडुपातून, रानावनातून गावातील काही चुणचुणीत व खडान् खडा माहिती असलेल्या मुलांबरोबर भटकंती करीत-करीत झालेला संपर्क, गावकऱ्यांशी मारलेल्या मनमोकळया गप्पा, वाटेतच फणस, करवंद, कैऱ्या यांसारख्या रानमेव्याची लुटलेली मौज या सर्व वातावरणात ४०० विद्यार्थ्यांकडे संपर्क कसा झाला हे कळलंसुध्दा नाही.

**अखेर शिबिराचा दिवस उजाडला !**

१२ एप्रिलला सकाळी ११ वाजता शिबिराच्या सर्व साहित्यांसहित वर्धक-वर्धिका व युवा कार्यकर्त्यांसह ग्राम विकास प्रकल्पाची गाडी पौडमध्ये येऊन धडकली. पौडच्या शिवछत्रपती विद्यालयात दुपारी चार वाजता शिबिर सुरू होणार होते. दुपारी १२ पासून वेगवेगळया गावांमधून मुलं-मुली येऊ लागली. संध्याकाळपर्यंत शिबिरार्थीची संख्या एकूण १७० झाली. पौड, माले, चाले कोळवण, काशिग, खेचरे, कुळे. बावधन, आंबेगाव, आसदे अशा अनेक गावचे विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र जमले होते.

गटरचना झाल्यानंतर प्रार्थना होऊन खऱ्या अर्थाने शिबिराला सुरुवात झाली. भोजनानंतर ज्ञानेश पुरंदरे यांनी मुलांना ‘खादाड - भीम’ ही विनोदी कथा सांगून

> **जरी भिन्नता ये कदा बांधवांशी ।**
> **तरी दाखवी ती न केव्हां कुणाशीं ॥**

पोट धरून हसवले.

**शिबिराचा विषय -**

या शिबीराचे विषयसत्र होते, प्रेरणादायी चरित्रे व 'शोध असे लागतात'. ह्यामध्ये शिरीष पटवर्धन यांचे स्वामी विवेकानंद - एक संघटक, ॲड. नंदू फडके यांचे 'संघटक श्रीकृष्ण' या विषयांवर प्रेरणादायी सत्र झाले. 'शोध असे लागतात' या सत्रात अपर्णा बोकील यांनी रबराचा शोध कसा लागला, ह्याबरोबरच चित्तथरारक व मुलांना गुंग करून टाकणारी डायनासोरची एक विज्ञान कथा ऐकविली. शोध असे लागतात या सत्रातच सौ. बागेश्री पोंक्षे यांनी मुलांना खिळवून ठेवणारे डॉ. जॉर्ज कार्व्हर यांचे चरित्र सांगून त्यांनी लावलेल्या विविध क्षेत्रातील शोधांची माहिती दिली. याशिवाय खालील माहितीप्रद सत्रेही झाली



श्री. आदमाने सर - तारे निर्मिती

श्री. पुणेतांबेकर व सौ. टुमणे - वैज्ञानिक खेळणी

मैदानी खेळ, अनेक बौध्दिक व विविध गुणदर्शनाच्या स्पर्धा, प्रेरणादायी व्याख्यानं, त्याबरोबरच सामाजिक व वैयक्तिक कर्तव्याची जाणीव निर्माण करणारे गटकार्य व कृतीसत्र म्हणजे शिबिरातील एक लक्षात राहणारा कार्यक्रम होता.

यामध्ये प्रथम आरोग्य व स्वच्छतादर्शक अशा घोषवाक्य लिखाणाची स्पर्धा मुलांमध्ये घेण्यात आली. यात अनेक छान-छान घोषवाक्ये मुलांनी तयार केली.

* *"नका जाळू लाकडे, नाहीतर एक दिवस व्हाल सिमेंटच्या जंगलातील माकडे"*

* *"मनाच्या आरशाला विचारांची जोड,*
*स्वच्छतेच्या कार्याला एकतेची ओढ"*

* *"निर्मळ आचार निर्मळ विचार,*
*निर्मळ जीवन जगू या*
*स्वच्छतेला जाऊ या,*
*हो स्वच्छतेला जागू या "*

* *"नका ठेवू अंगारे-धुपारे यावर विश्वास नाहीतर घालाल आपले आरोग्य धोक्यात"*

* *"स्वच्छतेचा घेऊ वसा, रोगराईचा पाडू फडशा"*

त्यानंतर सर्व मुलांचे आठ गट पाडण्यात आले व पौडमधील विविध सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. त्यामध्ये पौडचे बसस्थानक, दवाखाना, शंकराचे मंदिर, दत्ताचे मंदिर, पंचायत कार्यालय, स्मशान भूमी या ठिकाणचा समावेश होता. स्वच्छता झाल्यावर मुलांनीच तयार केलेली घोषवाक्ये रंगवून तेथे लावण्यात आली. सारे गावकरी ही स्वच्छता मोहीम मोठ्या कौतुकाने पाहात होते. काहीजण त्यात स्वेच्छेने सहभागीही झाले.

तिसऱ्या दिवशीचे गटकार्य होते, गावातल्या अनेक मान्यवर नागरिकांच्या मुलाखती. त्यामध्ये गावचे सरपंच, गटशिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी, बँक मॅनेजर, पशुसंवर्धन अधिकारी, तहसीलदार, नायब-तहसिलदार इत्यादिंचा समावेश होता. या मुलाखतींच्याद्वारे मुलांमध्ये मोकळेपणाने प्रश्न विचारण्याचे धारिष्ट्य तर आलेच; पण गावचे कार्य - मग ते न्यायदानाचे असो, शिक्षणाचे असो, संरक्षण वा आरोग्याचे असे ते कसे चालते, त्याची प्रशासकीय रचना कशी आहे, भ्रष्टाचार नेमका का व कसा होतो इत्यादि सर्व गोष्टींची माहिती मिळाली.


**कदा मानसी तृप्तता ती नसावी । मिळे तें कमी लेखुनी धांव घ्यावी ॥**
**महा वाढुं द्या त्याग कार्यात साचा । जसा वाढला सान मासा मनूचा ॥**

**'अखेर निरोपाचा दिवस उजाडला'** -
गंमत - जंमत, स्पर्धा, खेळ, पद्य, आरोळया, व्याख्यानं, गटकार्य या सर्वाच्या धामधुमीत शिबिराचे चार दिवस कसे सरले हे कळलेच नाही. आणि दि. १६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शिबिराचा समारोप झाला. काही शाळेतील शिक्षक, काही पालक या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी बंकटशेठ मुंदडा, तर प्रमुख पाहूणे म्हणून दिनेश कुलकर्णी कार्यक्रमाला उपस्थित होते. समारोपाच्या समारंभाची वैशिष्ट्ये म्हणजे खेचरे गावातील इ. ७ वी ची विद्यार्थिनी कु. मालती तोंडे हिचे खड्या आवाजातील 'हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या रे '' हे पद्य. या पद्यातील आर्त स्वरांनी खरोखरच सारे जण भानावर आले. हा देश माझा आहे, या भावनेने साऱ्यांचेच अंतःकरण भरून आले होते. हा देश माझा आहे. महाराष्ट्र, पुणे शहर, मुळशी तालुका सारं सारं माझं आहे व आपण मुळशी तालुक्यात राहणारे सारे एक आहोत व त्यांच्यासाठीच आपल्याला झटायचे आहे, या उदात्त जाणीवेने सारे जण एकमेकांचे निरोप घेत होते.

ज्ञानाची, वात्सल्याची, आपलेपणाची शिदोरी बरोबर घेऊनच सारेच जण एकमेकांचा निरोप घेत होते. परत असेच हिवाळी शिबिरासाठी एकत्र यायचे असा दृढनिश्चय व्यक्त करीत, अश्रूंना मोकळी वाट करून देत, सर्वजण आपापल्या गावी परतले.

**संस्थाभेटी शिबिर :-**
वर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेतर्फे गेली ३-४ वर्षे पौडच्या शिवछत्रपती विद्यालयात किंवा गावच्या स्थानिक शाळांमध्ये ग्रामशिबीर घेतले जाते. पण यावर्षी हे शिबिर ग्रामशिबीर न होता 'पुणे दर्शन' शिबीर झाले. मुळशी खोऱ्याच्या ८ गावांमधील ३१ विद्यार्थी व ३३ विद्यार्थिनी या शिबिरासाठी वर्धिनीत रहायला आले. दिवसभर प्रवास करून पुण्यातील विविध संस्थांना भेट देऊन तेथील कार्य समजावून घ्यायचे व संध्याकाळी खेळ, गप्पा, गाणी, गोष्टी परस्पर परिचय व प्रेरणात्मक व्याख्याने असा दिनक्रम होता. खालील स्थानांना शिबिरार्थींनी भेट दिली-

मधुमक्षिका पालन केंद्र
आकाशवाणी
शनिवार वाडा
कात्रज दूध डेअरी
कात्रज सर्पोद्यान
दैनिक केसरी
राजा केळकर संग्रहालय,
शेती महाविद्यालय
केंद्रिय मौसम विज्ञान संस्था (सिमला ऑफिस)
मातृमंदिर - निगडी (ज्ञानप्रबोधिनीचे तारांगण)



वरील प्रत्येक ठिकाणी मुले भरपूर प्रश्न विचारीत होती. कुतूहल मिश्रित डोळ्यांनी सूक्ष्म निरीक्षण करीत होती. ग्रामीण मुले लाजरी-बुजरी असतात. हा समज त्यांनी खोटा ठरवून दाखविला.

चार दिवसांचा वर्धिनीतील कार्यकर्त्यांचा सहवास, येथील प्रेमळ वातावरण व अत्यंत आपुलकीने वागणारे ताई-दादा यांच्यामुळे घरची आठवण अजिबात झाली नाही. शिबीर संपल्यावर घरी परतताना पाय उचलेना. डोळ्यात पाणी ठरत नव्हते. प्रेमळ ताई-दादांना सोडून जायचे या विरहाचे दुःख मनात घर करून राहिले होते. अल्पशा काळात देखील मनामनातील दुवा साधणे हेच वर्धिनीच्या कार्यपध्दतीचे वैशिष्ट्य आहे.

**नेत्रतपासणी शिबिरे :-** गेल्या ५-६ वर्षांपासून फिरत्या प्रयोग शाळेच्या निमित्तानं खेड्यांशी नियमितपणे

तुझें क्षेत्र घे जाणुनी पूर्ण स्पष्ट । तिथें ओत शक्ती, तिथें ओत कष्ट ॥
दुजाच्या न क्षेत्रीं कदा डोकवावें । कुणीं साह्य मागीतले ते करावे ॥

संपर्क चालू आहे. खेड्यांमधील जीवन, तेथील तातडीच्या गरजा याचे नेमके दर्शन तेथे काम करताना होते. यातूनच आंदेशी व काशिग येथे साप्ताहिक दवाखाना सुरू झाला. डॉ. सौ. दड्डी व डॉ. सौ. कोठारे यांच्या सहकार्यामुळे दोन्ही ठिकाणी ग्रामस्थांची खूप मोठी सोय झाली. रूग्णांच्या संपर्कातून लक्षात आलं की, डोळ्यांच्या तपासणीचे शिबिर घेण्याची खूप आवश्यकता आहे. १४ मे रोजी आंदेशी व काशिग या गावी एच्. व्ही. देसाई नेत्ररूग्णालयाच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. एकाच दिवशी झालेल्या या शिबिराचा दोन्ही गावांत मिळून २०८ रूग्णांना लाभ झाला. यापैकी सुमारे ४० जणांना अल्पदरात नंबरचा चष्मा जागेवरच मिळाला. तर मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी १७ रूग्णांना त्याच दिवशी रुग्णालयाने त्यांच्या हॉस्पिटलमध्ये नेले. या सर्व रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया तर झालीच; पण तिसऱ्या दिवशी रूग्णालयानं त्यांच्या गाडीतून रूग्णांना त्यांच्या गावीपण सोडलं. नंतर जेव्हा भेटी झाल्या, तेव्हा कृतज्ञतेचे भाव त्यांच्या नजरेतून प्रकट होत होते. याचे खरे श्रेय जाते ते एच व्ही देसाई नेत्ररूग्णालयाचे डॉक्टर्स व सेवकवर्गाला.

२) दिवाळी शिबिरांच्या धामधुमीमध्ये श्री. अशोक पटवर्धन यांनी वर्धिनीच्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी शिबिरस्थानी येऊन केली. या विषयातील पुढील पाठपुराव्याचे पुढील कार्य पालकांच्या सहकार्याने पुढील वर्षी पूर्ण होईल असा विश्वास आहे.

---

## जनांचा प्रवाहो इथे चाललेला...

**- छाया गायकवाड**

यमगरवाडीच्या प्रकल्पाविषयी वर्धिनीत अनेक वेळा ऐकले होते. परंतु तो प्रकल्प प्रत्यक्षात पाहण्याची संधी नुकतीच मिळाली. प्रकल्प भेट व त्याठिकाणी दोन दिवसांचे तेथील मुलांचे शिबिर असा कार्यक्रम होता.

नियोजन करायला वेळच मिळाला नाही. तेथे गेल्यावर रात्री शिबिरात काय-काय घ्यायचे ते ठरले, व्यवस्था वाटप केले व कामाला सुरूवात केली.

समाजाने उपेक्षिलेली फासेपारधी ही जमात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत 'पालं' बदलणारी, पोलिसांचे भय मनात ठेवून जगणारी. "विंचवाचे घर पाठीवर" असं म्हणायला सोपं आहे, कारण तो एक कीटक आहे. परंतु ही तर माणसं आहेत. हाडामासाची माणसं. तरी त्यांच्या वाट्याला असं जगणं यावं! स्वतःचं स्थिर हक्काचं घर नाही, ही कल्पनाच अंगावर शहारे आणणारी आहे.

आम्ही गेलो तेव्हा मुलांची शाळा सुरू झाली होती. परंतु गावाला गेलेली मुले आली नव्हती, पण आम्हांला शिबिर घेण्यासाठी तेथील व्यवस्थापकांनी म्हणजेच जोशीकाकांनी परवानगी दिली. जोशीकाका बोलता बोलता म्हणाले, काही मुले दिवाळीला घरी गेली नव्हती; कारण त्यांचे आई-वडील त्यांना घ्यायला आलेच नाहीत. त्यापैकीच एकाचे वडील परागंदा झालेले, त्याचे आई आणि एक भाऊ घरी, मोठ्या वहीणीचे लग्न झालेले, पण आपली बहीण कोणत्या गावी आहे, हेच त्याला माहिती नव्हतं. कसं माहिती असणार? सारखी गावं बदलावी लागतात.

आम्ही यमगरवाडीला पोहोचलो. त्यादिवशी फक्त संध्याकाळचा खेळ घेतला. मैदानातून मुलांशी फार लवकर जवळीक साधता येते, त्याची प्रचीती आम्हाला यमगरवाडीलाही आली. एक तासांच्या खेळात मुलांशी फार छान ओळख झाली. यमगरवाडीची मुलं खेळात अतिशय तरबेज आहेत !

**नका इच्छुं कार्यात घ्याया विसावा ।**
**फुका डौल वाणीत केव्हा नसावा ॥**

दुसऱ्या दिवशी साडेपाचला उठलो. वातावरणात बरीच थंडी होती. परंतु एकाही मुलाच्या अंगात स्वेटर नव्हता. मी स्वेटर काढून ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु दहा मिनिटांच्यावर स्वेटरविना राहू शकले नाही. शहरी वातावरणात राहून आपण आपल्या शरीराचे फारच लाड करतो. म्हणून स्वतःची त्या क्षणी फार चीड आली. सकाळी सव्वासहा वाजता प्रातःस्मरण झाले. त्यात मुलांनी एकात्मता स्तोत्र, श्लोक म्हटले. सकाळच्या मैदानात मुलांचा बेसबॉल हा खेळ घेतला. आम्ही सांगू तो खेळ त्यांना माहीत होता. मोठेच मोठे मैदान, मुलांच्या आवडीचा खेळ, त्यामुळे आमचा खेळ खूप रंगला. वेळेअभावी खेळ मध्येच थांबवावा लागला. विशेष म्हणजे तरीही मुलांनी कोणत्याही प्रकारचा आरडाओरडा केला नाही.

संध्याकाळी पद्यस्पर्धा व प्रसंगनाट्य स्पर्धा होणार होत्या, त्यामुळे दुपारी त्याची तयारी करण्यासाठी वेळ दिला होता. चारही गटांबरोबर त्यांच्या ताई होत्या. आमचा गट 'गंगा'. गटात मुलांची संख्या चौदा. खरं तर त्या मुलांना माहीत नसलेले एखादे नवीन पद्य बसवावे असं डोक्यात होतं. परंतु बरीचशी पद्यं त्या मुलांना माहिती होती. "बिंदू बिंदूचा सिंधू झाला, हिंदू त्याचे नाव" हे पद्य बसवायला सुरूवात केली. आम्ही सांगितले की ते म्हणत, पण त्यांना एकट्याने म्हणताना बऱ्याच शब्दांचे उच्चारच करता येत नव्हते. बोलीभाषा थोडी वेगळी असल्याने त्यांना ते फार कठीण जात होते. मुलांमध्ये निराशा येऊ नये म्हणून त्यांना जे पद्य माहीत होते. तेच पद्य बसवावे लागले. प्रसंगनाट्य 'साक्षरता' या विषयावर बसवले होते. विषय सांगितल्यावर गटातल्या ६वी व ७वी च्या मुलांनी अनेक कल्पना सांगितल्या. मुलांची कल्पनाशक्ती जबरदस्त आहे. त्यांना थोडेसे प्रोत्साहन दिले, तर ते छान छान कल्पना व्यक्त करू शकतात.

शिबिराचा समारोप दिनांक ९ रोजी सकाळी झाला. खरं तर याला समारोप म्हणायचा का? ही तर सुरुवात आहे असं मला वाटलं!

वर्धिनीची प्रार्थना मी रोज म्हणते, त्याचा अर्थही खूप वेळ ऐकला आहे व बऱ्यापैकी समजला आहे. पण समारोपानंतर म्हटलेले 'जनांचा प्रवाहो इथे चाललेला' हे प्रार्थनेचे दुसरे चरण मनाला खूप भावले व मनात चलबिचल निर्माण करून गेले.

*आजुबाजूला चाललेल्या कामातील अनुभवांची देवाण-घेवाण कार्यकर्त्यांसाठी आवश्यकच असते. यातूनच कार्यकर्त्यांच्या मनाची जडण-घडण होते. याच उद्देशाने युवतीगट यावर्षी दि ६,७,८ नोव्हेंबर रोजी यमगरवाडी येथे प्रकल्पभेटीस गेला. या दोन दिवसात ६० मुला-मुलींचे एक व्यक्तिमत्व शिबीर तेथे घेतले. इतक्या कमी कालावधीमध्ये त्यांच्या अनेक समस्या युवतीगटाने समजावून घेतल्या. परतीच्या प्रवासात सर्व युवतीगटाची या मुलांवर, तेथे असलेल्या गरजांवर व आपण तेथे काम करण्याची कशी आवश्यकता आहे, यावर चर्चा झाली.*

*या प्रकल्पभेटीनंतर एका युवतीचा वाढदिवस होता. नेहमीसारख्या गप्पा-टप्पा झाल्यावर त्यानंतर तिला संकल्पाविषयी विचारले असता तिने तात्काळ असे सांगितले की, 'मी किमान एक वर्ष तरी यमगरवाडीला जाऊन तेथील प्रकल्पासाठी काम करेन' ही युवती केवळ ११वीत शिकणारी आहे. पण यमगरवाडीच्या भेटीनंतर तेथे भेडसावणाऱ्या समस्या व ते काम करण्याची असलेली आवश्यकता या सर्व गोष्टी तिच्या हृदयाला भिडल्या होत्या व त्यातूनच हा संकल्प तिने केला. हा संकल्प करण्याची तिची मानसिकता किती मोलाची होती! समाजात आपली गरज नेमकी कुठे आहे व आपण नेमके काय करायला हवे याची जाणीव होणे, हेच तर आपल्या कामाचे गमक होय.*

**कुणी भेद पाडावया आपणात । महा नीच ये पारखी त्या क्षणात ।**
**तया ठेच ! तेथे नको मोह-माया । कशा घालिसी शुध्द औदार्य वाया? ॥**

**वालशाखा : - कलाकौशल्य शिविर**

यंदाच्या वर्षी हे शिबीर कात्रजला आगम मंदिराजवळील भाऊ दुगड यांच्या निसर्गोपचार केंद्राच्या जागेत झाले. शिविरात ४० वाल उपस्थित होते. शिवीर एकूण चार दिवस होते. शिविराचा विषय होता 'कलाकौशल्य'. हस्तकला, चित्रकला यांची विविध सत्रे योजली होती. यातील वहुतेक



सत्रांना दि. दा. जोशी यांच्या सिध्दहस्त कुशल मार्गदर्शनाचा लाभ झाला होता. सर्पोद्यानात आणि शिविराजवळच्या गुरूद्वारात वालांना नेले होते. गुरूद्वारात वालांचं अत्यंत जिव्हाळयानं स्वागत झालं. सर्व मुलं तिथल्या भजनात सहभागी झाली. गुरूद्वारातल्या सर्वांनी त्यांचं खूप कौतुक केलं. आपुलकीनं खाऊही दिला. भाऊ दुगड सातत्यानं शिविरात येऊन मुलांची चौकशी करत. त्याचं अत्यंत मोलाचं सहकार्य लाभलं होतं.

## फिरती प्रयोगशाळा आणि ग्रामविकास प्रकल्प

जानेवारी ते मे महिन्यादरम्यान एकूण तीन प्रकारे हा प्रकल्प राबविण्यात आला.

**शैक्षणिक मार्गदर्शन :-** ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना प्रामुख्याने इंग्रजी व शास्त्र या विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले. हे विद्यार्थी माले, खेचरे, कोळवण, काशिग, आंवेगाव व वावधन गावातील होते. शास्त्र विषयाच्या मार्गदर्शनाबरोबरच ९वी व १०वीच्या विद्यार्थ्यांनी शास्त्रातील प्रयोग स्वतः केले, तर काही प्रयोग त्यांना करून दाखविण्यात आले.

**उत्तरपत्रिका लेखन तंत्र :-** १०वीच्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका कशी लिहावी, याचा मार्गदर्शनपर वर्ग १८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला. या वर्गात वरील सर्व गावांतील एकूण ७० विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि त्यांना अपर्णा वोकील व संजीवनी महाजन यांनी मार्गदर्शन केले.



**आरोग्य केंद्र :-** काशिग येथे दर बुधवारी आरोग्य केंद्र चालविण्यात येते. केंद्रात डॉ. सौ. दड्डी व डॉ. सौ. कोठारे यांनी रूग्णांवर प्राथमिक औषधोपचार केले. दर बुधवारी सुमारे ३५ ते ४० रूग्ण या केंद्राचा लाभ घेतात

जून २००० मध्ये पौड, कोळवण, शेरे, काशिग, आंवेगाव, वावधन व माले, कुळे या गावातील शाळांच्या मुख्याध्यापकांची एक वैठक आयोजित करण्यात आली.

वैठकीस पौड, शेरे, कोळवण येथील मुख्याध्यापक व काही शिक्षक प्रतिनिधी वैठकीस उपस्थित होते. नव्या शैक्षणिक वर्षात कोणता अभ्यासक्रम घ्यावा, याचे नियोजन हा मुख्य मुद्दा या वैठकीत होता.

वैठकीत खालील वावी निश्चित करण्यात आल्या.

मार्च २००० च्या दहावी परीक्षेचा निकाल खूप कमी लागला. त्याचे कारण इंग्रजी व गणित या विषयात मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण खूप कमी होते. त्यामुळे या वर्षात गणित व इंग्रजी विषयांच्या मार्गदर्शनावर भर असावा.

इ. १० वीच्या प्रयोग परीक्षेच्या प्रयोगांची जवावदारी शाळांनी उचलली. आवश्यक तेव्हा मार्गदर्शन 'स्व'-रूपवर्धिनीने करावे, असे शाळांनी सुचविले.

**उडी संकटीं टाकण्या सिध्द व्हावे । कदा मानविंदू हिरावू न द्यावे ॥**
**प्रसंगीं स्वदेशास्तवे सोड सत्ता । प्रसंगात स्वार्थावरी मार लत्ता ॥**

उन्हाळी व हिवाळी सुटीत १०वी साठी गणित व इंग्रजी विषयांच्या तासिका घ्याव्यात, असे सुचविण्यात आले

**शैक्षणिक मार्गदर्शन : -** बैठकीत ठरल्याप्रमाणे गणित व इंग्रजीचे मार्गदर्शन करण्याचे टरले. त्याप्रमाणे एका गावात आठवड्यातून एकदा जाणे व दोन तास शिकवणे हे पुरणार नाही, असे लक्षात आल्याने आठवड्यातून एका गावी दोनदा जाण्याचे ठरविले व त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले.

काशिग येथील शाळेत १०वीला फक्त इंग्रजी व भूमितीचेच मार्गदर्शन हवे होते. त्यामुळे काशिग येथे एक दिवस व खेचरे येथेही आठवड्यातून एक दिवस जाण्याचे ठरले.

पौड येथे शाळेच्या वेळेआधी दीड तास अशी वेळ ठरविण्यात आली. १०वी मधील सुमारे १००-१२५ विद्यार्थी -विद्यार्थीनी अतिशय उत्साहाने या तासांना उपस्थित असतात.

**पेटी वाचनालय :-** मुलांनी स्वतःहून अभ्यास केला, तरच त्यांची प्रगती होऊ शकेल, या विचाराने त्याची पहिली पायरी म्हणून वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून खेचरे येथे पेटी वाचनालय नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आले. शंभर मुलांना पुस्तके वाचण्यासाठी घरी देण्यात आली. ३१ डिसेंबर पर्यंत ८० विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ५ पुस्तके वाचली. आता मुलांची मागणी वाढली असून त्यांना चरित्रे, मोठी पुस्तके हवी असतात.

**व्याख्यानसत्रे :-** २३ नोव्हेंबरपासून प्रेरणादायी व्याख्यानसत्रे खेचरे येथेच सुरू करण्यात आली. शाळेस दुपारी २ ते ३ या वेळात सुटी असते. दुपारी २ ते २॥ पर्यंत एकत्र भोजनाचा कार्यक्रम झाल्यावर २॥ ते ३॥ या वेळात प्रेरणादायी व्याख्याने आयोजित करण्यात आली. दर गुरूवारी ही व्याख्याने होतात. डिसेंबरपर्यंत एकूण ५ व्याख्याने झाली असून मुलांनाही त्याची गोडी वाटू लागली आहे. विद्यार्थी गुरूवारच्या पुस्तकांची व व्याख्यानाची आतुरतेने वाट बघत असतात.

## अशा 'बाया' हव्या आहेत !

महर्षी अण्णासाहेब कर्व्यांच्या कार्यात बाया कर्व्यांच्याही कर्तृत्वाचं मोठं योगदान आहे. हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या वतीनं 'बाया कर्वे' पुरस्कार स्त्रियांच्या उत्थानासाठी भरीव काम करणाऱ्या स्त्री कार्यकर्तीला दिला जातो. हा पुरस्कार अतिशय मानाचा समजला जातो. वर्धिनीच्या शारदामणी महिला विभागाद्वारे मुली व गरजू महिलांसाठी अनेक उपक्रम गेल्या दहा वर्षांपासून केले जातात. या महिला विभागाचं काम प्रामुख्यानं पहाणाऱ्या वर्धिनीच्या पूर्णवेळ कार्यकर्त्या श्रीमती पुष्पाताई नडे यांना यावर्षी 'बाया कर्वे ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताचे निवृत्त सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांच्या हस्ते व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू वि. ग. भिडे यांच्या अध्यक्षतेखाली हा सन्मान त्यांना देण्यात आला. स्त्रियांच्या प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता समाजामध्ये तळमळीनं काम करणाऱ्या अनेक बाया कर्व्यांची गरज आहे हेच त्या कार्यक्रमातून जाणवत होते.

**करा सर्व बंध पुरे आपुलेसे । भरा शक्तिने, स्फूर्तिने त्या पुरेसे ॥**
**तयां मार्ग त्यागी तुम्ही दाखवोनी । त्वरे दाखवा देश हा उध्दरोनी ॥**

## बालवाडी व महिला विभाग

**सहल :-** बालवाडीची सहल अभिरूचीमध्ये गेली होती. बालवाडी शिक्षिकांनी सहलीची गाडी फुग्यांनी, चमक्यांनी सुंदर सजवली होती. मुलांचे गट ओळखता यावेत म्हणून गटांनुसार रिबिनी आणि चॉकलेटच्या कागदांच्या पाकोळ्या करून लावल्या होत्या. जेवण अभिरूचीतच असल्याने सकाळी येताना नेहमीप्रमाणे डबे आणायचे नव्हते. डब्यांचा व्याप नसल्यानेच की काय पालकमंडळी जरा अधिकच खूष वाटली !

गाडीत लावलेल्या फुग्यांमुळे मुलांना खूप मजा वाटत होती. त्यांनी गाडीत कितीतरी छान छान गाणी म्हटली. अभिरूचीपाशी गाडी कधी पोहोचली तेही कळलं नाही. अभिरूचीत पोचल्यावर सि-सॉ, घसरगुंडी, झोका पाहून मुलं एकदम खूष झाली. सगळी तिकडं धावतच सुटली. काही जणांना तर हे सगळं नवं नवं पाहून काय करावं आणि काय नाही, असं झालं!

मुलांचं खेळणं संपत आलं, तोच विदूषक मुलांच्या दृष्टीला पडला. सगळीजण त्याच्याकडे धावली. त्याला पाहून मुलं, 'टिलू जोकर, लांबनाक्या विदूषक' अशी गाणी म्हणू लागली. मुलांची गाणी ऐकून विदुषकालाही रंग चढला. त्यानंही त्यांच्याबरोबर पकडापकडीचा खेळ सुरू केला. मुलांना खूप मजा वाटत होती. कारण त्यांनी आतापर्यंत विदुषकाबद्दल गाण्यात आणि गोष्टीत ऐकलं होत. कधीतरी सर्कशीत किंवा दूरदर्शनवर पाहिलं होतं. समोरासमोर, माणसासारखा माणूस असलेला विदूषक पाहून खेळात दंग झालेल्या या मुलांची पुष्पाताईंनी खूप छायाचित्रं काढली.



खेळणं झाल्यावर अभिरूचीच्या जेवणावर मुलं अगदी तुटून पडली. जेवण झाल्यावर मुलं जुरासिक पार्कमध्ये गेली. डायनासोरच्या पोटात शिरायचं अन् तोंडातून बाहेर येऊन घसरगुंडीवरून घसरत खाली यायचं. मुलांना हा खेळ खूप आवडला. यानंतर बागेतला फेरफटका झाला. तेथील शेतामधील वांगी, भोपळा, मिरची, बीट, मुळे अशा सगळ्या भाज्या मुलांना मुद्दाम दाखवल्या. बांबूच्या घरातही मुलं जाऊन आली. आपण मुद्दाम दोरीचे झोके केले होते, ते बांधल्यावर झोक्यांच्या आनंदात मुलं अगदी दंग झाली.

मुलांनी सहलीची मजा मनमुराद लुटली. इतकी की, त्यांना सबंध दिवसात अगदी वर्धिनीत परतेपर्यन्त आईवडिलांची आठवणही झाली नाही.

**उत्सव :-**

२६ जानेवारी, गणेशजयंती, होळी, गुढीपाडवा, रामनवमी, हनुमानजयंती असे सगळे सण बालवाडीत आवर्जून साजरे केले गेले. मुलांना सणांचं माहात्म्य सांगणाऱ्या कथा सांगितल्या. काही सणांना त्या त्या देवतेचं पूजन आरतीही करण्यात आली. रंगपंचमी छोट्यांच्या बरोबरीनं सगळ्या शिक्षिकांनीही मनसोक्त साजरी केली.

**शिबीर :** यंदा प्रथमच पाच दिवसांचं उन्हाळी शिबीर झालं. गाणी, गोष्टी यात मुलं छान रंगली. आपली कामं आपणच करायची- म्हणजेच स्वावलंबनाची - त्यांची हौस दांडगी होती. याच्या जोडीला हस्तकला, चित्रकला, मातीकाम, कोलाजकाम, ठसेकाम, कातरकाम

**मुळें कैक जातात भूमीत खोल । जगा ज्ञात होते न सेवा अमोल ॥**
**तयांच्या प्रमाणेच हिंदू झिजावा । वरी वैभवे राष्ट्ररूपे उरावा ॥**

यातही मुलांनी रस घेतला. चित्र, आकृती चिकटवणं हेही त्यांनी केलं.

मुलांच्या पालकांनाही हे शिबीर खूप आवडलं, 'लग्नाला जायचं होतं, पण मुलाचा हट्ट मोडवेना. त्याला शिबिरात आणून सोडलं. आणि खरोखरच आमच्या मुलाला शिबिराचा चांगला उपयोग झाला!', 'आमची मुलं या शिबिरात खूप काही चांगलं शिकली.' 'वर्धिनीनं अशी शिबिरं वारंवार घ्यावीत आणि आमच्या मुलांना प्रोत्साहन द्यावं.' ... अशा सहज प्रतिक्रिया उमटल्या.

**नवीन वर्ष :** मे महिन्याची सुटी संपली. जूनमध्ये प्रथम शिक्षिकांची 'शाळा' सुरू झाली. एका चांगल्या बालवाडीला भेट देण्याचा उपक्रम झाला. तेथील नवीन चांगल्या कल्पनांचे निरीक्षण केले आणि वर्धिनीच्या शिक्षिकांनी त्या कल्पनांना आपल्या कल्पनांची जोड देऊन वर्गांची सजावट केली. सर्व व्यवस्थांचं वाटप झालं. नवीन खेळ विकत घेतले. नवीन शैक्षणिक साधनंही आणली. काही साधनं शिक्षिकांनी तयार केली.

१२ जूनला बालवाडी सुरू झाली. छोट्या गटात ६७, मधल्या गटात ९६ आणि मोठ्या गटात १२१ असे एकूण २८४ जणांनी यंदा प्रवेश घेतला.

**पालखी : एक विशेष उपक्रम** : प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीला बालवाडीची पालखी निघाली होती. मुलांनी वर्धिनीत येताना घरून सुरेख पालख्या करून आणल्या. त्या आधी सर्व वर्गात ताईंनी पालखीची माहिती सांगितली होतीच. वर्धिनीची पालखीही उत्तम सजली होती. पांडुरंग रूक्मिणी आणि संत मंडळ यांच्या प्रतिमा छोट्यांनी अगदी समरसून उभ्या केल्या. चौकाचौकात रिंगण झाले. भजने झाली. घोषणा झाल्या. पालखीनं सर्वांना दंग केलं. नागरिकांनी या सोहळ्याचा आनंद कौतुकानं घेतला आणि या सगळ्यात मजेशीर भर होती, ती आपापले फेटे, धोतर आणि साड्याही सावरणाऱ्या पांडुरंग-रूक्मिणी आणि संत मंडळाची.

**स्वयंसिध्दा** - शारदामणी महिला विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उद्योगशिक्षण अभ्यासक्रमांचा अनेक गरजू महिला लाभ घेतात. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर येथील शिक्षणाचा, संस्कारक्षम वातावरणाचा, प्रत्यक्ष जीवनव्यवहारामध्ये कशाप्रकारे उपयोग होतो? येथे घेतलेल्या शिक्षणाच्या आधारावर आर्थिकदृष्ट्या स्थैर्य कितपत मिळू शकले आहे? हे जाणून घेण्याच्या दृष्टीने शनिवार दि. २४ जून, रोजी एक महिला मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला शिवण, गृहपरिचर्या, बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग इत्यादी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालेल्या महिला, तसेच या सर्व अभ्यासक्रमांच्या अध्यापिका उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंद्राताई दलाया विद्याताई बापट या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरूवातीला उपस्थित महिलांनी मोकळेपणाने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. वर्धिनीत शिकत असताना आलेले अनुभव सांगताना अनेकांनी डोळे पाणावले. त्यांच्यापैकी काहींच्या बोलक्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे - (बालवाडी शिक्षिका अभ्यासक्रम)

* वर्धिनीमध्ये मी शिकायला येताना मी माहेरी येत आहे, असेच मला वाटत होते. येथील दर्जेदार शिक्षणामुळेच मला एका चांगल्या शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी मिळाली.
* बालवाडी अभ्यासक्रमवर्ग करण्याची तीव्र इच्छा होती. पण प्रश्न होता माझ्या छोट्या बाळाचा. बाळासह येऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची परवानगी मिळाल्यामुळेच मला हा अभ्यासक्रम पूर्ण करता आला. आज मी जेथे कामाला आहे, तेथे मला चांगला मोबदला मिळतो आहे.

**खरा त्याग केल्यास पस्ताव केव्हा ॥ न वाटे कुणाला तसा गर्वही वा ॥**
**खरा त्याग निःस्वार्थ बुध्दींतुनी तो । उफाळूनि कार्यात्तवे व्यक्त होतो ॥**

* अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापूर्वी माझी मनस्थिती मुळीच चांगली नव्हती. येथे अभ्यासक्रम पूर्ण करता करता मी मानसिकदृष्ट्याही सावरले गेले, ते केवळ येथील आपुलकीच्या वातावरणामुळे.
* माझ्या आयुष्यातील कडक उन्हाचे दिवस जाऊन मला सुखाची सावली येथे मिळाली. (गृहपरिचर्या)
* सुरूवातीला अभ्यासक्रम पूर्ण करताना खात्री वाटत नव्हती, पण अभ्यासक्रम पूर्ण केला अन् लगेचच एका हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळाली. तेथील काम करताना मला कोणतीच अडचण येत नाही.
* अभ्यासक्रमामध्ये दिलेल्या के.ई.एम. हॉस्पिटल-मधील प्रत्यक्ष अनुभवांचा मला आज नोकरी करताना खूप चांगला उपयोग होतो आहे.

सर्व प्रशिक्षणार्थींच्या मनोगतानंतर मार्गदर्शन करताना श्रीमती विद्याताई बापट म्हणाल्या की, "अशाप्रकारचे अभ्यासक्रम अनेक संस्थांमधून चालत असतील; परंतु माणूस घडविण्याचे जे काम वर्धिनीसारख्या संस्थांमधून चालते, ते सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहिले पाहिजे. स्त्रियांप्रमाणे पुरूषही दुर्बळ असू शकतो. तसेंच पुरूषांप्रमाणे स्त्रीसुध्दा शूरवीर असू शकते हे महिलांनी विसरता कामा नये. स्त्रिया या परमेश्वराच्या अधिक जवळ असतात म्हणूनच स्त्रियांना अधिक सुंदर व प्रेमळ केले आहे. काम करताना त्या कामालाच परमेश्वर माना.

## महिला विभाग - विविध अभ्यासक्रम व उपक्रम

१) **रुग्ण परिचर्या (होम नर्सिंग):** दुपारी १२ ते ३ ही या वर्गाची वेळ आहे. यंदा २० महिला प्रशिक्षण घेत आहेत. एकूण अकरा विषय शिकविले जातात. के. ई. एम्. रुग्णालयात प्रात्यक्षिक घेतले जाते. विविध रोगांसंबंधी चित्रपट दाखविले जातात. व्याख्याने होतात. शंकासमाधान केले जाते. रुग्णांना द्यावयाच्या आहाराची प्रात्यक्षिकेही होतात. गेल्या दहा वर्षात ४०० रुग्ण सेविकांना या लाभ झाला आहे. स्वतःच्या पायावर उभ्या राहून आपल्या कुटुंबालाही त्या आधार देत आहेत. श्रीमती जयंती कलबाग व सौ. नयना मराठे वर्गप्रमुख आहेत.

२) **बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग :** सकाळी ९ ते दुपारी ४ ही वर्गाची वेळ आहे. यावर्षी २२ महिला या वर्गात आहेत. एकूण दहा विषय शिकविले जातात. वर्धिनीच्या बालवाडीवर प्रात्यक्षिके होतात. बालकांकरिता चालणाऱ्या विविध उपक्रमांचे मार्गदर्शन केले जाते. तसेच नावाजलेल्या बालशाळाही चालविल्या जातात. विविध सामाजिक संस्थांना भेटी दिल्या जातात. गेल्या चार वर्षात एकूण ८८ महिलांना या वर्गाचा लाभ झाला आहे. वर्गाच्या प्रमुख श्रीमती पुष्पाताई नडे तसेच सौ. शुभदा बदामीकर, सौ. अंजली गुप्ते, सौ. मंगला मोडक, सौ. कुंदा वर्तक, श्रीमती पुष्पा जबडे, श्रीमती सुरेखा पेंडसे, सौ. आशा लिमये, सौ. निर्मला सोहोनी, सौ. नलिनी अक्कलकोटकर व कु. आरती बोराडे यांचे मार्गदर्शन लाभते.

३) **शिवणवर्ग :** दुपारी १ ते ३ ही वर्गाची वेळ आहे. यंदा २५ महिला या वर्गात आहेत. थेअरी व प्रॅक्टिकल याद्वारे ११ कपडे शिकविले जातात. मशिन दुरुस्तीपर्यंत सर्व शिक्षण दिले जाते. १० वर्षांत एकूण ३५० जणींना वर्गाचा लाभ झाला आहे. सौ. माधुरी गुरव वर्गप्रमुख आहेत.

**मरायास होतात जे सिध्द सारे । अशांना रिपू पाहुनीया थरारे ॥**
**मरायास व्हा सिध्द तेणे जगाल । जगोनी जगी कीर्तिला जागवाल ॥**

४) **फॅशन डिझायनिंग :** दुपारी ३ ते ५ ही वर्गाची वेळ आहे. प्रॅक्टिकल वर अधिक भर दिला जातो. एकूण १५ महिला या वर्गात आहेत. गेल्या सहा वर्षात २०० जणींना वर्गाचा लाभ झाला आहे. काही जणी या कामातून दिवसाला १०० रुपयेही मिळवितात. सौ. सुदर्शना त्रिगुणाईत या वर्गप्रमुख आहेत.

५) **निटिंग :** दर गुरुवारी दुपारी १ ते ५ या वेळेत हा वर्ग चालतो. गेल्या आठ वर्षांत २५ ते ३० जणींना या वर्गाचा लाभ झाला आहे. त्यातील १० जणींनी मशिन्स विकत घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. सौ. सुजाता कुदळे या वर्गप्रमुख आहेत. सौ. पुष्पाताई कुदळे यांचे प्रारंभापासून मार्गदर्शन लाभले आहे.

६) **प्रौढ साक्षरता वर्ग :** सोमवार ते शुक्रवार दुपारी ३ ते ४ हा वर्ग चालतो. या वर्षी एकूण ३५ महिला या वर्गात शिकत आहेत.गेल्या दहा वर्षांत अनेक महिलांना या वर्गाचा लाभ झाला आहे. श्रीमती सुगंधाताई कबीर या वर्गप्रमुख आहेत.

७) **माता-बाल संगोपन केंद्र :** के.इ.एम. रूग्णालयाच्या सहकार्याने चालणाऱ्या या केंद्राचा यंदाच्या वर्षी २००० रूग्णांनी लाभ घेतला. प्रत्येक आठवड्यात बुधवारी व शनिवारी हे केंन्द्र चालते. के.ई.एम रूग्णालयातून दोन डॉक्टर्स व तीन परिचारिका या केंद्राच्या कामात यंदा सहभागी झाल्या आहेत. या केंद्राच्या माध्यमातून कुटुंब नियोजनाच्या दृष्टीनेही अनेक महिलांना मार्गदर्शन व उपचार लाभले आहेत.


८) **कौटुंबिक सल्ला केन्द्र :** ॲडव्होकेट सौ. निलीमाताई गोखले यांच्या सहकार्याने. या केंद्राचं काम सुविहितरीत्या चालू आहे. यावर्षी २० प्रकरणांमध्ये केंद्रानं योग्य मार्गदर्शन करून त्या त्या कुटुंबात सुसंवाद साधला आहे. दोन प्रकरणात घटस्फोटाचे निर्णय लागून महिलांना पोटगीही मिळवून दिली आहे.

✧ ✧ ✧

## आता यांचे केवळ स्मरण शक्य आहे ...

गेल्या वर्षभरात वर्धिनीच्या परिवारातील काही कुटुंबांमध्ये निधनाच्या दुःखद घटना घडल्या. तसेच समाजात ज्यांचे मोठे नाव होते, कर्तृत्व होते, अशा काही मान्यवरांचेही दुःखद निधन याच कालावधीत झाले. या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

- श्री. पु. ल. देशपांडे
- श्री. श्यामकांत गोखले
- श्री. जयसिंग इंगुळकर
- श्री. काका वडके
- श्री. प्रभाकरपंत सबनीस
- श्रीमती गंगूताई चव्हाण
- श्री. हनुमंत खरात
- श्री. अनिलराव देशपांडे
- श्रीमती लक्ष्मीबाई गुरव
- श्री. वसंतराव सुमंत



- कृषीतज्ज्ञ अप्पासाहेब पवार
- श्री. बसवंत तथा अप्पा कुडलिंगार
- श्री. अप्पा देशपांडे (देवरूख)
- श्री. प्रभाकरपंत भट
- श्री. मोरोपंत कुरूलकर
- श्री. सुरेशपंत मराठे (मुंबई)
- श्री. सुरेश भगत
- श्री. श्रीकांत बालाजी वाबळे
- श्री. सदाशिव हडके

**स्वधर्म स्वदेशास्तवे झुंज घेता । रणीं जो मरे शत्रुला मार देतां ॥**
**दुजा ना कुणी त्याहुनी भाग्यवंत । खरा तोच राष्ट्रीय योगी, महंत ॥**

## संधी : शिक्षणाची - प्रशिक्षणाची

मनात खूप इच्छा असते; पण काही गोष्टी आपल्याला लगेचच मिळतात असे नाही. याउलट काही वेळेस चांगली संधी अनपेक्षितपणे येते.

वार्षिक निकाल लागण्यापूर्वीच ताईनी मला वर्धिनीत काम करणार का, असे विचारले तेव्हा आनंद गगनात मावेना. जेथे शिकले तेथेच काम करण्याची संधी मिळेल याचा विचारसुध्दा मी कधी केला नव्हता. पण ती संधी मला अनपेक्षितपणे मिळाली.

सुरुवातीला संकोचल्यासारखे वाटले. नंतर सर्व व्यवस्थित रूळले. जेव्हा मी विद्यार्थिनी म्हणून होते, तेव्हापासूनच माझ्या मनात येथील शिक्षिकांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटला होता. त्यामुळेच की काय त्यांच्याप्रमाणे मुलींबरोबर वागण्याचा मी प्रयत्न करीत आहे. जे काम करीत आहे, त्यात अजून कशी प्रगती होईल याचा विचार मी सतत करीत आहे.

**- कु. आरती बोराडे**

## मान्यवरांच्या भेटी

'स्व'-रूपवर्धिनीचे काम प्रत्यक्ष पाहण्यासाठी, समजावून घेण्यासाठी व या कामाला सहाय्य कसे करता येईल, हे जाणून घेण्यासाठी वर्षभर अनेक जणांच्या भेटी होत असतात. होणाऱ्या या प्रत्येक भेटीचा कामाच्या दृष्टीनं तर खरोखरीच खूप उपयोग होतो. यावर्षीही अनेकजणांनी वर्धिनीला भेटी दिल्या. या वर्षीच्या काही महत्त्वाच्या भेटी पुढीलप्रमाणे :-

१) श्री. दत्तोपंत ठेंगडी, श्री रमणभाई शहा व त्यांच्या समवेत भारतीय मजदूर संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य.
२) श्रीमती सपना चौधरी, व्लुमिंग्टन (अमेरिका)
३) श्रीमती दारूवाला. जे. आर.डी टाटा व थेल्मा टाटा ट्रस्ट.
४)श्रीमती आरती मेनन-गुप्ता, महिंद्र फौंडेशन
५) ज्ञानप्रबोधिनीच्या जिजामाता दलाच्या सेविका.
६) राष्ट्रसेविका समिती, पुणे महानगराच्या सेविका.

## मानवका कल्याण न भूले !

दि. १३ जानेवारी रोजी वर्धिनीचे काम पहाण्यासाठी रा. स्व. संघाचे सरसंघचालक प. पू. रज्जूभैय्या हे वर्धिनीत आले होते. स्वतःच्या विकासाचा ध्यास घेत असतानाच आपल्या विकासाबरोबरच समाजाच्या कल्याणाचा विचार जो 'स्व'-रूपवर्धिनीने आपल्याला दिला आहे, तो डोळयासमोर ठेऊन आपल्या आयुष्याची आखणी करावी, असा संदेश त्यांनी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना दिला.

## 'उन्नतीसाठी स्वतःची प्रबळ इच्छा प्रथम हवी'

राष्ट्रीय शीख संगत या संघटनेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने रा. स्व. संघाचे सरसंघचालक परमपूजनीय सुदर्शनजी यांनी वर्धिनीलाही भेट दिली. उपस्थित युवक-युवती कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, 'वनवासामध्ये असताना प्रभू श्रीरामांचा पदस्पर्श हजारो दगडांना झाला असेल. परंतु त्यातील एकाच दगडातून अहिल्या उभी राहिली. कारण त्या दगडामध्ये अहिल्या होण्याची आंतरिक तीव्र इच्छा होती. तसेच व्यक्तिच्या बाबतीतही आहे.चांगल्या संस्कारांचे जागरण केल्या जाणाऱ्या स्वरूपवर्धिनीसारख्या संस्थेत केवळ येण्याने आपली उन्नती होणार नाही. आपली आंतरिक इच्छा किती आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे.'

**जगीं 'बुध्दि राष्ट्रीय' गेली लयाला । न संख्या, न शास्त्रेंहि येती फळाला ॥**
**न शस्त्रें तिच्यावीण येतील कामा । तिच्यावीण संभार सारा रिकामा ॥**

# साद सीमेवरील जवानांची



**'माझ्या गावाचे नाव पिंगोरी**
**उत्तरेला आहे जेजुरी**
**गाव आहे डोंगरावरी**
**म्हणून पिकते तेथे ज्वारी-बाजरी**
**तेथील वीर घेतात भरारी - काश्मिरी**
**पाकिस्तानी सैन्याला पडतात भारी,**

या ओळी आहेत - हवालदार अरूण यादव यांच्या पत्रातील. आजोळमधील अश्विनी पोळ हिला सीमेवरील लष्करी ठाण्यातून आलेलं हे पत्र आहे. तिनं पाठवलेल्या दिवाळी शुभेच्छांना आलेली ही पोच आहे. पुरंदर तालुक्यातील पिंगोरीचे अरूण यादव आणि शंकर शिंदे एकमेकांचे जोडीदार म्हणून रणांगणात उभे राहिले. शंकर शिंदे यांना पाकिस्तानविरूध्द लढता लढता वीरगती प्राप्त झाली. पिंगोरीचं नाव इतिहासात अमर झालं. जोडीदार मित्राच्या आठवणीनं व्याकूळ झाल्यावर कठोर कर्तव्यदक्ष जवानही काही काळापुरता कवी बनतो. अशा अनेक हृद्य भावना वर्धिनीतील वर्धकांना आलेल्या पत्रातून व्यक्त झाल्या आहेत.

सगळी पत्रं जणू एकाच जवानाच्या मुखानं बोलताहेत- 'आम्ही खूप दूर आहोत. एकाकी आहोत. तुमच्या शुभेच्छा आल्या की, आम्हाला बळ येतं. एकाकीपण हरपतं. आम्हाला भाऊ-बहिणी मिळतात. तुमच्याबद्दल खूप प्रेम वाटतं. पण तुम्हीही तुमची जबाबदारी ओळखून वागा. खूप अभ्यास करा. खूप मोठे व्हा. देशाचं नाव मोठं करा. म्हणजे आमचे कष्ट, त्याग सर्व भरून पावलं.'


या आणि अशाच भावार्थानं सर्व पत्रातून वर्धिनीतल्या लहानग्या भावा बहिणींना जवान दादांचे अत्यंत मोलाचे आशीर्वाद लाभले आहेत. सगळे या नव्या नात्यानं दिवाळीच्या आनंदात सहभागी झाले आहे. भाऊबीज मनोमन साजरी करत आहेत. पण. . . हृदयातली आगही तेवढीच प्रदीप्त आहे. शून्याच्या कितीतरी खाली गेलेलं तपमान. बर्फाची कडेकोट तटबंदी. श्वासही गोठून जावा असं वातावरण. पण मनातले बर्फाचे तट मात्र पेटलेले. मग अशा पत्रात जवान नागेश पाटील यांचे गणेश दळवीच्या पत्रात शब्द येतात- 'जलता हुआ चिराग जलता ही रहेगा ! गणेश ! यह फौजी हिन्दुस्तानकी रक्षाही करता रहेगा ! जिना यहाँ हमारी खुषहाली रहेगी ।'

**असे देह हा राष्ट्रकार्यार्थ माझा । सरो वित्तमत्ताहि राष्ट्रीय काजा ।**
**जरी राष्ट्र मोठें तरी मीहि मोठा । अशी बुध्दि ठेवी न; तो तो करंटा ॥**

# स्पर्धा परीक्षा केंद्र : *विकासाचे पुढचे पाऊल*

दिपाली पवार

समाजाच्या सर्व स्तरातील गुणवत्तेचा शोध घेऊन त्याच्या विकासासाठी सुयोग्य वातावरण व संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न 'स्व'-रूपवर्धिनी गेली २२ वर्षे करीत आहे. 'सामाजिक जाणिवेचे नेतृत्व तयार करणे', हा संस्थेच्या कामाचा गाभा आहे. या व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून संस्थेच्या वाढीच्या या विशिष्ट टप्प्यावर 'स्पर्धा परीक्षा, व्यवसाय व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र' सुरू करण्याची गरज निर्माण झाली. संस्थेतील काही युवक-युवतींनी आतापर्यंत स्पर्धा परीक्षा दिल्या. त्यात काहींना यशही आले आहे. परंतु स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी योग्य मार्गदर्शनाची, संदर्भ ग्रंथालयाची व चांगल्या अभ्यासिकेची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. विशेषतः 'स्व'-रूपवर्धिनी काम करीत असलेल्या पुणे शहराच्या पूर्व भागात आणि इतर शाखांच्या परिसरात अशा सुविधा असलेल्या केंद्राची आवश्यकता आहे. त्यासाठी युवक-युवती विभागाच्या कामाचा एक भाग म्हणून स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करावे, असे ठरले. त्यानुसार ज्ञानप्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उपकेंद्र म्हणून हे केंद्र काम करत आहे.



विविध पातळ्यांवरील स्पर्धा परीक्षांची तयारी हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे एक उत्तम माध्यम ठरू शकते. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा कस लागेल आणि त्यांच्या गुणवत्तेचा विकास होईल या दृष्टीने शालेय स्तर, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयीन स्तर व इतर पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची एक साखळी या केंद्राच्या माध्यमातून तयार होईल. शाखा व युवक विभागाच्या नेतृत्व घडणीच्या व व्यक्तिमत्व विकासाच्या कामाला हे केंद्र सहाय्यभूत ठरणार आहे.

दि. २८ ऑक्टोबर २००० रोजी या केंद्राच्या कामाला सुरूवात झाली असून निश्चित योजनेनुसार व विविध टप्प्यांमधे या कामाचा विस्तार करण्यात येणार आहे. या सर्व कामांसाठी आवश्यक अशी सर्व व्यवस्था व रचना पूर्ण झाली आहे.

दि. १ ऑक्टो. रोजी स्पर्धा परीक्षा 'तंत्र व मंत्र' या विषयावर सविता कुलकर्णी व तुषार ठोंबरे यांचे 'स्व'-रूपवर्धिनीमध्ये व्याख्यान झाले. व्याख्यानासाठी ५० युवक व २२ युवती उपस्थित होत्या. याच दिवशी बऱ्याच जणांनी 'स्पर्धा परीक्षा केंद्रा'मध्ये नाव नोंदणी केलेल्या सर्वांना भेटून त्यांच्याकडून फॉर्म भरून घेतला.

व्याख्यानामध्ये तुषार ठोंबरे सरांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा आवाका व तयारी विषयी मार्गदर्शन केले. सविताताईंनी स्पर्धा परीक्षांमध्ये आपण सर्वांनी जाणे का गरजेचे आहे? हे सांगितले.

**जिथे स्वार्थ मोठा तिथे मुक्ति नाही । तिथे दास्य दुर्गंध कोंडून राही ॥**
**सुखी स्वार्थ साधून का कोण होतो? पिसाळाप्रती; भूमिला काळिमा तो ! ॥**

झालेल्या व्याख्यानांचा पाठपुरावा म्हणून दर रविवारी सायंकाळी ७.०० वा. गटचर्चेची वेळ ठरवण्यात आली. त्याप्रमाणे त्या आठवड्यात 'भारत-अमेरिका संबंध' या विषयावर गटचर्चा झाली.

***स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन***

दि. २८ ऑक्टोबर रोजी (दिवाळी पाडवा) स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोवा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पद्माकर दुभाषी होते. 'स्व-'रूपवर्धिनीचे संस्थापक कार्याध्यक्ष कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन यांच्या हस्ते 'स्पर्धा परीक्षा केंद्राचे' उद्घाटन झाले. युवक, युवती विभाग व परिसरातील इच्छूक विद्यार्थी आले होते.

कार्यक्रमास एकूण १२५ उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात उपासनेने झाली. त्यानंतर स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन संपूर्णपणे संगणकावर विशिष्ट कळ दाबून करण्यात आले. डॉ. दुभाषी यांनी प्रशासनातील त्यांचे अनुभव सांगितले. "प्रशासनात गेल्यावर आपल्या मुल्यांशी कुठेही तडजोड होता कामा नये", या विषयावर त्यांनी भर दिला. आदरणीय पटवर्धन सरांनी 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवक-युवतींनी स्पर्धा परीक्षा देऊन प्रशासनात जाणे का गरजेचे आहे? हे सांगितले. 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे' हे सूत्र आपण प्रशासनातही आणू शकतो, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

दि. ८ जानेवारी २००१ पासून केंद्राच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

---

## *प्रवास 'स्व'पासून समाजापर्यंतचा !*

**प्रशांत वेदपाठक**

विचारांचे काय आहे ? ते कधीही आणि कसेही येऊ शकतात. परिस्थिती ही त्यासाठी नेहमीच साथ देत असते. पण त्याही स्थितीत त्यांचे वर्गीकरण आवश्यक असते. 'वर्गीकरणच का ?...' याचे उत्तर द्यायचे झाले, तर शाळेचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. दरवर्षी मिळणाऱ्या गुणांवर आपण पुढील वर्गात प्रवेश घेतो. अगोदर ज्ञात असलेल्या अभ्यासक्रमाच्या पार्श्वभूमीवर नव्या अभ्यासक्रमाची आराधना सुरू होते. विचारांची वाढ ही अशा पध्दतीनेच होत असते. थोड्या वेळापूर्वी केलेला विचार हा चुकीचा होता की बरोबर होता, याचे उत्तरही नंतरच्या काळात मिळत जाते.

सर्वसाधारणपणे असे म्हणतात की, मनुष्य जन्माला येतो, तेव्हा त्याची बौध्दिक पातळी ही समान असते. आकलनशक्ती, निर्णय शक्ती अशा प्रकारच्या अनेक निसर्गदत्त देणग्यांनी तो काळाच्या बरोबर पावले टाकत जातो. आईच्या ममतेच्या स्पर्शापासून ते परिस्थितीशी झगडत असताना घेतलेल्या चटक्यांचा स्पर्श, या सर्वांचा अनुभव घेत त्याचे शिक्षण सुरू होते. प्रथमतः त्याचे विचार हे स्वतःपुरतेच राहतात. समोर असलेली वस्तू ही केवळ माझ्यासाठीच आहे आणि ती मी सहज मिळवू शकतो, अशा प्रकारची त्याची हनुमान झेप वालिश ठरते. असे असले तरी समाज त्याचे हट्ट पुरविण्याचा प्रयत्न करतो. मग त्याला त्याची जास्त ओढ लागते, ही पहिली बाजू. योग्य वेळेस त्यास पायबंद घालणे हे समाजाचे प्राथमिक कर्तव्य, ही त्याची दुसरी बाजू. जग यापेक्षाही वेगळे आहे, या विचारांची जागृती झाल्यानंतर त्याच्या हट्टाचे रुपांतर आसक्तीत होते. समाजाने जागे राहण्याची ही दुसरी वेळ. त्यातूनही त्याची सुटका झाली, तर

**मरावे परी राष्ट्ररूपी उरावे । कदाही न स्वार्थी सुखाने जगावे ॥**
**असे व्यक्त स्वार्थात राष्ट्रीय दैना । असा हा त्रिकालीन सिध्दान्त जाणा ॥**

आपण केलेला विचार हा किती व्यर्थ होता, हे म्हणण्याची वेळ त्याच्यावर येत नाही.

येथे हट्ट व आसक्ती यांचे रुपांतर निष्ठेत होऊ लागते. त्याचा विचार हा केवळ त्याच्यासाठी न राहता तो सर्वांसाठी होऊ लागतो. या गोष्टी केवळ लौकिक शिक्षणानेच साध्य होतात असे नाही. त्यासाठी योग्य त्या सहवासाची, तसेच संस्कारांची गरज असतेच. 'स्व'-रुपवर्धिनीमध्ये असा सहवास नेहमीच लाभतो.

येथे समाज हा शब्द वापरण्याचे कारण वेगळे आहे. कारण घडणे आणि घडविणे या सर्वांशी निगडीत गोष्ट होत असणे अपेक्षित असेल, तर समाज हा केवळ प्रामुख्याने पालक व मार्गदर्शक स्वरुपात स्वीकारणे जास्त योग्य होईल. संस्कृतमध्ये एक श्लोक आहे.

**लालयेत् पञ्च वर्षाणी दशवर्षाणी ताडयेत् ।**
**प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ॥**

मनुष्य घडविताना योग्य त्या वेळेस आपली भूमिका बदलण्याची स्थाने दाखविली आहेत. आपल्या अनुभवांचे कथन होणे योग्यच आहे. समाजसंघटित विचारांची देवाणघेवाण यातूनच होत असते. 'स्व'-रुपवर्धिनीच्या या विचारप्रणालीत निश्चितच कमतरता नाही. पण आपल्या अनुभवांचा गाडा हा दुसऱ्यासाठी जड होऊ नये, याची काळजीही घेणे आवश्यकच असते. वर्धिनीच्या कार्यकर्त्यासाठी खालील विचार नक्कीच लागू पडतो -

Minds are like parachutes; they function only when they are open.

वर्धिनीत येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याची जडणघडण अशीच आवश्यक आहे. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे चिंतन त्यासाठी कधीही चांगले. जितके आपण शिकत जाऊ, तितके आपणास लक्षात येईल की, तिथे शिकण्यासारखे बरेच काही आहे. नव्या आशा, नवी क्षितिजे यांचा ध्यास सतत घेता आला पाहिजे. त्याचबरोबर संस्कृतीच्या पाऊलखुणाहि तितक्याच जपून ठेवता येणे, हे तितकेच आवश्यक आहे. सतत विद्यार्थीदशेत राहण्याचा हा एक फायदा असतो. समृध्द समाजाची व्याख्या ही आपल्या चौकटीत राहून करता येत नाही. त्यासाठी त्या समाजाची त्याविषयी असलेली मते ही निरीक्षणात येणे आवश्यक वाटते. प्रत्येक माणसाच्या अंतरंगात शिरण्याची ही संधीच असते. प्रत्येक वेळेस यश मिळतेच असे नाही; पण निराशेने समोर आलेल्या व्यक्तीनुसार आपल्या स्वभावात बदल करणे गरजेचे ठरते. माणसे जोडण्याकरिता त्याचा निश्चित उपयोग होतो. 'स्व'-वर्धिनीच्या' संपर्क माध्यमाचे अनन्यसाधारण महत्त्व येथे लक्षात येते. व्यक्ती तितक्या प्रकृती या गोष्टीला अनुसरुन काही बाबतीत काही अंशी मतभेद होतातच; पण काही समान मुद्यांवर एकत्र येऊन काम करणे, ही कामामागील प्रेरणाही ठरू शकते. 'संघटना' अथवा 'संघटित' या तत्त्वांचा मूलाधार तोच असावा.

अर्थात हे सर्व विचार बरोबर असतीलच असे नाही. पण प्रामाणिक आहेत. प्रत्येक बाजूंचा अथवा गोष्टींचा चहूअंगांनी विचार केला, तर विचारांना प्रगल्भता नक्कीच येईल. परतु त्याचबरोबर नव्या गोष्टींची कास धरणे योग्य होईल. अन्यथा निर्णयक्षमता कमी होण्याची शक्यता जाणवते. ध्येयसाधनेची परिपूर्णता अशीच होईल. तहानलेल्या जीवाला देण्यात येणारा पाण्याचा थेंब व त्यानंतर त्याला होणारा आनंद या दोन्हींचा आवश्यक कृती व त्यातून मिळालेले फळ, अशा स्वरुपात अभ्यास करण्याची गरज असते. 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या संस्थांमध्ये राहून तो निश्चितपणे करता येतो.

**असे स्वार्थ अंधारसा स्वार्थ पाप !! असे स्वार्थ राष्ट्रोन्नतीलाच शाप ॥**
**असे स्वार्थ हा राष्ट्रगेही सुरुंग । तयानेंच तें गेह होतें दुभंग ॥**

# गणेशोत्सव २०००

यावर्षीच्या गणेशोत्सवाची काही ठळक वैशिष्ट्ये -



- पथकांबरोबरच अन्य समाज प्रबोधनाच्या उपक्रमांनाही प्राधान्य
- बालशाखेने परिसरातील मंडळांसमोर अथर्वशीर्ष पठणाचे कार्यक्रम केले. ५ ते ९ वर्ष इतक्या लहानवयातील मुले शुध्द स्वरात व अस्खलितपणे मंत्रोच्चार करीत होती. सर्वांनी या चिमुकल्यांचे खूप कौतुक केले.
- शाखांनी वंदेमातरम्, स्वदेशी, सुजाण नागरिकत्व या विषयांवर विविध मंडळांसमोर पथनाट्ये सादर केली. नागरिकांचा चांगला प्रतिसाद.



- राजमाता जिजाऊ शाखेच्या वर्धिका व युवतींनी पर्वती कॅनॉलवर विसर्जनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांकडील निर्माल्य जमा केले. हे निर्माल्य नदीत टाकल्याने पर्यावरणाची केवढी हानी होते, हे लोकांना पटवून दिले. दोन तासात चौदा पोती निर्माल्य जमा झाले, पुढे त्याचा उपयोग खत प्रकल्पात केला गेला.
- तुळशीबाग मंडळ व 'स्व'-रूपवर्धिनी यांचे अत्यंत स्नेहाचे संबंध आहेत. यावर्षी शताब्दीनिमित्त मंडळाने वर्धिनीच्या व्यायामशाळेस रू. १३,००० किंमतीची व्यायामाची साधने भेट दिली.
- खालील मंडळांसमोर वर्धिनीच्या पथकांनी प्रात्याक्षिके सादर केली.

**गणेशचतुर्थी -**

तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ

अश्विनी मित्र मंडळ - मंगळवार पेठ

वजनकाटा गणेशोत्सव मंडळ - गाडीतळ

नवचैतन्य मित्र मंडळ - पुणे लष्कर

एकता मित्र मंडळ - विठ्ठलवाडी

**अनंतचतुर्दशी**

तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ

शिवशक्ती मित्र मंडळ - धनकवडी

रक्षालेखा सोसायटी गणेशोत्सव - दत्तवाडी


हिंदूहितसंवर्धक मित्र मंडळ - नागपूरचाळ

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती

> **जिथे स्वार्थ नाहीं तिथे पूर्तता ती । तिथे वीरता, भव्यता नित्य येतीं ॥**
> **तिथे शुध्द मानव्य, मांगल्य राहे । तिथे राष्ट्र सौख्यांत डुंबोनि नाहे ॥**


# कसरत जमाखर्चाची

वर्धिनीच्या कामाचे स्वरूपच असे आहे की, जेथे कायम कामाच्या वाढीचा संभव आहे. वर्धिनीसारखे मूलभूत काम जागोजाग उभे रहायला हवे, अशी प्रामाणिक इच्छा या कामाला आर्थिक बळ देणाऱ्यांच्या मनात असते. ज्या संस्थेला आपण आर्थिक सहाय्य केले तेथे काम कसे चालले आहे? वाढते आहे का? येणारा पैसा कसा वापरला जातो? होणाऱ्या एकूण खर्चापैकी मूळ उद्दीष्टपूर्तीसाठीच्या कार्यक्रमांवर किती व व्यवस्थापनावर किती? असे अगदी मूलभूत प्रश्न अनेकांच्या मनात असतात व ते असायलाही पाहिजेत. गेल्या संपूर्ण वर्षात एकूण काम कसे झाले, याचा आढावा या कार्यवृत्तातून आपल्याला समजला असेलच. आर्थिक स्थितीबद्दल बोलायचे, तर गेल्या संपलेल्या आर्थिक वर्षात (९९-२०००) एकूण झालेल्या खर्चापैकी८४.८०% खर्च हा उद्दिष्टपूर्तीसंबंधीच्या कार्यक्रमांवर तर १५.२० % खर्च हा व्यवस्थापकीय




बाबींवर झाला. वर्धिनीचे काम वाढते रहाणार. त्यामुळे तसेच महागाईत होणारी वाढ व ठेवींवरील व्याजात होत जाणारी घट यामुळे आर्थिकदृष्ट्या अधिकच मजबूत पायावर उभे रहायला हवे आहे. यादृष्टीने कायमनिधी उभा करण्याचे काम सुरू झाले असून गेल्या आर्थिक वर्षात जमा झालेल्या व्याजातून ५१.०२% खर्चाची गरज भागविता आली. उरलेली रक्कम ही अर्थातच आपल्यासारख्यांच्या सक्रीय सहभागातून उभी राहिली. वर्धिनीच्या कामाच्या विस्ताराची गती व महागाईची स्थिती पहाता सध्या असलेल्या कायमनिधी हा दुप्पट करण्याची आवश्यकता आहे. या कामी आपले अधिकाधिक सहकार्य मिळावे, ही अपेक्षा आहे. आपण सहाय्य करीत आहातच; परंतु आपले मित्र, सहकारी, नातेवाईक अशांजवळ आपण या कामा संबंधी बोलू शकलात, तसेच त्यासंबंधी आम्हाला काही सुचविलेत, तर त्यांना भेटण्यात व त्यांनाही वर्धिनीच्या कामाविषयी माहिती द्यायला आम्हाला नक्कीच आवडेल.

**आर्थिक चित्र १९९९-२०००**




**अहिंसाच ती हिंसकांना न ठेवी । अहिंसा खरी सज्जनाशीं नमावी ।**
**जगीं सज्जनांना छळे तीच हिंसा । असे ईश्वरी स्पष्ट आदेश ऐसा ॥**

# 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच ...

※ सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था

※ व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ

※ आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार

※ विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा

※ राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'

※ परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी, आपुलकी निर्माण करणारी संघटना

※ अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प आहे.

जरी उच्च गेलास स्थानावरी तू । करी कार्य नेमे स्मरे दिव्य हे तू ॥
नको धुंद होऊ करी सूत्र येता । नको गाजवू तू दिसायास नेता !॥

## दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) **रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **श्री. मयूर लांजेकर**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन** (☎ ६०५५३८२)

२) **अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे -१६
शाखाप्रमुख - **श्री. संजय कदम**
शाखापालक - **र. ज. नरवणे** (☎ ५६७६०७७)

३) **विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर, वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. अमर बाबळे**
शाखापालक - **श्री. र. ज. नरवणे** (☎ ५६७६०७७)

४) **अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय, बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. विक्रांत महिंद्रकर**
शाखापालक - **श्री. रा. ल. देवपूरकर** (☎ ४२१२०६१)

५) **सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत, कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - **श्री. संदीप मोरे**
शाखापालक - **श्री. सुधाकर शं. मुळे** (☎ ४३५१७०३)

६) **योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - **श्री. निशिकांत वाईकर**
शाखापालक - **सौ. मेघना अत्रे** (☎ ४४५४६७३)

७) **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११
शाखाप्रमुख - **कु. चैत्राली काळे**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन** (☎ ६०५५३८२)

८) **राजमाता जिजाऊ शाखा**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, शाळा क्र. ७४ लक्ष्मीनगर, पुणे - ९
शाखाप्रमुख - **कु. विद्या कुडलिंगार**
शाखापालक - **श्री. अविनाश जोशी** (☎ ४४४१०३३)

९) **आजोळ**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **कु. छाया गायकवाड**
शाखापालक - **श्री. जयंत कवठेकर** (☎ ४२२१२९४)
संपर्क - सोम. ते शुक्र. स. १.३० ते ५

१०) **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे** (☎ ६१२१७०४)

११) **शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
प्रकल्पप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे** (☎ ६१२१७०४)
संपर्क - सोम.ते शुक्र.स. १०ते१, शनि.९ते १०.३०

१२) **संगणक विभाग**
विभाग प्रमुख- **श्री अविनाश जोशी** (☎ ४४४१०३३)
श्री. निशिकांत वाईकर, कु. मनिषा वाठे
कु. स्मिता तोडकर, कु. सुलक्षणा निलारवे
संपर्क - सोम ते शुक्रवार, दु. १२ ते सायं. ५

१३) **स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र**
विभाग प्रमुख - **श्री. संजय तांबट** (☎ ६१२१७०४)
कार्यालय प्रमुख - कु. दिपाली पवार
संपर्क सोम ते शनिवार
दुपारी १२ ते ५ सायं ६ ते ८

१४) **फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**
विभागप्रमुख - **श्री. सुनील कुलकर्णी** (☎ ६१३७६०९)

१५) **कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी
श्री. अभ्यंकर, श्री. गाडगीळ (☎ ६१२१७०४, ६१३४३१०)
**संपर्क** - सोम.ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं ६.१५ ते रात्री. ८.३०.
शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०.
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखापालक :**
श्री. दि. दा. जोशी,
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे - ३७.